|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ४३ सोमवार दि. १८ ऑक्टोंबर २०२१ ते रविवार दि. २४ ऑक्टोंबर २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## मानलेल्या भावावर पत्नीचे होते प्रेम त्याच्याच मदतीने पतीचा केला गेम

भिवंडी/आकाश गायकवाड

आजकाल समाजात व्यभिचार इतका बोकाळला आहे कि माणसे नात्या गोत्याचा सुद्धा विचार करीत नाहीत, जिथे रक्ताच्या नात्यात अनैतिक संबंध असतात तिथे मानलेल्या नात्याचे काय? भिवंडीत असेच एका विवाहितेचे तिच्या मानलेल्या भावाशी अनैतिक संबंध होते. मात्र तिच्या पतीला जेंव्हा या संबंधाची माहिती मिळाली तेंव्हा पती पत्नीमध्ये वाद होऊ लागले. त्यामुळे चिडलेल्या पत्नीने आपल्या याराच्या मदतीने पतीचा काटा काढला. या प्रकरणी ... पान २ वर

## मेडिकलवाल्यांना त्रास देऊन कोरोनाकाळात केले हाल अन्न व औषध विभागाचे अधिकारी वसुलीमुळे मालमाल




विरार/वरिष्ठ प्रतिनिधी

वैद्यकीय सेवा हि खरे तर ईश्वर सेवा आहे. त्यामुळे या वैद्यकीय सेवेअंतर्गत येणारी हॉस्पिटल्स तिथले डॉक्टर परिचारिका यांच्यासह रुग्णांना औषध पुरवठा करणारे मेडिकल स्टोर्स यांच्या कामावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी सरकारच्या अन्न व औषध प्रशासन विभागाची असते. पण कोरोनाच्या संकट काळात लाखो लोक मृत्यूच्या दाढेत असताना औषध विक्रेत्यांचा धंदा खूपच तेजीत होता आणि त्याच संधीचा फायदा घेऊन अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी वसुलीचा उच्चांक गाठला. वार्षिक ऑडीटच्या नावाखाली मेडिकल दुकानांची तपासणी करायला जाताना काही ना काही दोष काढून मेडिकल दुकानदारांना नोटीस बजावणे, त्यांचा परवाना वर्ष किंवा सहा महिन्यांसाठी रद्द करण्याची धमकी देऊन त्यांच्याकडे मोठ्या रकमेची मागणी करणे असे सर्रास प्रकार सुरु होते. त्यामुळे यांना अधिकारी म्हणावे कि खंडणीखोर गुंड तेच कळत नव्हते.

वसई-विरार पुरते बोलायचे झाल्यास या वसुलीत अन्न व औषध प्रशासन विभागाच्या निरीक्षक आरती कांबळे व प्रविण राऊत हे वरिष्ठांच्या नावाने वसुली करीत होते आणि त्यांना या विभागाचे उपायुक्त मुंदडा यांचा आशीर्वाद होता. किंबहुना मुंदडा यांच्याच इशाऱ्यावरून हि वसुली आणि मानसिक त्रास सुरु होता. त्यामुळे मुंदडा आणि त्यांचे वसुली एजंट म्हणून मेडिकल स्टोरवाल्यांना त्रास देणारे आरती कांबळे व प्रविण राऊत यांची सीबीआय किंवा सीआयडी मार्फत चौकशी करावी अशी मागणी रिटेल केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने एफडीएच्या आयुक्तांकडे केली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे एफडीएच्या या वसुलीची चर्चा सोशल मिडीयावर सुरु होऊन संताप व्यक्त केला जाऊ लागताच एफडीएच्या या खंडणी खोरांनी दुसऱ्या एका मेडिकल स्टोर्स असोसिएशनकडून असे काही घडलेच नाही असे यांना क्लिनचीट देणारे पत्र लिहून घेतले आहे आणि त्याद्वारे आपण निर्दोष असल्याचा दावा करीत आहेत. पण यांच्या अन्यायाला बळी पडलेल्या अनेक मेडिकल दुकानदारांनी एफडीएच्या या वसुली बाजांचा आमच्या समोर पाढाच वाचला. तेंव्हा एक गोष्ट लक्षात आली कि दारूच्या दुकानाचा परवाना मिळवायला जेवढा त्रास होत नाही, तेवढा त्रास मेडिकल स्टोअरचा परवाना घ्यायला लागतो. यात आणखी एक धक्कादायक बाब पुढे आली आहे ती म्हणजे वसई-विरार मधील काही झेरॉक्सच्या दुकानांवर सुद्धा मेडिकल दुकानांची नोदणी होऊन परवाना सहज मिळतो. त्यामुळे आता चोर डाकू किंवा अंगठे बहाद्दर सुद्धा मेडिकल दुकानांसाठीचा परवाना घेऊ शकतात. फक्त एफडीएच्या अधिकाऱ्यांना म्यॅनेज करण्यासाठी पैसा हवा फार्मासिस्टच्या पदवीचीही गरज नाही. आता काय म्हणावे या लोकांना इतके उलट्या काळजाचे लोक जर एफडीएमध्ये असतील ... पान २ वर

### दक्षता अधिकाऱ्यांनी चौकशी अहवाल सरकारकडे पाठवला!

या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाचे दक्षता अधिकारी समाधान पवार यांच्याशी आमच्या प्रनिधिनी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले कि, या प्रकरणी मी सविस्तर चौकशी केली असून चौकशी अहवाल शासनाकडे पाठवलेला आहे. त्यामुळे आरती कांबळे व प्रवीण राऊत आणि स्वतः उपायुक्त मुंदडा यांच्यावर काय कारवाई केली जाते याकडे सर्वाचे लक्ष लागलेले आहे.




## खंडूचा दिलदारपणा लोकांच्या नजरेत भरला पैशांच्या लालसेपोटी मित्रानेच गळा चिरला



मुंबई/एस.कुमार

आजकाल कुणाला मदत करण्यासारखी परिस्थिती राहिली नाही, जो कुणी सामाजिक जबाबदारीच्या भावनेने लोकांच्या मदतीला धावत असतो. त्याच्या विषयी त्याच्या जवळच्या लोकांमध्येच संशयाचे वातावरण निर्माण झालेले असते. जर हा माणूस लोकांना इतकी मदत करतोय तर याच्याकडे किती पैसा असेल? गोवंडी येथे अशाच एका घटनेत लोकांना सढळहस्ते मदत करणाऱ्या एका पालिका कामगारावर जीव गमावण्याची पाळी आली. खंडू दहिभाते दुसऱ्याला मदत करतो. त्यामुळे त्याच्याकडे भरपूर पैसा आहे, या संशयातून खंडूच्या मित्रानेच त्याची गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

खंडू मारुती दहिभाते (वय ४६) हा मुंबई महानगर पालिकेच्या ए प्रभागात नोकरीला होता. तो गोवंडीच्या न्यू गौतम नगर, भीमवाडी या ठिकाणी राहत होता. त्याचे कुटूंब पनवेलला राहत होते. पालिकेत नोकरीत असलेल्या खंडू याला पगार ही चांगला होता. कामावर वेळेवर जाता यावे यासाठी तो गोवंडीत कुटूंबापासून वेगळा राहत होता. कामावर नेहमी वेळेवर जाणारा आणि प्रामाणिकपणे काम करणारा खंडू त्या दिवशी कामावर न आल्याने अनेकांना आश्चर्य वाटले. रोज वेळेवर कामावर येणार खंडू ने आज कुठे दांडी मारली. असा प्रश्न त्याच्या सोबतीला असलेल्या कामगारांना पडला. कोणी म्हणे तो रजेवर असेल तर कोणी म्हणे फिरायला बाहेर गेला असेल? कुटूंबाच्या भेटीला गेला असेल? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा ते प्रयत्न करीत होते. पण नेमका खंडू कुठे गेला याचे कोडे काही सुटले नव्हते. काहींनी त्याने रजा टाकली का म्हणून चौकशी केली. पण खंडूने रजेचा अर्ज केला नसल्याचे समोर आले. कामगारांनी त्याला





फोनही करून बघितला पण फोनही लागत नव्हता. त्याचा मोबाईल बंद येत होता. रजेचा अर्ज नाही,फोन लागत नाही, खंडू गेला तरी कुठे? कोणी तरी त्याच्या भावाला फोन केला? खंडू कामावर नाही त्याचा फोन लागत नाही, नेमका खंडू गेला कुठे? तो मुंबई सोडून गावी तर नाही गेला ना? भावाला ही आश्चर्य वाटले दादा असा न सांगता कुठे निघून गेला. म्हणून त्याचा धाकटा भाऊ बंडू हा खंडू राहत असलेल्या गोवंडी, न्यू गौतम नगर परिसरात आला. तेव्हा त्याला खंडूच्या घराचा दरवाजा बंद ... पान २ वर

## संपत्तीसाठी तिने पतीसह संपूर्ण कुटुंबाला संपवले!



गुन्हेकथा/लक्ष्मणराव पाटोळे

केरळमधील कोझिकोडे जिल्ह्यातील वडकरा ग्रामीण विभागाचे पोलीस अधीक्षक के.जी. सायमन हे आपल्या समोरच्या खूर्चीत बसलेल्या तरुणाची कैफियत डोळे विस्फारून ऐकत होते. हा तरुण सुशिक्षित आहे. केवळ सुशिक्षित नव्हे तर उच्चशिक्षित आहे. शिवाय एनआरआय आहे. अमेरिकेतून आलेला आहे. घरचा खानदानी श्रीमंत आहे. मग, हा असे विचित्र का बोलतोय? सायमन यांना काही समजेना! त्यांनी गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस उपअधीक्षक टी. हरिदास यांना मदतीला बोलावून घेतले आणि तरुणाला पुन्हा एकदा आपली कैफियत सादर करण्यास सांगितले. ... पान ६ वर

## मध्यरात्री दरोडेखोरांनी त्याचा घात केला 'पैशांपायी' वृद्ध शेतकऱ्याचा जीव गेला

नाशिक/क्राईम रिपोर्टर

पैसा हा जीवन जगण्यासाठी किती जरी आवश्यक असला तरी तो तितकाच घातकी सुद्धा आहे. कारण पैशावरून मैत्री तुटते, रक्ताची नाती तुटतात आणि एखाद्याकडे जास्त पैसा आल्याची थोडी जरी माहिती चोरचांडाळ लोकांना मिळाली तरी ते एखाद्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. नाशिक जवळच्या कोटबेल गावातील घुबडदर शिवारात एक वृद्ध दांपत्य राहत होते. त्यांनी आपल्याकडील १० एकर शेती पैकी काही शेती विकली. त्यातून त्यांच्याकडे भरपूर पैसा आला. पण हा पैसा बँकेत सुरक्षित ठेवण्याऐवजी त्यांनी स्वत:कडेच ठेवला आणि हीच त्यांची चूक झाली. कारण त्यांच्याकडे पैसा आल्याची माहिती काही चोर लुटारूंना समजताच त्यांनी मध्यरात्री घरावर दरोडा टाकून सहादू खैरनार यांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी ८ जणांना अटक केली आहे.



सहादू रामचंद्र खैरनार व हिरुबाई सहादू खैरनार हे वयोवृद्ध दाम्पत्य दहा एकर शेतीचे मालक होते. दहा एकर शेतीचे मालक असलेल्या या दाम्पत्याला मुलबाळ नव्हते. त्यामुळे जिवनातील अखेरच्या दिवसात दोघा वयोवृद्ध पती पत्नीला एकमेकांशिवाय कुणाचाही सहारा नव्हता. नाशिक जिल्ह्याच्या बागलाण तालुक्यातील कोटबेल गावी घुबडदरा शिवारात ते रहात होते. सहादू खैरनार यांचे



मयत सहादू

वय ७७ तर हिरुबाई यांचे वय ६५ एवढे होते. शेतातच घर करुन दोघे आपला उदरनिर्वाह करत होते. दहा एकरपैकी पाच एकर शेत विक्रीचा त्यांनी व्यवहार केला होता. त्या व्यवहारातून आलेले पैसे त्यांनी आपल्याजवळच ठेवले होते. शेतात एकटेच राहणारे दोघे वयोवृद्ध आणि त्यांच्याजवळ भलीमोठी रक्कम आली असल्याची भणक कुणाला तरी लागली होती. नेहमीप्रमाणे ... पान २ वर

## प्रियकरामुळे तिचे आयुष्य उध्वस्त झाले लग्नाचे आमिष दाखवून ब्लॅकमेल केले

जळगाव/क्राईम रिपोर्टर



आरोपी संपत

आजकाल प्रेमाच्या नावाखाली तरुण तरुणी एकत्र येतात. लग्नाच्या आणाभाका घेतात. अशावेळी प्रियकराचा तिच्यातील इट्रस्ट संपला कि तो तिला टाळू लागतो. अशावेळी तिने जर त्याच्या मागे लग्नाचा तगादा लावला तर एकतर तो तिची हत्या करतो किंवा आपल्या संबंधाची माहिती उघड करण्याची धमकी देऊन तिला ब्लॅकमेल करतो. महाविद्यालयात लेक्चरर म्हणून काम करणारी राजकुमारी नाव बदललेले हिच्या बाबतीत सुद्धा असेच घडले. तिला तिच्या प्रियकराने लग्नाचे आमिष दाखवून तिचे लैंगिक शोषण केले आणि नंतर त्याला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. या प्रकरणी तिने शेवटी कंटाळून पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवल्याने त्याला अटक करण्यात आली.

वयाच्या अवघ्या तेविसाव्या वर्षी राजकुमारीला (काल्पनिक नाव) उस्मानाबादच्या एका नर्सिंग महाविद्यालयात लेक्चररचा जॉब मिळाला होता. बीड जिल्ह्याची रहिवासी असलेली राजकुमारी दिसायला देखणी आणि बोलकी असल्यामुळे तिचा महाविद्यालयात चांगला प्रभाव होता. तिची उत्कृष्ट वक्तृत्व शैली लक्षात घेत महाविद्यालय व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकामी तिला मिरज येथे पाठवले होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सोबत ... पान २ वर

## दोन लाखांवरून दोघांतला वाद खूपच वाढला ठेवलेल्या बाईचा तिच्या यारानेच काटा काढला





सांगली/क्राईम रिपोर्टर

पैशाच्या व्यवहारात माणूस नातीगोती बघत नाही आणि धंदा करणाऱ्या बायकांचे तर पैसा हेच सर्वस्व असते. कारण पैशासाठीच तर त्या आपली अब्रू विकायला बाजारात बसलेल्या असतात. काजल भाभी सुद्धा तशीच होती. मात्र धंदेवाली असली तरी तिने एकाला ठेवले होते आणि तो तिच्याशी नवऱ्यासारखा राहत होता. त्याने काजल भाभी कडून दोन लाख रुपये उसने घेतले होते. मात्र तो परत करीत नव्हता. त्यावरून दोघांची भांडणेही होत असत. त्यातच तिच्या बहिणीची दोन मुले काजलकडे राहायला आल्याने त्यांचा धंद्यात अडसर येत होता. त्यामुळे त्यांना त्यांच्या घरी पाठवून दे असे तो सांगत होता. पण ती मात्र ऐकत नव्हती. अखेर त्याने तिचा कायमचा काटा काढण्याचे ठरवले आणि एक दिवस तिची गळा आवळून हत्या केली. मात्र हे दृश्य त्या दोन मुलांनी पाहिलेले असल्याने त्यांनी पोलिसांकडे तशी जबानी देताच पोलिसांनी काजल भाभीच्या याराला अटक केली.

सांगली शहरात गोकुळनगर आणि स्वरूप नगर येथे वेश्याची वस्ती आहे. या वस्तीत परराज्यातून अनेक महिला, मुली या वेश्या व्यवसायासाठी येतात किंवा त्याना आणले जाते. सुरूवातीला आलेली मुलगी किंवा महिला ही त्या धंदयात स्थिरावून मालकीण बनते. वयाच्या ३५-४०शीत ती महिला ही त्या नगरात घर घेऊन आपल्या अंडर खाली पाच दहा मुली आणून त्याच्याकडून धंदा करून घेऊन ती त्यातून कमिशन घेते आणि त्याच्या जीवावर भरपूर पैसा मिळविते. जेवढया चिकण्या मुली तेवढे ... पान २ वर

## नवरात्र उत्सवात मंडप लाईटींगवरून वाद झाला एका कार्यकर्त्याने दुसऱ्याचा भोसकून खून केला



मयत वैभव भोपळे

कोल्हापूर (करवीर)/क्राईम रिपोर्टर

मंडप आणि डेकोरेशन शिवाय उत्सवाला शोभा नसते. पण कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सव अत्यंत साधेपणाने आणि सरकारने घालून दिलेल्या नियमांचे पालन करून साजरे केले जात आहेत. पण साधेपणाने उत्सव साजरा करणे काही तरुणांना मान्य नसल्याने उत्सव मंडळात गटबाजी सुरु झालीय. अशाच एका गटबाजीने मंडळातील तरुण कार्यकर्त्याचा बळी घेतला. कोल्हापूर जिल्ह्यातील खेबवडे गावात नवरात्रोत्सवात लायटिंग करण्यावरून दोन कार्यकर्त्यामध्ये वाद झाला आणि एकाने दुसऱ्याला भोसकून ठार मारले आणि याच घटनेने अंबामातेच्या उत्सवाला गालबोट लागले. या प्रकरणातील आरोपी स्वतःच पोलिसांच्या समोर हजर होऊन त्याने गुन्हा कबुल केला.



आरोपी सुरज पाटील

करवीर तालुक्यातील खेबवडे गाव हे तसे सधन गाव म्हणून ओळखले जाते. गावात आठ ते दहा तरूण मंडळे असल्याने त्याचेकडून दरवर्षी नवरात्र उत्सव आणि गणेश उत्सव साजरे केले जात असतात. मात्र गेल्या दोन वर्षापासून कोरोना महामारीच्या निर्बधामुळे सण साजरे करण्यावर मर्यादा आल्याने तरूण वर्गाला हे सण साजरे करताना काही मर्यादा आल्या होत्या. मात्र यावर्षी कोरोना माहामारीची साथ आटोक्यात आल्याने राज्य सरकारकडून काही प्रमाणात शिथीलता देण्यात आली होती. तरी ही हे सण साजरे करताना राज्य सरकारने काही मर्यादा घातल्या होत्या. त्याचाच परिणाम म्हणून गावातील शिवशंभो तरूण मंडळाकडून नवरात्र उत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्याचा प्रयत्न केला जात होता.या शिवशंभो मंडळात शिवाजी चौकातील वैभव भोपळे आणि सुरज पाटील हे ही होते. सुरज पाटील याचा लाईटींग आणि मंडपाचा व्यवसाय होता. तो दरवर्षी गणेश उत्सवात आणि नवरात्र उत्सवात शिवशंभो मंडळाला लाईटीग देत होता.या मंडळाचा तो सदस्य असल्याने मंडळासाठी तो ही प्रामाणीक पणे काम करीत होता. सुरज हा व्यवसायीक दृष्टीकोणातून त्या मंडळाकडे पाहत होता. ते त्याच्या व्यवसायचा एक भाग... पान ६ वर

C M Y K

## पान १ वरून....

### मेडिकलवाल्यांना त्रास देऊन ...

तर उद्या मेडिकल दुकानात अमली पदार्थ आणि दारू सुद्धा विकण्याची परवानगी दिली जाईल. आता या प्रकरणी चौकशीचे आदेश देण्यात आले असून चौकशी अधिकाऱ्यांनी आपला अहवाल सरकारकडे पाठवला आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून मेडिकलचे दुकानांचे परवाने मिळवण्यासाठी अनेक कठोर निकष आहेत. त्यात विविध कॉलम असतात, पण परवाने देताना कुठल्याही निकषांचा विचार केला जात नाही. काही दुकाने तर इतक्या खराब जागेत आहेत कि त्यांना परवानगी कशी मिळाली तेच कळत नाही. त्यापैकी वसई पुर्वेकडील एव्हरशाईन सिटी येथील मेडिकल दुकानाची स्थिती खूपच खराब आहे, तर नालासोपारा येथील नेमिनाथ हॉस्पिटल मधील मेडिकल स्टोर तर चक्क सुरक्षा रक्षकाच्या पत्र्याच्या शेड मध्ये आहे जे कुठल्याही निकषात बसत नाही. विरार पश्चिमेकडील आगाशी येथे तर फर्निचर, फ्रीज यापैकी काही नसलेल्या मेडिकल स्टोअरला परवानगी देण्यात आली होती. मात्र नंतर तक्रारी आल्यावर परवाना काढून घेण्यात आला. नालासोपाऱ्यातील आचोळे येथील एका सुशिक्षित भूमीपुत्राने मेडिकल स्टोरसाठी अर्ज केला. पण एफडीएच्या अधिकाऱ्यांचे खिसे गरम करण्यासाठी त्याच्याकडे पैसा नसल्याने त्याचा अर्ज ना मंजूर करण्यात आला. वसई तालुक्यात आज १२०० ते १३०० मेडिकल स्टोर्स आहेत. पण त्यांना एफडीएवाले कशा प्रकारे छळतात याच्या बऱ्याच कहाण्या आता हळूहळू बाहेर येत आहेत. वार्षिक ऑडिटसाठी जेंव्हा फूड ॲण्ड ड्रग्सचे अधिकारी जातात तेंव्हा ऑडिटसाठी जे १८ कॉलम असतात त्यात काही ना काही चुका काढून त्याला नोटीस दिली जाते आणि परवाना रद्द करण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे बिचारा दुकानदार सेटलमेंट करायला तयार होतो आणि त्याच्याकडून मग हजारो रुपये उकळले जातात अशी माहिती नाव न सांगण्याच्या अटीवर एका मेडिकल स्टोरवाल्याने दिली आहे. या प्रकरणे आमच्या प्रतिनिधीने उपायुक्त मुदंडा साहेबांशी संपर्क साधला असता त्यांची चौकशी झाल्याची माहिती त्यांनी लपवली आणि मला यातले काहीच ठाऊक नाही असे म्हणत हात झटकले. या लोकांच्या याच भ्रष्टाचारामुळे सरकारने औषधाच्या भेसळी विरुद्ध जे कठोर कायदे केलेले आहेत त्याचा आधार घेऊन भेसळयुक्त औषधांची विक्री करणाऱ्या एखाद्या मेडिकल दुकानदाराला एफडीएचे अधिकारी ब्लॅकमेल करून त्यांच्याकडून मोठी रक्कम वसूल करू शकतात आणि त्यांनी विकलेल्या भेसळयुक्त औषधाने एखाद्या रुग्णाचा जीव जाऊ शकतो. म्हणूनच सरकारने या गंभीर प्रकरणाकडे लक्ष देऊन रिटेल केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनने केलेल्या आरोपांची उच्च स्तरीय चौकशी करून एफडीएचे वसुलीबाज अधिकारी आरती कांबळे, प्रविण राऊत आणि उपायुक्त मुंदडा यांच्यासह या रॅकेटमधील सर्वांची कसून चौकशी करावी अशी मागणी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तांकडे केली आहे. दरम्यान अशा प्रकारचे घाटोळे करून वाममार्गाने बेनामी संपत्ती जमवणाऱ्या या भ्रष्ट अधिकाऱ्यांची सीबीआ किंवा सीआयडी मार्फत चौकशी करावी अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरू अशा इशारा रिलेट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षांनी दिला आहे.

### मानलेल्या भावावर पत्नीचे होते प्रेम...

आरोपी पत्नीला अटक करण्यात आली आहे, तर तिचा हिरो फरार आहे. तालुक्यातील कांबागावच्या हद्दीतील पागीपाडा इथं प्रेम संबधांच्या संशयातून पत्नीने साथीदाराशी संगनमत करून पतीची राहत्या घरताच हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी पत्नीला अटक केली आहे. तर तिचा साथीदार फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहे. संजय काशिनाथ पागी (वय ३८) असे हत्या झालेल्या पतीचे नाव आहे. तर सविता संजय पागी (वय ३५) असे अटक केलेल्या पत्नीचे नाव आहे. तर अक्षय हरिचंद्र काळण (रा. वडपा, भिवंडी) असे फरार आरोपीचे नाव आहे.याबाबत अधिक माहिती अशी की मृतक संजय हा आरोपी पत्नीसोबत भिवंडी तालुक्यातील कांबागावातील पाड्यावर राहत होता. त्यातच आरोपी अक्षय हा पत्नी सविता हिचा मानलेला भाऊ आहे. असे आरोपी सविता नेहमी सांगत होती. मात्र मृतक संजय याला या दोघांचे प्रेमसंबध असल्याचा संशय येत होता. यावरून मृतक संजय व आरोपी अक्षयमध्ये वाद होऊन त्याला घरी येण्यास मनाई केली होती. तरी देखील आरोपी अक्षय हा मृत संजय याच्या घरी नेहमीच येणे जाणे असायचे त्यावरून पुन्हा मृत संजय व पत्नी सविता यांच्यात कडाडून भांडण होत होते . त्यातच शनिवारी रात्रीच्या सुमारास पती संजय व पत्नी सविता यांच्यात पुन्हा वाद सुरु असतानाच आरोपी अक्षयने सविता हिच्या मदतीने संजय याची गळा आवळून घरातच हत्या केली. होती याप्रकरणी निजामपुरा पोलीस ठाण्यात आरोपी पत्नी सविता व अक्षय या दोघांच्या विरोधात रविवारी हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. मृत संजय याची पत्नी सविता हिला पोलिसांनी अटक केली असून सोमवारी तीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने १४ ऑक्टोबर पर्यत पोलीस कोठडी सुनावली आहे. तर आरोपी अक्षय हा फरार असून निजामपूर पोलीस त्याचा शोध घेत असल्याची प्रतिक्रिया निजामपूर पोलीस ठाण्याचे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक तथा तपास अधिकारी दिप बने यांनी दिली आहे.

### खंडूचा दिलदारपणा लोकांच्या नजरेत...

दिसला. घराला बाहेरून कुलूप लावलेले होते.बंडू ने आजूबाजूला चौकशी केली तेव्हा शेजाऱ्यांनी खंडूची खोली गेली दोन तीन दिवस झाले बंदच आहे. तसेच तो ही काही डोळ्यांनी दिसला नाही असे सांगितले. त्यामुळे बंडूला टेन्शन आले. खंडू दादा काही न सांगता कुठे बेपत्ता झाला? असे बडबड बंडूने दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. तेव्हा बंडूला धक्का बसला. बंडूचा भाऊ खंडू हा घरात रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. समोरील ते भयंकर दृश्य बघून बंडू क्षणभर बेशुद्ध पडला. त्याची मती गुंग झाली. त्याही परिस्थितीत स्वतः ला सावरत त्याने तडक देवनार पोलीस ठाणे गाठले. या घटनेची माहिती त्याने पोलिसांना दिली. तो दिवस होता.२१ सप्टेंबर २०२१ चा. वेळ होती दुपारी १२ची. त्यादिवशी देवनार पोलीस ठाण्यात दिवस पाळीला कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर हे काम पाहत होते. घटनेची माहिती मिळताच त्यांनी देवनारचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम आगवणे यांच्या कानावर ही माहिती घातली. तातडीने सर्व अधिकारी आणि गुन्हे प्रकटीकरण स्टॉप घटनास्थळी रवाना झाले.घटनास्थळी परिमंडळ ६चे पोलीस उपायुक्त कृष्णकांत उपाध्याय व सहाय्यक पोलीस आयुक्त एम . एम . मुजावर हे देखील दाखल झाले होते.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी घटनास्थळी भेट देऊन मुतदेहाची पाहणी केली असता मृतक खंडू याचा धारदार शस्त्राने मान चिरून तसेच त्याच्या शरीरावर वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून येत होते. पोलिसांनी दिसत्या परिस्थितीचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयाकडे रवाना केला. दरम्यान फिर्यादी बंडू मारुती दहिभाते (वय ४४) यांनी प्रत्यक्ष पोलीस ठाण्यास येऊन ,त्यांचा भाऊ खंडू मारुती दहिभाते (वय ४६), धंदा नोकरी, रा. भिमवाडी, न्यू गौतम नगर, गोवंडी, मुंबई ४३ याचा कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी धारदार हत्याराने मानेवर वार करून जीवे ठार मारुन रुमला बाहेरुन कुलूप लावून निघून गेल्याबाबत तक्रार दिल्याने देवनार पोलीस ठाण्यात दि .२१ सप्टेंबर रोजी गु.र.क्र. ६६२/२०२१ कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला होता. दरम्यान एका इसमाची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याने परिसरात खळबळ उडाली होती. आजूबाजूला भितीचे वातावरण पसरले होते. ही हत्या कोणी, का आणि कशासाठी केली असावी? याचा शोध घेण्यासाठी पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त विरेंद्र मिश्र ,परिमंडळ ६ चे पोलीस उप आयुक्त कृष्णकांत उपाध्याय, देवनार विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त एम . एम. मुजावर व देवनार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम आगवणे यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ ६ हद्दीतील टिळकनगर, मानखुर्द व आर. सी. एफ आणि ट्रॉम्बे इत्यादी पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक तयार करण्यात आले. या पथकात देवनार पालीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर, जयंत गादेकर, सचिन गवळी, स.पो.नि. अनंत शिंदे, विशेष पथकातील पोउनि प्रताप देसाई, प्रशांत कांबळे, संतोष गायकवाड, श्रीकांत पाटील, उल्हास कांबळे इत्यादींचा सहभाग होता. हे पथक दिवसरात्र आरोपीचा शोध घेण्यासाठी फिरत होते.पण आरोपी काही भेटत नव्हता. तपास पथकाने घटनास्थळ तसेच परिसरातील सीसीटीव्हीच्या फूटेजची पाहाणी पाहणी केली. तेव्हा आरोपीचे या परिसरातील असल्याचे आढळून आले. गुप्त बातमीदाराच्या मदतीने आरोपीचा शोध घेतला असता संशयित आरोपी मुख्तार मुर्तुजा खान उर्फ लाला (वय ३७) रा. न्यू गौतम नगर, प्लॉट नं. ४, भीमवाडी, गोवंडी, मुंबई-४३ याला ताब्यात घेण्यात आले. पोलीस ठाण्यात आणून त्याची चौकशी केली असता सुरुवातीला तो ताकास तूर लागू देत नव्हता. पोलीसांनी त्याला फैलावर घेतले असता शेवटी त्याने गुन्ह्याची कबुली दिली. मुख्तार मुर्तुजा खान उर्फ लाला आणि मृतक खंडू मारुती दहिभाते हे दोघेही एकाच परिसरात राहायला असल्याने ते एकमेकांना ओळखत होते. मृतक खंडू दहिभाते हा एकटाच राहत असल्याने मुख्तार खान हा नेहमी त्याच्या घरी ये-जा करीत असे. खंडू हा सरकारी नोकरीत असल्याने तो परिसरातील लोकांना मदत ही करत असे .तसेच तो मुख्तारला सोबत घेऊन नशापाणी ही करत असे. त्यामुळे या दोघांची चांगली गट्टी जमली होती. खंडू शेजाऱ्यांना मदत करत असल्याने त्याच्या कडे भरपूर पॅसें असावेत असा मुख्तारचा समज झाला. त्यामुळे खंडूचा गेम करून त्याच्या घरातील पॅसे चोरी करण्याचा त्याने बेत आखला. त्यानुसार २० सप्टेंबर रोजी रात्री मुख्तारने खंडू याचा चोरी करण्याच्या उद्देशाने धारदार हत्याराने गळा चिरला. तसेच त्याच्या शरीरावर वार करून खंडूची निर्घृण हत्या केली. त्यादिवशी बाहेर जोरात पाऊस पडत असल्याने शेजाऱ्यांना कसलाही आवाज आला नाही. आपले काम झाल्यावर मुख्तार ने घराला बाहेरून कडी लावली आणि तो पळून गेला. अशा प्रकारे मुख्तार ने खंडू दहिफळे यांची हत्या केल्याची कबुली दिल्याने पोलिसांनी त्याला २१ सप्टेंबर रोजी अटक केली. मुख्तारवर आरसीएफ पोलीस ठाण्यात यापूर्वी देखील एक खुनाचा गुन्हा दाखल आहे. मात्र तो त्या गुन्हातून निर्दोष सुटला. अशा प्रकारे देवनार पोलिसांनी अगदी १० तासात तपास करून आरोपीचा मुसक्या आवळल्या.

### प्रियकरामुळे तिचे आयुष्य उध्वस्त...

घेत ती मिरज येथील एका सुसज्ज अशा दवाखान्यात गेली होती. तिच्या अख्त्यारीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देण्यात आले. ज्या रुग्णालयात ती विद्यार्थ्यांना सोबत घेऊन प्रशिक्षण देण्यासाठी आली होती त्या ठिकाणी संपत लक्ष्मण मल्हाड हा तरुण नेहमी ये - जा करत होता. त्या रुग्णालयात त्याचे नेहमी येणे जाणे असल्यामुळे त्याची व राजकुमारीची ओळख झाली. तो सन २०१६चा काळ होता. त्यावेळी राजकुमारी २३ वर्षांची होती. संपत लक्ष्मण मल्हाड हा तरुण सांगली जिल्ह्याच्या जत तालुक्यातील दरिबडची या गावचा रहिवासी होता. राजकुमारी आणि संपत दोघेही वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असल्यामुळे साहजीकच दोघांची ओळख होण्यास वेळ लागला नाही. दरम्यानच्या कालावधीत राजकुमारी व संपत या दोघांनी एकमेकांना आपल्या मोबाईल क्रमांकाची देवाणघेवाण केली. दोघेही तरुण आणि समविचारी असल्यामुळे दोघांच्या मनाच्या तारा जुळण्यास देखील वेळ लागला नाही. राजकुमारीला राहण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने एक स्वतंत्र खोली दिली होती. एकेदिवशी संपत थेट तिच्या खासगी खोलीत रात्रीच्या वेळी तिला भेटण्यासाठी आला. ती वेळ आणि तिच्या ताब्यातील खोली दोन्ही राजकुमारीच्या खासगी बाबी होत्या. मात्र असे असले तरी सर्व संकेत मोडून संपत तिच्या भेटीसाठी रात्री नऊ वाजेच्या सुमारास आला. तु मला खुप आवडतेस असे म्हणत तो तिच्यासोबत लगट करु लागला. बघता बघता संधी साधत तिचे मन वळवून तिच्यासोबत लग्न करण्याचे आमिष दाखवत त्याने नको ते कृत्य केले. आपला कार्यभाग साध्य झाल्यानंतर तो गुपचुप तेथून निघून गेला. त्यानंतर काही दिवसांनी राजकुमारीचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे काम आटोपले. ती आपल्या महाविद्यालयात नियमीत तासिका घेण्यासाठी परत आली. तरीदेखील दोघांचे मोबाईलवर नियमीत बोलण्याच्या क्रम चुकला नाही. तो तिला लग्न करण्याचे आमिष देतच होता. त्यानंतर सन २०१७ मधे तो भारती विद्यापीठ पुणे येथे नोकरीला लागला. संपतने तिला त्याच्या रुमवर वेळोवेळी बोलावून लग्नाचे आमिष दाखवत गोड बोलून सामाजिक बंधने झुगारुन तिच्यासोबत संबंध प्रस्थापित केले. दरम्यानच्या कालावधीत त्याने तिचा विश्वास संपादन केला होता. या विश्वासाचा फायदा घेत त्याने तिच्याकडून पैशांची मागणी देखील केली. तिने देखील त्याला वेळोवेळी पैसे दिले. त्याने गोड बोलून तिच्याकडून पैसे घेतले व त्यासोबतच समाजाला मान्य नसलेले विवाहबाह्य संबंध देखील प्रस्थापित केले. तो वेळोवेळी तिला लग्नाचे आमीष दाखवत तिच्याकडून सुख लुटत होता. त्यानंतर कॅलेंडरची बरीच पाने उलटली व काळ पुढे सरकला. सन २०१८मध्ये संपतला जळगाव सामान्य रुग्णाल्यात नोकरी मिळाली. त्याच कालावधीत राजकुमारीला देखील पुणे येथे अधिकारी पदावर नविन नोकरी मिळाली. खास तिला भेटण्यासाठी संपत पुणे येथे जात होता. तिला लग्नाचे आमिष दाखवत एका लॉजवर तो तिच्यासोबत समाजाला मान्य नसलेले संबंध ठेवत होता. जोडीला तो तिला लग्नाचे आमिष दाखवण्यास विसरत नव्हता. हा प्रकार बरेच दिवस सुरु होता. विविध कारण पुढे करत तो तिच्याकडून पैसे देखील घेत होता. बघता बघता काळ पुढे पुढे सरकतच होता. काळ कुणासाठी थांबत नसतो. दरम्यानच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. एकवेळ मनुष्य एखाद्या कामाचा कंटाळा करतो मात्र निसर्ग कधीच कंटाळा करत नाही. योग्य वेळ आल्यावर निसर्ग मनुष्याला त्याच्या कामाची पावती दिल्याशिवाय रहात नाही. सन २०१९ मध्ये राजकुमारीला दिवस गेले. ती गर्भवती राहिली. आपल्या पोटात संपतचे बाळ असल्याचे तिने त्याच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे आता तरी तो लवकर आपल्यासोबत लग्न करेल अशी आशा राजकुमारी मनाशी बाळगून होती. मात्र त्याने तिच्यासोबत लग्न करण्यास थेट नकारच दिला. त्याचे बोलणे ऐकून राजकुमारी त्याच्यावर चिडली. मी तुझ्या आईवडीलांना सर्व प्रकारचे सत्य कथन करणार आहे अशी तंबी तिने त्याला दिली. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी त्याने तिला पुण्याहून जळगावला बोलावून घेतले. आपण लवकरच लग्न करु असे नेहमीप्रमाणे आमिष दाखवत गोड बोलून त्याने जळगाव नजीक असलेल्या एका दवाखान्यात तिचा गर्भपात करुन घेतला. वयाच्या तेवीसाव्या वर्षापासून राजकुमारीचे संपतसोबत असलेले संबंध तिच्या वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षापर्यंत सुरु होते. आपल्याला लग्न करायचे आहे, त्यासाठी घराचे काम करायचे आहे असे म्हणत त्याने तिला जळगावला बोलावून घेतले. ती जळगावला आल्यानंतर त्याने तिच्याकडून गोड बोलून वेळोवेळी पस्तीस हजार व सत्तर हजार रुपये घेतले. आपल्याला त्याच्यासोबत लग्नच करायचे आहे असे समजून तिने देखील त्याला वेळोवेळी पैसे दिले. मात्र मार्च २०२मध्ये त्याने दुसऱ्याच तरुणीसोबत लग्न केल्याचे तिला समजले. त्याने परस्पर दुसऱ्या तरुणीसोबत लग्न केल्याचे समजल्यानंतर राजकुमारीला धक्काच बसला. त्यामुळे तिने त्याच्यापासून चार हात लांब राहणे पसंत केले. मात्र त्याने तिला त्रास देणे बंद केले नाही. तो तिची भेट घेण्यासाठी तिला सतत फोन करु लागला. मात्र ती त्याला टाळत होती. सप्टेंबर २०२० मध्ये त्याने तिला औरंगाबाद येथे बोलावले. आपण जर त्याला भेटण्यासाठी गेले नाही तर तो आपल्या गावात येवून आपली बदनामी करेन अशी राजकुमारीला भिती वाटत होती. त्यामुळे ती त्याला भेटण्यासाठी औरंगबादला गेली. तु मला हवी आहे, तु कुणासोबतही लग्न करु नको अशी धमकी देत त्याने तिच्यासोबत पुन्हा संबंध केले. तुझ्या गावी येऊन तुला मारहान करेन अशी धमकी त्याने तिला दिली. त्याच्या धमकीला घाबरुन ती त्याला भेटत होती. जळगाव येथे एका परिचिताच्या घरी तिला नेवून तिचे हातपाय बांधून त्याने तिच्यावर अत्याचार केला. ती पोलिस स्टेशनला जावू नये म्हणून त्याने तिला तिच्या गावी खासगी वाहनाने नेवून सोडले. भेदरलेल्या राजकुमारीने हा सर्व प्रकार घरातील सदस्यांना कथन केला. त्यांनी तिला धीर देत पोलिस स्टेशनला तक्रार दाखल करण्यास सांगितले. घरातील आईवडील व भावाने धिर दिल्याने तिचा जिव भांड्यात पडला. तिने जळगाव एमआयडीसी पोलिस स्टेशन गाठत जळगाव सामान्य रुग्णालयात नोकरीला असलेल्या संपत लक्ष्मण मल्हाड याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ६५३/२१ भा.द.वि. ३७६, ५०६ नुसार दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नि. प्रताप शिकारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक प्रमोद कठोरे व त्यांचे सहकारी हे.कॉ. सनी सोनार व प्रदीप पाटील करत आहेत. (या कथेतील पिडीतेचे राजकुमारी हे नाव काल्पनिक आहे.)

### मध्यरात्री दरोडेखोरांनी त्याचा घात...

बुधवार दि. २२ सप्टेंबर २०२१ रोजी रात्री नऊ वाजेच्या सुमारास दोघांनी जेवण आटोपले. त्यानंतर दोघे जण झोपी गेले. रात्री बारा वाजेनंतर सुरु झालेल्या २३ सप्टेंबरच्या मध्यरात्री व पहाटेच्या दरम्यान अचानक सहादू यांना त्यांच्या घराचा दरवाजा ढकलण्याचा आवाज आला. घराच्या पलंगाजवळ असलेल्या दरवाजाची कडी त्यांनी लावली होती. मात्र घराचा समोरचा दरवाजा लागत नसल्यामुळे त्याला वीट लावून त्यांनी बंद केला होता. काही वेळाने हिरुबाई यांना देखील आपल्या घराचा दरवाजा ढकलण्याचा आवाज आला. मात्र घराबाहेर बांधलेला बैल कदाचीत सुटला असेल असे त्यांना वाटले. त्यामुळे त्यांनी त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. थोड्यावेळाने पुन्हा दोघांना दरवाजा ढकलण्याचा आवाज आला. अखेर हिरुबाई यांनी धडपड करत अंथरुणातून उठत दरवाजाकडे जावून काय प्रकार आहे ते बघण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तिन इसम अचानक त्यांच्या घरात आले. आल्या आल्या त्यांनी घरातील वस्तूंची पाहणी सुरु केली. आपल्या घरात अचानक आलेल्या तिघा अनोळखी लोकांना बघून हिरुबाई घाबरल्या. आलेल्या तिघांपैकी एकाने हिरुबाईचे तोंड दाबले. त्यामुळे हिरुबाई अजूनच घाबरल्या. इतर दोघांनी घरातील वस्तूंची उलथापालथ करण्यास सुरुवात केली. एका जणाकडे धारदार हत्यार बघून हिरुबाईच्या मुखातून शब्द निघेनासा झाला. या गोंधळाच्या आवाजाने गाढ झोपेत असलेल्या सहादू खैरनार यांना जाग आली. समोर असलेल्या सर्वांना बघून त्यांनी दरडावण्यास सुरुवात केली. तुम्ही कोण आहात असा आवाज काढत त्यांनी हिरुबाईची घुसखोराच्या तावडीतून सुटका करण्यात यश मिळवले मात्र त्यांचा ताबा घुसखोरांनी घेतला. त्यांना घुसखोरांनी पकडून ठेवले. एकाने घरातील लोखंडी कुऱ्हाड हातात घेत सहादू यांच्या छातीवर व मानेवर हल्ला केला. या हल्ल्यात सहादू खैरनार जखमी झाले व जमीनीवर कोसळले. रक्तबंबाळ झाल्यानंतर परिस्थिती लक्षात घेत सर्वजण पळून गेले. सर्व जण पळून गेल्यानंतर एवढा वेळ निशब्द झालेल्या हिरुबाईं यांनी आक्रोश करण्यास सुरुवात केली. त्यांचा ओरडण्याचा आवाज ऐकून परिसरात राहणारा एक तरुण त्यांच्या घराच्या दिशेने धावत आला. रक्तबंबाळ अवस्थेतील सहादू यांची अवस्था बघून तो देखील घाबरला. त्याने इतर लोकांना बोलावून घेतले. बघता बघता परिसरातील लोक जमा होण्यास वेळ लागला नाही. या घटनेची माहिती जायखेडा पोलिसांना देण्यात आली. घुसखोर व चोरट्यांच्या हल्ल्यात कुऱ्हाडीचे घाव वर्मी बसल्याने झालेल्या अतिरक्तस्त्रावाने सहादू खैरनार मरण पावले. चोरीच्या उद्देशाने आलेल्या चोरट्यांनी सहादू यांची हत्या केली होती. दरम्यान सहादू खैरनार यांचा पुतण्या शेताकडे जात असतांना गस्तीवरील स.पो.नि. श्रीकृष्ण पारधी यांनी त्याला थांबवत त्याची विचारपूस केली. आपल्या काकांना शेतात कुणीतरी मारहाण केल्याबाबत त्याने स.पो.नि. पारधी यांना सांगितले. क्षणाचाही विलंब न करता स.पो.नि. पारधी यांनी घटनास्थळाच्या दिशेने धाव घेतली. त्याचवेळी दोघे संशयीत शेतातील पिकांमधून संशयास्पदरित्या पलायन करतांना त्यांना दिसले. त्यांचा पाठलाग करत असतांना एकाला पकडण्यात यश आले. दुसरा मात्र पळून जाण्यात यशस्वी झाला. याप्रकरणी हिरुबाई उर्फ रखूबाई सहादू खैरनार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञात तिघा आरोपींविरुद्ध जायखेडा पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. शेत विक्रीचे आलेले पैसे चोरी करण्याच्या उद्देशाने घरात आलेल्या मारेकऱ्यांनी सहादू रामचंद्र खैरनार यांचा खून केल्याची फिर्याद जायखेडा पोलिस स्टेशनला दाखल करण्यात आली. स.पो.नि. श्रीकृष्ण पारधी यांनी हा तपास आपल्याकडे घेतला. रात्रीच पंकज ऊर्फ सागर बाजीराव चौधरी (रा. नेर, ता.जि. धुळे) यास ताब्यात घेण्यात यश आले होते. त्याच्यासोबत असलेला त्याचा साथीदार मात्र अंधाराचा फायदा घेत पळून गेला होता. ताब्यातील पंकज उर्फ सागर बाजीराव चौधरी यास पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर त्याने आपला गुन्हा कबुल केला व इतर साथीदारांची नावे देखील कथन केली. मोबाइलच्या आधारे या खून प्रकरणातील एकुण आठ संशयितांना धुळे, मालेगाव, गुजरातमधील कच्छ, भुज येथून ताब्यात घेण्यात आले. पंकज ऊर्फ सागर बाजीराव चौधरी, रा. नेर, ता. जि. धुळे याने दिलेल्या माहितीच्या आधारे भुऱ्या ऊर्फ मुश्ताक सय्यद (रा. लळींग, ता. जि.धुळे), अंकुश दादाजी पवार रा.रावळगाव, ता. मालेगाव जि. नाशिक, विठ्ठल अर्जुन दळवी रा. रिटायर्ड वस्ती जळगाव ता. मालेगाव जि. नाशिक, काळू ऊर्फ बळीराम उत्तम सोनवणे रा. बोरमाळ ता. मालेगाव जि. नाशिक), अरुण ऊर्फ आऱ्या संतोष पवार रा. रावळगाव ता. मालेगाव जि. नाशिक, वसंत प्रभाकर सोनवणे (रा. रावळगाव ता. मालेगाव जि. नाशिक, सागर कैलास आहिरे रा. बोरमाळ अशा एकुण आठ जणांना अटक करण्यात आली. पोलिस अधीक्षक सचिन पाटील, अप्पर पोलिस अधीक्षक चंद्रकांत खांडवी, उपविभागीय पोलिस अधीक्षक पुप्पराज सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. श्रीकृष्ण पारधी यांनी तयार केलेल्या पथकातील सहकाऱ्यांनी सदर कारवाई केली. पोलिस उपनिरीक्षक तुषार भदाणे, उपनिरीक्षक नवनाथ रसाळ, हवालदार सुनील पाटील, गोपीनाथ भोये, निंबा खैरनार, उमेश पाटील, शिपाई गजानन गोटमवार, राजेंद्र सोनवणे, राहुल मोरे आदींनी या कारवाईत सहभाग घेतला.

### दोन लाखांवरून दोघांतला वाद खूपच...

त्याच्याकडे गिऱ्हाईक जास्त हे या धंदयातील समीकरण असल्याने कोवळ्या वयातील म्हणजे अगदी १३-१४ वर्षाच्या मुलीपासून ३५-४०शीतील महिलाकडून ती मालकीण धंदा करून आपले प्रस्थ निर्माण करते.त्याचबरोबर ती त्या तेथे वर्चस्व राहवे म्हणून चार दोन गुंड तर हाताशी धरते किंवा एखाद्याला नवरा मानून त्याला ठेवून तर घेते. सांगलीतील या दोन्ही नगरात बऱ्याच वेळेला मारामारी, खूनासारखे प्रकार घडले आहेत म्हणून हे दोन्ही परिसर संवेदनशील परिसर म्हणून ओळखले जातात. या वेश्या अड्ड्यावर कोणत्या ना कोणत्या कारणातून अघटित अशा घटना घडत असतात. मंगळवार दि.१२ ऑक्टोबर रोजी सकाळी गोकुळनगर येथील काली उर्फ काजल मोहन गुदरावत या ३५ वर्षीय महिलेचा तिच्याच ओढणीने गळा आवळून तिच्या मानलेल्या नवऱ्याने खून केला असलत्याचे उघडकीस आले.

तिचा खून करून त्याने तिच्या आत्महत्येचा बनाव केला. परंतू पोलीस तपासात ही आत्महत्या नसून खून असल्याचे स्पष्ट झाल्याने पोलीसांनी काजलच्या खून प्रकरणी संशयीत आरोपी जुनेद अब्दुलवाहीद सवार याला अटक करून ताब्यात घेतले. काली ऊर्फ काजल ही मुळची राजस्थानची असून ती गेल्या काही वर्षापूर्वी गोकुळनगर येथे वेश्या व्यवसायासाठी आली.ती दिसायला सेक्सी आणि मादक असल्याने तिच्याकडे सुरूवातीच्या काळात ग्रिहाईक ही जास्त होते. गेल्या १५ वर्षापासून ती या धंदयात असल्याने अनेकाच्यावर तिने आपली मदमस्त जवानी उधळत आजपर्यत बरेच पैसे कमविले होते. गेल्या १५ वर्षापूर्वी प्रेमप्रकरणात तिची फसगत झाल्याने तिच्या प्रियकराने तिला फसवून राजस्थानातून येथे आणले होते. त्यावेळेपासून ती गोकुळ नगरात राहत होती. त्यावेळी तिच्या प्रियकराने तिला त्याच्या ओळखीने तिला काही रकमेत विकले होते.त्यावेळी तिला काही एवढे समजत नव्हते. पुढे ती या धंदयात रूळल्यावर गोकुळ नगरात ती काजल भाभी नावाने फेमस झाली. तिच्याकडे बसायला लांब लांब ही तरूण वर्ग येत होता. ती त्याना त्याच्या मनाप्रमाणे सर्व्हिस देत होती. ती कधीच कोणाला नाराज करत नसल्याने तिच्याकडे गिऱ्हाईक वाढले होते. ती ज्या खोलीत मालकींणीकडे राहत होती. त्या मालकीणीला ही तिच्याकडून फायदा होत होता. गोकुळनगरातील एका इमारतीत काजल राहत असल्याने आणि तेथे सोयी सुविधा ही चांगली असल्याने कस्टमर ही गोकुळ नगर फिरून तिच्याकडेच बसायला येत होते. त्यामुळे तिचा चांगलाच भाव वधारला होता. एका कस्टमराला एका शॉटसाठी ती ३०० रूपये घेवू लागली होती. तिच्या जवानीच्या मानाने तिचा दर ही जास्त नव्हता. त्यामानाने ती सर्व्हिस ही देत होती. अलिकडच्या काही वर्षात त्याच इमारतीत तिने आपले वेगळेच बस्तान बसविले होते. ती धंदा करता करताच ती आता मालकींण बनली होती. तिच्या अंडरखाली आता पाच दहा मुली महिला होत्या. ती त्याचेकडून धंदा करून घेत होती. त्यातले कमिशन ती घेत होती. नाईटला जर कोणाला पाठवले तर त्यावेळी त्या महिलेकडून तिला ५०० ते १००० रूपये सहज मिळत होते. बघता बघता तिने या धंद्यात बक्कळ पैसा मिळवलेला होता. तिच्याकडे एक रेगुलर कस्टमर येत होता. त्याचे नांव जुनेद होते. तो खाणभाग खामकर गल्लीतील होता. तो तिच्यावर मनापासून प्रेम करीत होता. काजल त्याला आवडलेली असल्याने तो काजलकडे गोकुळनगरात आला की तिच्याकडेच बसत होता. तो तिच्याकडे नाईटसाठी ही थांबत होता. त्यातून त्या दोघांचे प्रेमसंबध फुलत होते. ती ही त्याच्यावर प्रेम करत होती. गेल्या एक दोन वर्षापासून तो गोकुळनगरात तिच्याकडेच राहत होता. तिने आता त्याला आपला नवरा मानला होता. त्यामुळे त्याचे संबंध वाढले होते. या वाढलेल्या संबंधातून त्याने तिच्याकडून हात उसणे दोन लाख रूपये ही घेतले होते. हे पैसे घेतेवेळी त्याने तिला लवकरच मी तुझे पैसे परत देतो असे सांगितले होते. गेल्या वर्षापासून काजल ही त्याला हात उसणे दिलेले पैसे परत मागत होती. जुनेद हा काही कामधंदा करीत नसल्याने त्याच्याकडे इतकी मोठी रक्कम परत दयायला ही नव्हते. त्यामुळे त्या दोघात आता दररोज या कारणातून भांडणे होत होती.त्यातच अलिकडील काही दिवसात काजलच्या बहिणीची दोन मुले ही तिच्याकडे राहयला आली होती. त्यामुळे त्याला त्या दोन्ही मुलाचा अडथळा वाटत होता.

काजलची बहिण ही नाशिकला राहत असल्याने त्या दोन्ही मुलांना तो नाशिकला पाठवून दे म्हणून सांगत होता.कुठला विषय तो कुठे तरी भांडणात नेऊन ठेवत होता. ती त्याच्याकडे दोन लाख रूपये मागू लागली की तो त्या दोन्ही मुलांचा विषय काढत होता. खरे तर तो तिच्याबरोबर फुकटच मजा मारत होता. ती ही त्याला नवराच मानत असल्याने तसले काही मनात ठेवत नव्हती. तिने ही प्रेमाच्या भरात त्याला पाहिजे तसे सुख दिले होते. तो तिच्या जवानीवर तुटून पडत होता. तिला तो आपल्या धाकात ठेवण्याचा प्रयत्न ही करत होता. खरे तर ती एक मुरलेली वेश्या होती. तिने त्याला जसे पैसे हात उसणे दिले होते. तसे ती त्याच्याकडून परत पैसे कसे काढून घ्यायचे हे तिला चांगलेच माहित होते. पण तिने त्याला नवरा मानलेला असल्याने ती गप्प राहत होती. पण याचा अर्थ जुनेद वेगळा काढत होता. ती परराज्यातून इथे धंदा करायला आली आहे. आपल्या शिवाय तिला कुणी वाली नाही त्यामुळे आपण तिला पैसे परत दिलो काय नाही काय अशा विचारात तो होता. त्या दोघांची भांडणे सुरू झाली की अख्खे गोकुळनगर जमा होत होते. भांडणात तो दारू पिऊन तेथे धिंगाणा घालू लागला की काजल त्याला मारहाण करीत होती. ती त्याला मारहाण करीत असताना आजुबाजूचे काही गुंड तरूण ही काजलची बाजू घेऊन जुनेद याला मारहाण करीत होते मार खाऊन ही तो परत तिच्या जवळच पडून राहत होता. तो सारखा दंगा मस्ती करीत असल्याने त्याच्या वागण्याचा विपरीत परिणाम काजलच्या धंदयावर होत होता. त्यामुळे ती त्याला तेथून हाकलून लावण्याचा प्रयत्न करीत होता. तो तेथून गेला की परत काही वेळात तेथे येत होता. सोमवार दि.११ ऑक्टोंबर रोजी रात्रीच्या सुमारास जुनेद हा तिच्याकडे दारूच्या नशेत आला. आल्या आल्या त्याने तिच्या बहिणीच्या मुलाच्यावरून त्याने तिच्याबरोबर भांडण काढायला सुरूवात केली. तो भांडण करीत असताना तिने धंद्याची वेळ असल्यानेत त्याला घरात बोलावून घेतले. उगाच बाहेर धिंगाणा नको, तो धिंगाणा करू लागला की नाईटला येणारे कस्टमर येणार नाहीत असा तिने विचार केला. तो तिच्या रुममध्ये आल्यावर तिने त्याच्या दोन कानाखाली लावून त्याला दोन लाख रूपये परत मागितले त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत पहिले दोन लाख रूपये दे नंतर त्या मुलाचे बोल. त्याला शिव्या देत तिने तू माझा लग्नाचा नवरा नाहीस त्यामुळे माझ्यावर वर्चस्व दाखवू नकोस तुझ्यासारखे मी दहा जणांना माझ्या खाली बांधून फिरते असे खडे बोल सुनावले त्यामुळे तो जास्तच तिच्यावर चिडला.वरच्या मजल्यावरील खोलीत ते दोघेच असल्याने त्याचेत हाणामारी सुरू झाली होती. जुनेदने जास्त दारू ढोसली असल्याने त्याच्या रागाचा पारावर उरला नाही. भांडणात त्याने तिच्या गळ्यातील ओढणीने तिचा जोरात गळा आवळला. ती त्यातून सुटण्याचा प्रयत्न करीत असताना त्याने पुर्ण ताकदीने तिचा गळा आवळून धरला.त्यासरशी ती तडफडत खाली पडली. ती निपचीप गार पडली असल्याने तो घाबरला. आपण गळा आवळल्याने तिचा मृत्यू झाला आहे हे त्याने ओळखले होते. आता आपली काही खरे नाही, यातून सुटण्याचा त्याने केविलवाणी प्रयत्न केला. तिचा खूनाचा प्रकार उघडकीस येवू नये म्हणून त्याने तिचा मृतदेह त्याच ओढणीने गळफास घेतलेल्या स्थिीतीत अडकविला.हे करीत असताना काजलच्या बहिणीचे दोन्ही मुले तेथे आले असता त्यांना समोरच्या प्रकार बघून धक्का बसला.जुनेदने त्या दोघांना धमकावत गप्प बसण्यास सांगून हा प्रकार कोणाला सांगितल्यास त्याना ही मारून टाकण्याची धमकी दिली. त्यानंतर तो तेथून कोणाला काही न सांगता पळून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी शेजाऱ्याच्या लक्षात हा प्रकार आला.काजल हिने आत्महत्या केली असावी असेच याना ही वाटत होते.त्यांनी या घटनेची माहिती लगेचच विश्रामबाग पोलीस स्टेशनला दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी घटनेचा आणि मयताचा पंचनामा करून मृतदेह सांगली सिव्हील हॉस्पिटलमध्ये शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. पोस्ट मार्टम रिपोर्ट मध्ये ही काजल हिचा गळा आवळल्याने मृत्यू अशी नोंद होती. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना या घटनेतील प्रत्यक्ष साक्षीदार असलेली मयत काजल हिच्या बहिणीची दोन्ही मुलांनी पोलीसांना सत्य परिस्थीती सांगून काकीकडे येणाऱ्या जुनेद यानेच तिला मारल्याचे सांगितले. यानंतर घटनास्थळावरून पसार झालेल्या जुनेद याच्या तपासासाठी पोलिसांची वेगवेगळी पथके तयार करून त्याच्या मार्गावर पाठवली. तो कुठे पळून जाऊ शकतो याचा पोलीसाना अंदाज होता. त्यातच काजलच्या शेजाऱ्याकडून ही काजलच्या आणि जुनेद सारव याच्या प्रेमप्रकरणाविषयी माहिती मिळाली होती.

या घटनेनतंर काही वेळातच पळून गेलेल्या जुनेद याच्या मुसक्या आवळ्या होत्या.त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे काजल गुदररावत हिच्या खूना विषयी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा मान्य करून तिने दिलेले दोन लाख रूपये ती परत मागत असताना झालेल्या भांडणातून आपण तिचा गळा ओढणीने आवळला असल्याचे पोलीसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी स्वत: या घटनेतील फिर्यादी होऊन काली उर्फ काजल मोहन गुदररावत (वय ३५) रा.मुळ राजस्थान सध्या रा.गोकुळनगर सांगली हिच्या खून प्रकरणी जुनेद अब्दुलवाहिद सवार (वय ३०) रा.खामकर गल्ली खाणभाग सांगली याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला मा.कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याला चार दिवस पोलीस कोठडीत सुनावली होती. पोलीस उपाधिक्षक अजित टिके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरी.एस.के पुजारी पो. निरी.अमितकुमार पाटील, स.पो.नी पल्लवी यादव, स्वप्नील कोळी, आदिनाथ माने यांनी केला.

18 TO 24 OCTOBER 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 16/10/2021 9:33 PM Page 1



# भिवंडीत पुन्हा एकदा आगडोंब, पन्नासहुन अधिक फर्निचर कारखाने आगीत जाळून खाक

**भिवंडी/अभिजित हिरे**



शहर व नजीकच्या गोदाम पट्ट्यात आगीच्या घटना नित्याच्या झाल्या असून शुक्रवारी रात्री अकरा वाजताच्या सुमारास भिवंडी ठाणे रस्त्यावरील कशेळी हद्दीतील चामुंडा कॉम्प्लेक्स येथील फर्निचर बनविणाऱ्या कारखान्यांना लागलेल्या आगीत तब्बल ५०हुन अधिक गोदाम जळून खाक झाली आहेत. या सर्व कारखान्यां मधून मोठ्या प्रमाणावर लाकूड, कापूस, फोम व रेकझीन साठविलेले असल्याने ही आग पाहता पाहता सर्व कारखान्यात पसरून सर्व कारखाने जळून बेचिराख झाले आहेत.या आगीची माहिती मिळताच भिवंडी कल्याण ठाणे येथील अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल होत त्यांनी आग विझविण्यास सुरवात केली. दरम्यान येथील आग ही शॉर्ट सर्किटने लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला जात असून सर्व कारखाने हे पत्र्याच्या शेड मध्ये असल्याने ही आग सर्वत्र पसरली ज्यामुळे कोट्यवधी रुपयांचे साहित्य कच्चा माल जळून खाक झाला आहे.घटनास्थळी पाण्याची उपलब्धता नसल्याने आग विझविण्यात अडथळा येत असल्याने पाणी नियमित उपलब्ध झाल्यास पहाटे ५ वाजता पर्यत आग पूर्णतः नियंत्रणात येईल अशी माहिती ठाणे बाळकुम अग्निशामक केंद्रातील अधिकारी हिंदुराव बोंडवे यांनी दिली आहे. विशेष म्हणजे हे सर्व कारखाने खाडी लगत पत्र्याच्या शेड मध्ये बनविण्यात आल्याने हे अनधिकृत बांधकाम असल्यास तेथील सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार हा प्रश्न असून यांना परवाना दिला कोणी या बाबत साशंकता व्यक्त केली जात आहे. दरम्यान ही आग नियंत्रणात असून पहाटे ५ वाजता पर्यत आग पूर्णतः आटोक्यात येईल अशी शक्यता वर्तवली जात असून सुदैव म्हणजे या आगीत कोणतीही जीवित हानी झाली नाही.

# जिल्हा कारागृह कायदेविषयक जनजागृती आरोग्य शिबीर संपन्न

**लातूर/प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार आजादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमाअंतर्गत लातूर जिल्हयामध्ये गावोगावी कायदेविषयक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त लातूर जिल्हा कारागृह, लातूर येथे कायदेविषयक जनजागृती व आरोग्यविषयक शिबीर संपन्न झाले. लातूर जिल्हा कारागृह, लातूर येथे कायदेविषयक जनजागृती शिबीर व बंद्यासाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात बलभीम माळी, तुरुग अधिकारी, डॉ. सुधीर बनशेळकीकर, पॅनल ॲड. रमेश कुचमे, ॲड. अजय कलशेट्टी व लातूर जिल्हा कारागृहातील बंदी उपस्थित होते. या शिबीरात डॉ. सुधीर बनशेळकीकर यांनी बंद्याचे रक्त व लघवी, बिपी, शुगर इ. ची तपासणी केली, याच बरोबर बंद्याची प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी तसेच रक्तवाढीसाठी बंद्याना ३ महिन्याकरिता गोळयांचे वाटपही करण्यात आले. या कार्यक्रमात अजय कलशेट्टी यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणा मार्फत बंद्याना पुरविण्यात येत असलेल्या कायदेविषयक सेवांविषयी मार्गदर्शन केले. ॲड. रमेश कुचमे यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कायदा व बंद्यांना कायदेविषयक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. अजय कलशेट्टी यांनी केले. कायदेविषयक जनजागृती व आरोग्य शिबीर या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विधी सेवा प्राधिकरण लातूर येथील न्यायिक कर्मचारी, पॅनल विधीज्ञ व तुरुंगाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# भिवंडी पालिका अग्निशामक दलाच्या ताफ्यात दोन नव्या गाड्या दाखल!



**भिवंडी/प्रतिनिधी**

महानगरपालिका अग्निशामक दलात असलेली वाहने जुनी व नादुरुस्त झाल्याने अवघी दोनच वाहने आगीसह आपत्ती व दुर्घटनांच्या प्रसंगी उपलब्ध होत असल्याने अनेक वेळा अग्निशामक दलाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले जात असताना पालिका प्रशासनाने नव्याने दोन अग्निशामक दलाच्या वाहनांची भर पडली असून विजयादशमीच्या मुहूर्तावर महापौर प्रतिभा पाटील, आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या शुभहस्ते या वाहनांचे पूजन करीत ही वाहने अग्निशामक दलाच्या ताफ्यात समाविष्ट केली आहेत.

# झुंज दुर्घटनेतील ११ कुटुंबातील व्यक्तींच्या परिवाराला धनादेश वाटप

**वरुड/प्रतिनिधी**



श्री क्षेत्र झुंज ता.वरुड येथील वर्धा नदित नाव उलटल्यामुळे पाण्यात बुडून मृत पावलेल्या कुटूंबातील व्यक्तींचे नातेवाईकांना सानुग्रह अनुदान मंजूर करण्याची मागणी मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उप मुख्यमंत्री अजित पवार, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार, मदत पुनर्वसन राज्यमंत्री प्रजक्त तनपुरे, पालकमंत्री यशोमतीताई ठाकूर, प्रधान सचिव आपत्ती व्यवस्थापन मदत पुनर्वसन असीम गुप्ता, यांच्याकडे केली होती.

झुंज दुर्घटनेतील कुटूंबाना दुखातुन सावरण्यासाठी मुख्यमंत्री ठाकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी आमदार देवेंद्र भुयार यांच्या मागणीची दखल घेऊन मुख्यमंत्री सहायता निधी मधून या दुर्घटनेमध्ये मृत पावलेले नारायण सोनाजी मटरे, वंशीका प्रदीप शिवणकर, किरण विजय खंडाळे, आदिती सुखदेव खंडाळे, मोहिनी सुखदेव खंडाळे, पियुष तुळशिदास मटरे, पुनम प्रदिप शिवनकर, आश्वीनी अरुन खंडाळे, वृषाली अतुल वाघमारे, अतुल गणेशराव वाघमारे, कु.निशा नारायण मटरे, या ११ व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लक्ष रुपये प्रमाणे एकून २२ लक्ष रुपये मदत तात्काळ मंजुर करून दिल्यामुळे झुंज येथील दुर्घटनेत मृत पावलेल्या व्यक्तींच्या परिवारातील कुटुंबांना प्रत्येकी २ लक्ष रुपयांचे आर्थिक सहाय्य अनुदान धनादेश आमदार देवेंद्र भुयार यांच्याहस्ते वितरित करण्यात आले. यावेळी आमदार देवेंद्र भुयार, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र बहुरूपी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष बाळू कोहळे पाटील, तहसीलदार मालठाणे, राजेंद्र कुकडे, संकेत यावलकर राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक अध्यक्ष,निखिल बनसोड, गणेश चौधरी, सरपंच सागर हरले, सचिन सावरकर, दादाराव कुकडे, रोषण माटे, यांच्यासह आदी नागरिक उपस्थित होते.

# मंगळसूत्र दोघा चोरट्यांना सोलापूर शहर गुन्हे शाखेने केले जेरबंद



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरात गौरी गणपती सणाच्या दिवशी मंगळसूत्र दोघा चोरट्यांना सराईत चोरट्यांना सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून त्यांच्याकडून पाच गुन्हे उघडकीस केले आणि गुन्ह्यातील ३ लाख २० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संतोष व्यंकट भोगीले (वय २८, राहणार घोटाळ, ता. बसवकल्याण, जि.बिदर, राज्य कर्नाटक), श्रीनिवास जनार्दन माने (वय २१, रा. उमरगा, जि. उस्मानाबाद) असे अटक करण्यात आलेल्या सराईत दोघा गुन्हेगारांची नावे आहेत. याबाबतची अधिक माहिती अशी की, सोलापूर शहरात गौरी-गणपतीच्या सण साजरा होत असताना महिलांनी मोठ्या हौशीने दागिने घालून एकमेकांच्या घरी भेटी देण्यात जात असताना एकाच दिवशी १३ सप्टेंबर २०२१ रोजी मोटरसायकल वरील दोघांनी चोरट्यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे, फौजदार चावडी पोलीस ठाणे आणि जोडभावी पेठ पोलीस ठाणे अशा तीन पोलीस ठाण्याच्या हद्दीत चार ठिकाणी महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसका मारून चोरून घेऊन गेले होते. याबाबत सोलापूर शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय साळुंखे यांनी या गुन्ह्याबाबत गांभीर्य ओळखून तपास करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके यांनी त्यांच्या बातमीदारांमार्फत माहिती काढली ती सोनसाखळी चोरटे त्यांच्याकडील सोने विक्रीसाठी सोलापूर शहरात येत आहेत या बातमीवरून दोघांना संशयित म्हणून ताब्यात घेऊन तपासणी केली असता त्यांच्याकडील मोटरसायकल ही चोरीची असल्याचे उघडकीस आले त्यांची कसून चौकशी केल्यावर त्यांनी वरील प्रमाणे चार ठिकाणी सोनसाखळी चोरीचे गुन्हे केल्याचे कबूल केले. त्यांनी दुचाकी गुलबर्गा जिल्ह्यातून चोरी केल्याचे आणि ती सोनसाखळी चोरी करण्यासाठी वापरल्याचे कबूल केले. त्यांच्याकडून चोरीतील एक दुचाकी आणि सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख २० हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. ही कामगिरी शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके यांच्या पथकाने केली आहे.

# उल्हासनगरमध्ये पोलिसावर जीवघेणा हल्ला

**उल्हासनगर/किरण तेलगोटे**



उल्हासनगरमध्ये कर्तव्यावर असलेल्या पोलिसांवर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना उल्हासनगरात घडली आहे. यात विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार गणेश डमाले हे गंभीर जखमी झाले असून सध्या त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. उल्हासनगरच्या कॅम्प-४ भागात गुरुवारी मध्यरात्री हा प्रकार घडला. याठिकाणी पैशांच्या व्यवहारातून दोन गटात तुंबळ हाणामारी सुरु होती. दोन्ही गटांनी एकमेकांवर हत्यारं उगारली होती. त्याचवेळी पोलीस अंमलदार गणेश डमाले आणि गणेश राठोड हे गस्तीवर होते. हाणामारीचा प्रकार बघून त्यांनी तो थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र यावेळी त्यातील एका गटाने थेट पोलिसांवरच चाकूने वार करत त्यांना गंभीर जखमी केलं. शस्त्र नसतानाही त्यांनी हिंमतीनेमध्ये पडत हा हल्ला थांबवण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात पोलीस अंमलदार गणेश डमाले हे गंभीररित्या जखमी झाले आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, पोलिसांनी मध्यस्थी केली नसती, तर दोन्ही गटातील लोकांच्या हत्या झाल्या असत्या, अशीही माहिती समोर आलीये. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपींना पडण्यासाठी ४ पथके रवाना करण्यात आली असून लवकरच अटक केली जाणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांनी दिली.

# भिवंडीतील शिवसेना आमदारांना माहिती देण्यास प्रांताधिकारी कार्यालयाची टाळाटाळ

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी प्रांताधिकारी कार्यालयाच्या अखत्यारीत अनेक शासकीय प्रकल्प येत असून या प्रकल्पांमध्ये अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित झाल्या आहेत या बाधित जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना देतांना भिवंडी प्रांताधिकारी कार्यालयातून पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी भिवंडी ग्रामीण शिवसेनेनेचे आमदार शांताराम मोरे यांच्याकडे आल्याने बाधित जमीन प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना किती व कसा मोबदला प्रताधिकार कार्यालयाकडून देण्यात आला आहे याची माहिती आमदार शांताराम मोरे यांनी लेखी पत्राद्वारे भिवंडी प्रांताधिकारी कार्यालयाकडून मागितली आहे तसेच सण २०१९-२० मध्ये प्रांताधिकारी कार्यालयात संगणक व प्रिंटर खरेदीत देखील भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी देखील आमदार शांताराम मोरे यांच्याकडे आल्याने या वस्तू खरेदी बाबतची माहिती देखील आमदार शांताराम मोरे यांनी लेखी निवेदनाद्वारे भिवंडी प्रांताधिकारी कार्यालयाकडे मागितली आहे. मात्र आमदारांच्या पात्राला प्रताधिकार कार्यालयाने केराची टोपली दाखवली असून तब्बल दिड महिन्यांपासून माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याने भिवंडी प्रांताधिकारी कार्यालयातून झालेल्या व्यवहारांच्या बाबत येत्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित करणार असल्याची माहिती आमदार शांताराम मोरे यांनी दिली आहे.

# देवणी पोलिसांनी अजनीतील गाय चोरीचा गुन्हा फिर्यादीच्या अर्जानुसार न करता पोलीस पाटलाच्या सांगण्यावरून केला!

**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे अजनि येथील शेतकरी राम माधवराव रामतिर्थे यांची अजणी पाटीजवळ उदगीर-निलंगा रोड लगत पाच एकर शेती आहे. शेतामध्ये जनावरांसाठी मोठा गोठा बांधला आहे दिनांक १७/०९/२०२१ रोजी दिवसभर शेतात काम करून संध्याकाळी जनावरे शेतातील गोठ्यात बांधून जेवण करण्यासाठी घराकडे गेले, परंतु शुक्रवारी पहाटे शेतकरी रामतिर्थे शेतात आले असता गोठ्यातील दाराचे कुलुप तोडल्याचे लक्षात येताच गोठ्यामध्ये जाऊन पाहिले असता गोठ्यातील देवणी जातीची गाय अंदाजे साठ हजार रुपये किमतीची गाय चोरीला गेल्याचे लक्षात आले. गाय चोरी करणारा अजनी गावातीलच कुख्यात गुंड पाशर्वभुमी असलेला व विविध पोलिस विविध स्वरुपाचे गंभीर गुन्हे दाखल असलेले भिम दत्तु अशोकवाड व त्याची बहिण शालीका दत्तु अशोकवाड यांना शेतकरी रामतिर्थे यांनी गाय चोरी बद्दल विचारले असता तुझी गाय कुठेही गेली नाही उदगीर येथे पाठविण्यात आली आहे, तु पैशाची तडजोड कर मी गाय आणुन देतो असे त्यांनी शेतकरी रामतिर्थे यांना सांगितले असता, त्याच दिवशी शुक्रवारी रात्री दहा वाजता शेतकरी रामतिर्थे यांनी अजणी गावातील पन्नास ते साठ लोक सोबत घेऊन भिम दत्तु अशोकवाड याला पकडून देवणी पोलीसात आणले आसता, त्या ठिकाणी दिवटीवर असलेला ठाणे अमंलदार याने आज ठाणेदार नाहीत भिम आशोकवाड याला गावाकडं घेऊन जा म्हणाल्याने शेतकरी रामतिर्थे यांनी ठाणे अमंलदार यांना सांगितले कि गाय चोरी करणारा हाच अरोपी आहे. आताच याला तुमच्या कडे पोलीस स्टेशमध्ये राहु द्या अशी विनवणी रामतिर्थे यांनी केली आसता सदरील दिवटीवर असलेला ठाणे अमंलदार म्हणाला कि भिम दत्तु अशोकवाड याला जावु द्या! कोठुणही आम्ही याला पकडून आणु, तुम्ही उद्या या असा शब्द दिल्यामुळे शेतकरी रामतिर्थे पोलीस ठाण्यातुन निघुण गेले. परत शनिवारी देवणी पोलीसांत रामतिर्थे यांनी तक्रार अर्ज घेऊन गेले असता रामतिर्थे यांचा तक्रार अर्ज बाजुला ठेवून देवणी पोलीसांनी अजनी गावातील सध्या कार्यरत असलेल्या पोलीस पाटील यांच्याशी मोबाईलवरुण चर्चा झाल्यानुसार आपल्या व अजणी गावातील पोलीस पाटील यांच्या मर्जीने व सोयीनुसार अर्ज तयार केले व अनोळखी अरोपी म्हणून व साठ हजार रुपयाची गाय किंमत असता फक्त दहा हजार रुपये म्हणून एफ आय आर फाडले असल्याचे वरील सर्व माहिती शेतकरी राम माधवराव रामतिर्थे यांनी पोलीस अधिक्षकांना दिलेल्या तक्रार अर्जात म्हणले आहे? दरम्यान भिम दत्तु अशोकवाड याची पाठराखण करणाऱ्या अजणी गावातील सध्या कार्यरत असलेल्या पोलीस पाटलाची पण चौकशी व्हावी. तसेच या पोलीस पाटलाने आजपर्यत किती गुन्हेगार वाचविले आहे, हे सत्य बाहेर यावे अशी मागणी सुजान नागरीका मधुन केली जात आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### पूरग्रस्तांसाठी १० हजार कोटींचे अर्थसहाय्य

मुंबई : राज्यातील अतिवृष्टी व पुरामुळे शेती पिकाच्या झालेल्या नुकसानीपोटी १० हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी चर्चा करून मंत्रिमंडळ बैठकीत यासंदर्भात घोषणा केली. राज्यात जून ते ऑक्टोबर २०२१ पर्यत अतिवृष्टी त्याचप्रमाणे पुरामुळे ५५ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील शेती पिकाचं नुकसान झाले. या नैसर्गिक संकटामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या निकषांची वाट न पाहता १० हजार कोटींचे अर्थसहाय्य (पॅकेज) जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही मदत पुढीलप्रमाणे राहील. जिरायतीसाठी १० हजार रुपये प्रति हेक्टर, बागायतीसाठी १५ हजार रुपये प्रति हेक्टर, बहुवार्षिक पिकांसाठी २५ हजार रुपये प्रति हेक्टर. ही मदत २ हेक्टर मर्यादित करण्यात येईल.

### बिगर नेट, सेट अध्यापकांना सेवानिवृत्तीचे लाभ

मुंबई : राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील बिगर नेट तसेच सेट अध्यापकांना निवृत्तीवेतनाचा लाभ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. जे अध्यापक २३ ऑक्टोबर १९९२ ते ३ एप्रिल २००० या कालावधीत नियुक्त होते अशांना हे निवृत्तीवेतन देण्यात येईल. शासन निर्णय १८ ऑक्टोबर २००१ व २७ जून २०१३ नुसार उपरोक्त कालावधीतील बिगर नेट सेट अध्यापकांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यत सुरु ठेवण्यात आल्या असल्याने त्यांच्या मूळ नियुक्तीचा दिनांक गृहीत धरुन सेवानिवृत्ती वेतन देण्यात येईल.

### मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक कृती योजना

मुंबई : मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृती योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यात राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृती योजना (NPDDR) ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. ही योजना २०२३ पर्यत राबविण्यात येणार आहे. योजनेच्या १३ कोटी ७० लाख रुपये खर्चासही मंजूरी देण्यात आली. मादक पदार्थांचा गैरवापर, त्यांचे सेवन या समस्या वाढू लागल्या आहेत. या समस्येच्या मुख्य कारणांमध्ये मुख्यत: मानसिक तणाव, जीवनशैलीतील बदल, सामाजिक व आर्थिक विवंचना आदी कारणे आहेत. त्यासाठी योजना तयार करुन त्यास प्रतिबंध घालणे ही काळाची गरज आहे. नागरिकांचे आरोग्य, पोषण आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच मद्यपान, आणि अंमली पदार्थांचे सेवन टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या लागणार आहेत. त्यादृष्टीने सामाजिक न्याय विभागामार्फत ही कृती योजना राज्यात राबविली जाणार आहे.

### महिला लोकशाही दिन महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी

पालघर : महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास शासन विभाग निर्णय क्रमांक मलोदि-२०१३/प्रक्र.११/मक/दिनांक:- ०४/०/२०१३ अन्वये जिल्हा स्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच या महिन्याचा महिला लोकशाही दिन हा १८/१०/२०२१ रोजी जिल्हाधिकारी सो. पालघर येथे आयोजित करण्यात येत आहे. महिला लोकशाही दिनाचा अर्ज जिल्हाधिकारी सो. यांना उद्देशून असावा. तालुका महिला लोकशाही दिन टोकन क्रमांक व तहसीलदार यांच्या उत्तराची प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवसाच्या अगोदर अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, मातोश्री बंगला, आर्यन ग्राउंड च्या शेजारी, विष्णू नगर रोड, लोकमान्य पाडा, पालघर इमेल- dwcdopalghargmail.com फोन नं. ०२५२५-२५७६२२ यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह सादर करावा. असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पालघर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

### नांदगावच्या सरपंचा विरोधात गुन्हा दाखल

लातूर : गावातील भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची ज्यांच्यावर जिम्मेदारी असते त्यात सरपंचाने चार महिन्यापुर्वी झालेला सिमेंट रस्ता चक्क जेसीबीच्या साह्याने उकडून टाकल्याचा प्रताप लातूर तालुक्यातील नांदगाव येथे समोर आला असुन या प्रकरणाच्या विरोधात ग्रामसेवकाने पोलीसात धाव घेतल्याने सरपंचांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत थोडक्यात माहिती अशी की लातूर येथून जवळच असलेल्या नांदगाव येथे चार महिन्यांपूर्वी जन सुविधा योजने अंतर्गत शिवाजी साळुंके यांच्या घरापासून भागवत ढमाले यांच्या घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता मंजूर झाला होता. व शासनाच्या अंदाज पत्रकाप्रमाणे तो तयार ही करण्यात आला होता. मात्र २४ सप्टेंबर रोजी येथील सरपंच महादेव रामकिशन ढमाले यांनी सुधाकर पाटील यांच्या घरासमोरील रस्ता जेसीबीच्या साह्याने उखडून टाकल्याचे निदर्शनास आल्याने ग्रामसेवक प्रसाद देशपांडे यांच्या तक्रारीवरून लातूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात सार्वजनिक रस्ता संपत्तीचे नुकसान केल्याप्रकरणी सरपंच महादेव रामकिशन ढमाले यांच्याविरूद्ध कलम ४२७,४३१,३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ॲड.महेश पाटील आलमलेकरांना अखेरचा निरोप

लातूर : औरंगाबाद खंडपीठात वकीली करणारे आलमलाचे सुपूत्र ऍड.महेश शिवाप्पा पाटील आलमलेकर यांचे गुरुवार,दि.१४ ऑक्टोबर२०२१ रोजी पहाटे अचानक ह्रदयविकाराच्या तीव्र झटक्याने लातूर येथील निवासस्थानी निधन झाले. मृत्युसमयी ते ४५ वर्षांचे होते. दिवंगत ऍड.महेश पाटील यांच्या पार्थीवावर आजच सायंकाळी आलमला ता.औसा येथील शेतीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ असा परिवार आहे. अंत्यसंस्कार समयी डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर, लातूर मनपा स्थाई समिती सभापती ॲड.दिपक मठपती, मनपा विरोधी पक्ष नेते ॲड.दिपक सुळ, औसा तालुका कॉंग्रेस अध्यक्ष शेषराव पाटील, बाबासाहेब कोरे, सुभाषअप्पा मुक्ता, सिध्देश्वर सहकारी बँकेचे चेअरमन शिवकुमार पाटील रायवाडीकर, अशोक गोविंदपूरकर, संगीत रंदाळे, लातूर व औरंगाबाद न्यायालयातील अनेक वकील, लातूर व आलमला येथील सर्व स्थरातील असंख्य आप्तेष्ट उपस्थित होते. ॲड. महेश पाटील आलमलेकर यांच्या अकाली निधनाबद्दल हळहळ व्यक्त होत आहे.

18 TO 24 OCTOBER 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 16/10/2021 9:33 PM Page 1



# कोळशाने तोंड काळे!

ऐन दिवाळीच्या तोंडावर भारतात जे वीज टंचाईचे संकट निर्माण झाले आहे ते किती गंभीर आहे, हे येत्या काही दिवसात कळेल. कारण महाराष्ट्रासह देशातील बहुतेक राज्यांमध्ये कोळशाची भीषण टंचाई जाणवत असल्याने त्यात्या राज्यातील काही औष्णिक वीज निर्मिती केंद्र बंद पडलीत, तर काही बंद पाण्याच्या मार्गावर आहेत. जर ही वीज निर्मिती केंद्र कोळशाच्या अभावी बंद पडली, तर देशात हाहाकार माजेल. उद्योगधंदे बंद पडतील. अगोदरच कोरोनाने देशाचा आर्थिक कणा मोडला आहे, त्यात आणखी वीज टंचाईचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेला रसातळला नेऊ शकतो. त्यामुळे राज्यकर्त्यांची झोप उडाली आहे. कोळसा टंचाईची अनेक कारणे आहेत यापैकी एक आहे कोल इंडियाची विविध राज्यातील वीज निर्मिती कंपन्यांकडे असलेली २१६२९ कोटींची थकबाकी. यात महाराष्ट्राकडे सर्वाधिक म्हणजे ३,७०० कोटीहून अधिक थकबाकी आहे. त्या खालोखाल उत्तर प्रदेश सरकारकडे २७2000 कोटींची थकबाकी आहे. राजस्थान आणि तामिळनाडू या अन्य दोन राज्यांकडे सुद्धा एक हजार कोटी पेक्षा अधिक थकबाकी आहे. थकबाकीचा हा डोंगर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यामुळे कोळशाच्या खाणी चालवणे आणि त्यातून कोळशाचे उत्पादन घेणे दिवसेंदिवस अवघड बनले आहे असे एकायला मिळतेय की खाण माफियांनी कोळशाचा स्टॉक करून कृत्रिम कोळसा टंचाई निर्माण केली आहे, तसे असेल तर ते आणखीनच भयंकर आहे. बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल यासारख्या कोळसा उत्पादक राज्यांवर केंद्राचे फारसे नियंत्रण नसल्याने देशात ७६ हजार कोटींचा कोळसा घोटाळा झाला होता. कोळशाच्या या दलालीत थेट तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांच्या पासून अनेक नेत्यांचे हात काळे झाले होते. कदाचित सध्याची कोळसा टंचाई ही त्याचाच परिणाम असू शकेल. सध्या देशातील वीज उत्पादक कंपण्याकडे पुढील चार दिवस पुरेल इतका ७२ लाख टन कोळसा आहे, तर कोल इंडियाकडून ४०० लाख टन कोळसा आहे. त्यामुळे सहसा भारनियमनाची पाळी येणार नाही. शिवाय कोळशाचे उत्पादनही वाढले आहे. मात्र तरीही सर्व राज्यांनी विजेचा मर्यादित वापर करावा असे आवाहन केंद्राने सर्व राज्यांना केले आहे. आपल्या देशात शहरी भागात विजेचा वापर अमर्याद होत असतो, त्यामुळे हे कुठे तरी थांबायला हवे. आणि मुख्य म्हणजे ज्या राज्यांकडे कोल इंडियाची थकबाकी आहे त्यांनी ती त्वरित भरायला हवी. पण आपल्या कडे वसुलीचे गणितच न सुटण्यासारखे आहे. वीज कंपन्यांमध्ये काम करणारे अधिकारी आणि कारखानदार यांचे साटेलोटे असल्याने कारखान्यांनी कितीही आणि कशीही वीज वापरली, तरी त्यांना कुठे बिल भरायचे आहे. वीज खात्यातील अधिकाऱ्यांचे हात ओले करून थकबाकीचा डोंगर वाढवता येतो. त्यामुळे महाराष्ट्राचे ऊर्जा खाते आणि वीज उत्पादक कंपन्या नेहमीच तोट्यात असतात आणि तोट्यात असल्याने त्यांना कोल इंडियाचे बिल देता येत नाही. कोळसा उत्पादन आणि वितरणातील हा सगळा काळा खेळच सरकारच्या अब्रूंचा कोळसा करायला कारणीभूत आहे.

# धर्म संस्कृतीत भेदभाव का?

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

भारत हा धर्म निरपेक्ष देश आहे आणि तीच त्याची खरी ओळख आहे आणि भारताची हीच ओळख कायम राहायला हवी. पण भाजप सत्तेत आल्यापासून भारताची ही ओळख पुसली जाते की काय अशी भीती वाटायला लागली आहे. कारण इथे हिंदू आणि मुस्लिम हे दोन्ही समाज आप आपल्या संस्कृतीचे स्तोम माजवताना इतर धर्मियांच्या अस्तित्वाला दुय्यम लेखण्याचे प्रयत्न करीत आहेत हे भारताच्या लोकशाही आणि सार्वभौमत्वासाठी धोकादायक आहे. भारतीय घटनेने धार्मिक स्वातंत्र्य दिले याचा अर्थ एखाद्या मोठ्या समाजाने आपल्या धर्माची मक्तेदारी दाखवून इतर धर्मियांना आपल्या दबावाखाली ठेवणे असे नाही. या देशाच्या इतिहासावर नजर टाकल्यास एक गोष्ट स्पष्टपणे दिसेल की या देशात हिंदू आणि मुसलमान सोडले तर कुठल्याही धर्माच्या लोकांमध्ये जातीय दंगली झाल्या नाहीत आणि होणारही नाहीत. इथे हिंदू व मुस्लिम यांच्यासह सिख, जैन, बौद्ध, क्रिश्चन, पारसी आदी धर्माचे लोकही राहतात. पण त्यांनी कधीच इथे जातीय तणाव निर्माण केला नाही किंवा त्यांच्यामुळे देशाच्या ऐक्य आणि अखंडतेला धोका निर्माण झाला नाही. पण हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील तणावामुळे देशाची एक फाळणी झाली तरीही या दोन समाजात फारशी सद्भावना आणि सलोखा निर्माण झाला नाही आणि त्यांच्यातील तणावाचे परिणाम इथल्या इतर धर्मियांना भोगावे लागत आहेत. दसऱ्याच्या निमित्ताने सर संघ चालक मोहन भागवत यांनी एक विधान केले आहे की आम्हाला अशी संस्कृती नको जी विभाजन वाढवते. त्यांचं हे वाक्य हिंदू संस्कृतीच्या काहीस विपरीत आहे. हिंदू धर्मातील वर्ण वाद, हिंदू धर्मातील मनुवाद काय सांगतो, ते अगोदर स्पष्ट करावे. धर्मातील विभाजन वाढवण्याची दीक्षा ज्यांना मनू कडून मिळाली अशा लोकांनी धार्मिक विभाजनाबद्दल बोलणे योग्य नाही. आणि जर बोलायचे असेल तर हिंदू धर्मातील वर्ण व्यवस्थेची उतरंड अगोदर अमान्य करा. मनू वाद कायमचा नष्ट करा आणि त्यानंतर हिंदू धर्मातील सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्र आणण्यासाठी उच नीच जाती पातीच्या घाणेरड्या संकल्पनांच्या भिंती तोडून टाका कारण मनू वाद, वर्णभेद यामुळेच हिंदू धर्माचं विभाजन झालंय हे वास्तव जोवर संघवाले मान्य करीत नाहीत, तोवर त्यांच्यात वैचारिक सुधारणा होणार नाही आणि हिंदू धर्म एकसंघ राहणार नाही आणि जे लोक हिंदूंना एकसंघ ठेऊ शकत नाहीत त्यांनी देशाला एकसंघ ठेवण्याच्या बाता मारू नये हा देश एकसंघ आहे आणि यापुढेही एकसंघ राहील. कारण विभाजनाची परिस्थिती निर्माण करणाऱ्या हिंदू आणि मुस्लिमांच्या मधे शांततेने जीवन जागणारे आणि देशाच्या अखांडतेसाठी समर्पित असलेले शीख, बौद्ध, जैन, पारशी क्रिश्चन यासारखे इतर धर्मीय उभे आहेत हे हिंदू आणि मुस्लिम दोघांनीही समजून घ्यावे. आम्ही एका फाळणीचे चटके सोसले आहेत त्याच्या जखमा अजूनही ताज्या असताना धर्माच्या नावावर आणखी दुसरी फाळणी नको. जात, धर्म, परंपरा हे तुमच्या घरा पुरतं ठेवा कारण हा देश. जसा हिंदू आणि मुसलमांनाचा आहे तसाच तो शीख, क्रिश्चन, बौध्द, जैन यांचाही आहे आणि हे सर्व शांतता प्रिय लोक आहेत. त्यांचा अहींसेवर विश्वास आहे. भलेही हिंदू, मुसलमान यांच्या तुलनेत त्यांची संख्या कमी असली तरी तेही या देशाचे नागरिक आहेत आणि त्यांना शांततेने जगायचे आहे. रस्त्यावर उतरून धर्माचा बाजार मंडणाऱ्यानी शांततेने जगणाऱ्यांच्या जीवनात व्यत्यय आणू नये. आज जग खूप पुढे गेलंय. विज्ञानाच्या जोरावर माणसाने खूप प्रगती केलीय आणि या प्रगतीचा जाती धर्माशी दुरान्वयही संबंध नाही. जगात काही इस्लामी देशांनी धर्माला सर्वस्व मानले. पण त्यांची आज काय हालत झाली आहे त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे पाकिस्तान! याउलट युरोप खंडातील छोट्या छोट्या देशांच्या प्रगतीकडे बघा. तिथे धर्म, जाती वर्ण यांना कवडीचीही किंमत नाही, म्हणून त्यांची प्रगती झाली आणि आम्ही धर्म संस्कृतीला कवटाळून बसलो आहोत, म्हणून आमची अधोगतीकडे वाटचाल सुरू आहे. धर्म संस्कृती आणि विकास कधीही एकत्र नांदू शकत नाही याचे भान भागवत आणि त्यांच्या संघवल्यानी ठेवावे आणि नंतरच विभाजनांबाबतचे उपदेश करावेत!

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**




# फेसबूक समाजघातकी बनत चाललंय का?

**दिशायन**

फेसबूक हे एकूणच सोशल मिडियात सर्वात प्रभावशाली आहे. संपूर्ण जगात फेसबुकचा उपयोग हिंसा, दंग्यांना प्रोत्साहन देण्यासाठी केला जात आहे. सरसकट एखादा धर्म, एखादा समाजगट वाईट ठरवून त्याच्याबद्दल खोटी माहिती आणि द्वेष पसरवणाऱ्या पोस्ट सर्रास फेसबूकवरुन पसरवल्या जातात. त्यातल्या जेमतेम काही पोस्टना फेसबूक रोखतं किंवा त्यांच्यावर त्या अयोग्य असल्याचं लेबल चिकटतवतं.

शाळकरी किशोरवयीन मुले-मुली यांच्यासाठी इन्स्टाग्राम धोकादायक बनलं आहे, ॲपवरील छायाचित्रांमुळे मुले विशेषत: मुली मनोरोगी बनत चालले आहेत, हिंसा वाढवणाऱ्या गटांवर कारवाई करत नाही इत्यादी बाबी फेसबुकच्या कर्मचाऱ्यांनी बनवलेल्या कंपनीच्या अंतर्गत गुप्त अहवालात नमूद आहे. नुकतीच ही बातमी वॉल स्ट्रीट जर्नलने दिली होती. तरीही फेसबुकनं काहीही कारवाई केली नाही. फेसबूकला समाजाच्या हिताची काळजी नसून, केवळ अधिकाधिक नफा कमावण्याच्या मार्गावरच आहे. ही सर्व माहिती फेसबूक कंपनीत काम करणाऱ्या डेटा इंजिनियर फ्रान्सेस हॉजेन यांनी उघड केली. कंपनीतील खाजगी माहिती पुराव्यांसहीत त्यांनी अमेरिकेच्या सिक्युरीटी आणि एक्सचेंज कमिशन आणि वॉल स्ट्रीट जर्नलसमोर उघड केली.

फेसबूक कंपनीतील कर्मचाऱ्यांनीच फेसबूकच्या काळ्या कारनाम्यांची माहिती उघड करण्याची ही पहिलीच वेळ नव्हती. यापूर्वी २०१५ साली हॅरी डेविस आणि २०१८ साली ख्रिस्तोफर वायली या दोघांनी असंच केलं होतं. यामुळे ट्रम्प यांनी आपल्या प्रतिस्पर्धी क्लिंटन यांना बदनाम करण्यासाठी खोटी माहिती प्रसिद्ध केली ब्रेक्झिट प्रकरणादरम्यान सातत्याने ब्रिटीश नागरिकांवर खोट्या माहितीचा मारा करण्यात आला, रोहिंग्यांबद्दल द्वेषपूर्ण मजकूर पसरवून रोहिंग्या नरसंहार केला आदी मागील सत्य लोकांपुढे आलं. या प्रकरणांमध्ये फेसबुकला ५ लाख डॉलर्स, ५ अब्ज डॉलर्स आणि १९ कोटी डॉलर्स असे तीन वेळा जबर दंड भरावे लागलेत. दंड भरून फेसबूकचे वर्तन मात्र सुधारलेलं नाही.

व्हॉट्सॲप आणि इन्स्टाग्राम हे फेसबूकचेच अंग आहेत. या तिन्ही माध्यमांचा वापर करणाऱ्यांची माहिती या जाळ्यात जमा होत असते. ज्यात व्यक्तीला काय आवडतं, काय नाही आवडत, त्याचे आयडॉल कोण, तो काय खातो-पितो, त्याच्या श्रद्धांचा कल, त्याचं उत्पन्न,



तो कोणाला मत देईल, त्याची जात इत्यादी माहिती मिळते. ही माहिती इतर ठिकाणी वापरली जाते, त्या माहितीचा फायदा कंपन्या आणि राजकीय पक्ष घेत असतात. मुख्य म्हणजे फेसबूक लोकांची मतं जाणून घेतं, मग माहितीला तोडून मोडून समोर करतात ज्यामुळे लोकमतावर प्रभाव पडतो आणि बऱ्याच अंशी हवी तशी लोकांची मतं बनवण्यात, मतं परिवर्तित करण्यात यशस्वी होतात.

भारतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची माणसं हिंदूंमधे असुरक्षिततेची भावना आणि मुस्लीम द्वेष पसरवतात, त्यासाठी फेसबूक आणि व्हॉट्सॲपचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात फेसबूककडे गेल्यावर त्यांनी यावर अभ्यास करून अहवाल बनवला. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या वेळेस खोट्या बातम्या, द्वेषानं भरलेल्या बातम्या, भीषण भाषेत व्यक्तींच्या बदनामीचे मेसेज हिंदी आणि बांग्ला भाषेत प्रसिद्ध होतहोते, व्हायरल होतहोते. मात्र यापैकी ४० टक्के पोस्ट या बनावट असल्याचे पुरावे हॉजेन यांनी दिले आहेत.

हे चित्र केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात आहे. खोट्या बातम्या, द्वेषानं भरलेल्या बातम्या अन् त्याला हातभार लागतोय तो, फेसबुकचा! त्यामुळे फेसबुकचं काय करायचं हा प्रश्न जगाला पडलाय..

फेसबूक 'जागतिक विभाजन आणि वांशिक हिंसाचाराला' कसे प्रोत्साहन देत आहे हे दाखवण्यासाठी कंपनीच्या अंतर्गत कागदपत्रांचा हवाला देत 'राजकीय संवेदनशीलता' या नावाखाली द्वेष पसरवणाऱ्या गटांविरुद्ध पुरेशी कारवाई केलेली नाही. फेसबुकच्या अधिकाऱ्यांना कंपनीच्या संस्थात्मक उणीवांची पूर्ण जाणीव असतानाही ते फेसबुकवर द्वेषयुक्त भाषण आणि धोकादायक राजकीय वक्तृत्वाला जागा देत आहेत. त्याचबरोबर भारत, इंडोनेशिया आणि फिलिपिन्समध्ये फेसबुकवर प्रति तास अंदाजे १ दशलक्ष ते १.५ दशलक्ष बनावट बातम्यांना लाईक्स, शेअर किंवा कमेंट्स प्राप्त होतात, असं हॉजेन यांनी दाखवून दिलं. फेसबुकचा जन्म सुरुवातील केवळ आपल्या मित्र-मैत्रिणींशी चिट-चॅट करण्यासाठी झाला होता. मात्र नंतर याचे रुपांतर नफा कमावणाऱ्या कंपनीत झाले. सर्वच उद्योगांप्रमाणेच फेसबूक कंपनीचे उद्दीष्टही तेच आहे. परंतु या व्यवसायामुळे समाजात वाईट प्रवृत्ती वाढत असतील तर? नियमन करून फेसबुकला त्यांचं वर्तन सुधारायला भाग पाडणं. माहिती गोळा करताना काळजी घ्या, माहितीचं विश्लेषण आणि प्रसार करताना काळजी घ्या, त्यासाठी नियम करा, माणसं नेमा असं सांगता येईल. तसे कायदे करता येतील. युरोप आणि अमेरिकेत तसा प्रयत्न चालला आहे.

एवढ्या मोठ्या संख्येने येणाऱ्या माहितीवर लक्ष ठेवायला लाखभर माणसं नाही, कोट्यावधी माणसं नेमावी लागतील. इतकी माणस नेमली की खर्च वाढतो आणि नफा कमी होतो. कमीत कमी खर्च जास्तीत जास्त नफा असं कंपन्यांचं ध्येय असतं. कारखान्यातून विषारी वायू निघतो, मात्र हा वायू बाहेर न येणे देणे हे कारखान्यांचे काम आहे. त्यासाठी लागणारी यंत्रणा उभारणे आणि ती मेन्टेन करणे यासाठी नफ्यावर काट मारावी लागते. त्यामुळे आपल्याकडे सर्व कारखान्यातून विषारी वायू वातावरणात पसरतो. तसंच काहीसं फेसबूकचं झालं आहे. फेसबूकमध्ये काम करणाऱ्या माणसांचे पगार, शेअर होल्डरांना वाटला जाणारा नफा, मालकाकडं जमा होणारी कायच्या काय संपत्ती ही सारी मस्ती, खर्च आटोक्यात ठेवल्यामुळेच होत आहे.

कंपनी जेवढी जास्त बलाढ्य आणि मक्तेदार असेल तर निरंकुश होते, तिला कोणी जाब विचारू शकत नाही. फेसबूक अवाढव्य वाढलीय. त्याना आता त्यांचा व्यवहार धडपणे सांभाळता येत नाहीये. एव्हढं खाताहेत की न पचल्यामुळं गॅसेस होताहेत आणि त्याचा त्रास समाजाला होतोय. खाणं आणि पोटाचा घेर यांवर उपाययोजना होणं आवश्यक आहे. छापील पेपर असो की इलेक्ट्रॉनिक माध्यम असो की माहितीचा व्यवहार करणाऱ्या टेक कंपन्या असोत, ज्या सोशल मिडियावर गुंतल्यात मजकुराची जबाबदारी त्यांना घ्यावी लागेल आणि फेसबूवर काटेकोर नियमन आणलंच पाहिजे.

# उत्तराखंडातील माणा गाव येथे उभारण्यात आलेल्या श्री सरस्वती ज्ञान-विज्ञान मंदिराचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणे व एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे, भारत यांच्या संयुक्त विद्यमाने माणा गाव, बद्रिनाथ धाम, जि.चमोली, उत्तराखंड येथे उभारण्यात आलेल्या श्री सरस्वती ज्ञान-विज्ञान मंदिराचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा गुरुवार, दि. २१ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ११.१५ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या समारंभासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल महामहिम भगतसिंग कोश्यारी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री त्रिवेंद्र सिंह रावत हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी नालंदा विद्यापीठाचे कुलगुरू व जगविख्यात संगणक तज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर हे असतील. तसेच, सुप्रसिद्ध विद्वान, विचारवंत आणि कवी किशन शर्मा, मौलाना आजाद नॅशनल उर्दू युनिव्हर्सिटीचे कुलपती डॉ. फिरोजशहा बख्त अहमद, सरस्वती धाम मंदिराचे पुजारी बद्रिनारायण भट व ह.भ.प. तुळशीराम दादाराव कराड हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील. माणा ग्रामपंचायतीचे प्रधान पीतांबर सिंह मोलपा हेही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. विश्वगानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर व थोर विचारवंत आणि अध्यात्मिक गुरू परमपूज्य श्रीकृष्ण कर्वे गुरूजी हे शुभाशीर्वाद देतील. शुक्रवार, दि.२२ ऑक्टोबर २०२१ ते बुधवार, दि.२७ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत दररोज सकाळी ११.१५ वाजता होणाऱ्या कार्यक्रमात उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केरळचे राज्यपाल महामहिम डॉ. अरिफ मोहम्मद खान, महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री राजेश टोपे, नेदरलँड येथील सुप्रसिद्ध विचारवंत, तत्त्वज्ञ आणि कवयित्री डॉ. पुष्पिता अवस्थी व जगविख्यात संगणकतज्ञ पद्मभूषण डॉ. विजय




भटकर हे अतिथी म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. भारतातील पवित्र चारधाम तीर्थक्षेत्रांमधील एक प्रमुख तीर्थक्षेत्र बद्रिनाथ (श्री विष्णू) धाम मंदिर, जिल्हा चमोली, उत्तराखंड येथील पवित्र आणि पावनभूमीमध्ये श्री सरस्वती ज्ञान-विज्ञान मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरामध्ये श्री सरस्वती मातेची मूर्ती, भगवान श्री गणेश, ज्ञान पंढरीचे श्री विठ्ठल रुक्मिणी, भगवान श्री दत्तात्रेय, वायुपुत्र श्री हनुमान आणि महाराष्ट्रातील महान तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर महाराज व संतश्री तुकाराम महाराज, भगवान श्री वेदव्यास यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. सरस्वती नदीच्या उगमापासून ज्या नरनारायण पर्वतमार्गाने पांडवांनी स्वर्गारोहण केले, त्या मार्गावर धर्मराज युधिष्ठिर, गदाधारी भीम, धनुर्धारी अर्जुन, सत्यवादी नकुल, मानवतावादी सहदेव व माता द्रौपदी यांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठपूर्वक स्थापना केली जाईल. सन २००९ मध्ये श्री बद्रिनाथ धाम येथे प्रख्यात संगणक शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, महान योगगुरू शतायुषी श्री रामचंद्र गोपाल शेलारमामा, साप्ताहिक हिंदी ब्लिट्झचे संपादक श्री नंदकिशोर नौटियाल, प्रख्यात रेडिओ उद्घोषक श्री. किशन शर्मा, प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. विजय कुमार दास, माझ्या ज्येष्ठ भगिनी पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयाग अक्का कराड व मी दर्शनासाठी गेलो होतो. श्री बद्रिनाथाचे दर्शन घेतल्यानंतर आम्ही सर्वजण माणा गाव येथील माता सरस्वती नदीचे मूळ उगमाचे दर्शन घेण्यासाठी गेलो होतो. दर्शन घेतल्यानंतर माझ्या आणि डॉ. विजय भटकर यांच्या मनात एकदम असा विचार आला की, देवी सरस्वतीला समर्पित, सुंदर आणि आकर्षक असे मंदिर या ठिकाणी बांधले जावे. योगायोगाने माणा गावचे प्रमुख पितांबर सिंग मोलपा यांची भेट झाली. त्यांच्याशी या मंदिराच्या उभारणी संबंधी चर्चा झाली. त्यानंतर त्यांनी त्याला मान्यता देऊन सर्वेतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. आम्ही दोघांनी मिळून श्री सरस्वती माता मंदिर बांधण्याचा संकल्प केला आणि या मंदिराच्या बांधकामाला सुरूवात झाली. आता ते मंदिर पूर्ण झालेले आहे. याच मंदिराचा उद्घाटन आणि लोकार्पण सोहळा गुरुवार, दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी होणार आहे.

**।। श्री सरस्वती ज्ञान-विज्ञान श्रीमद्भागवत कथा ज्ञानयज्ञ व अखंड हरिनाम सप्ताह ।।**

विज्ञान व अध्यात्माच्या समन्वयातून विश्वशांती नांदेल या स्वामी विवेकानंदांच्या वचनावर नितांत श्रध्दा व निष्ठा ठेऊन सुदृढ, निकोप व सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी पवित्र तीर्थक्षेत्रांचे खऱ्या अर्थाने ज्ञानतीर्थ क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडविण्याचा, लोकशिक्षणाचा अभिनव उपक्रम राबविला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार श्री सरस्वती ज्ञान-विज्ञान मंदिर, माणागांव, श्रीक्षेत्र बद्रिनाथ, जि. चमोली, उत्तराखंड येथे श्री सरस्वती ज्ञान-विज्ञान श्रीमद्भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये काकड आरती, विष्णुसहस्त्रनाम, गाथा, भजन, ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद्भागवत कथा, प्रवचने, हरिपाठ व कीर्तनाचे विविध कार्यक्रम गुरुवार, दि. २१ ऑक्टोबर २०२१ ते बुधवार, दि. २७ ऑक्टोबर २०२१ या दरम्यान होणार आहेत. या सप्ताहामध्ये ह.भ.प.श्री बापूसाहेब मोरे देहूकर, हरिहर महाराज दिवेगावकर, डॉ. सुदाम महाराज पाणेगावकर, धर्मराज महाराज हांडे, अर्जुन महाराज लाड, नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, अच्युत महाराज दस्तापूरकर, बाबा महाराज बोर्हाडे व रविदास महाराज शिरसाट हे आपली कीर्तनरुपी सेवा सादर करणार आहेत. ज्ञानतीर्थ क्षेत्र आळंदी देहू ते ज्ञानतीर्थ क्षेत्र श्री सरस्वती धाम, बद्रिनाथ अशी विश्वशांती दिंडी यात्रा काढण्यात येणार आहे. अशी माहिती एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड व कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**- जनसंपर्क विभाग,**
**एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

18 TO 24 OCTOBER 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 16/10/2021 9:34 PM Page 1



# कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगात महाराष्ट्राचा ब्रॅण्ड तयार करणार –कृषीमंत्री दादाजी भुसे

## शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळण्यासाठी उद्योग वाढीस मिळणार चालना



**मुंबई/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळण्यासाठी कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगवाढीस चालना देण्याचे शासनाचे धोरण आहे. कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगात महाराष्ट्राचा ब्रॅण्ड तयार करण्यावर भर देण्यात येत असल्याचे प्रतिपादन कृषीमंत्री दादाजी भुसे यांनी केले. त्यासाठी 'विकेल ते पिकेल'ची संकल्पना राबवणे, मूल्यसाखळी विकसित करणे, कृषी मालाला भाव मिळण्यासाठी विपणन आराखडा तयार करणे आदी बाबींना प्राधान्य देण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कृषि व अन्नप्रक्रिया संचालनालयाच्या कामासंदर्भातील आढावा बैठक मंत्रालयात झाली. त्यावेळी कृषीमंत्री दादाजी भुसे बोलत होते. कृषी सचिव एकनाथ डवले, उपसचिव सुशील खोडवेकर, कृषी आयुक्त धीरजकुमार, सहसचिव बाळासाहेब रासकर, उपसचिव एच.जी. म्हापणकर, कृषी व अन्न प्रक्रिया संचालक नागरे, आत्माचे प्र. संचालक के. एस. मुळे आदींची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी कृषीमंत्री दादाजी भुसे म्हणाले, कृषी व अन्न प्रक्रिया हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचा विषय आहे. त्यामुळे या संचालनालयात नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी–कर्मचारी यांनी हे महत्व ओळखून राज्याची या क्षेत्रात नवी ओळख निर्माण होईल, या पद्धतीने काम करणे अपेक्षित आहे. बचत गट, शेतकरी, शासन, खासगीरित्या या उद्योगात काम करणारे घटक या सर्वांनी एकत्रितपणे अन्न प्रक्रिया उद्योगाच्या विकासासाठी काम करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. कृषी विभागामार्फत राज्य आणि केंद्र शासनाच्या कृषी विषयक योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. कृषी प्रक्रिया उद्योगात प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (पीएमएफएमई), मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट), नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, महाराष्ट्र ग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट), प्रधानमंत्री किसान संपदा योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना अभियान, कृषी प्रक्रिया आणि निर्यात विकास प्राधिकरण अशा विविध योजना आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून काम होत आहे. हे काम एकत्रितरित्या व्हावे. राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी मालावर प्रक्रिया होऊन त्यांना आर्थिक सक्षमता यावी यासाठी काम सुरु असल्याचे दादाजी भुसे यांनी स्पष्ट केले. कृषि व अन्न प्रक्रिया संचालनालयाचे कामकाज अधिक गतिमान होण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. त्याबाबत दादाजी भुसे म्हणाले, कृषी प्रक्रियेशी संबंधित सर्व योजनांची एकत्रित अंमलबजावणी, शेतकऱ्यांना ई–मार्केटींग आणि ई–प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन देणे, शेतकऱ्यांच्या शेतमालाला निर्यातीसाठी प्रोत्साहन आदी बाबी महत्वाच्या आहेत. त्यावर कार्यवाही अधिक गतीने होणे गरजेचे आहे. यावेळी कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगाबाबतचे विपणन आराखडा व इतर बाबींसंदर्भातील सादरीकरणही करण्यात आले.

कर्मचारी भरती प्रकरणी लढा देणाऱ्या महिलेच्या तक्रारी नंतर

# भिवंडी पालिका आस्थापना विभाग प्रमुखांना राज्य माहिती आयुक्त यांनी ठोठावला दंड!




**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली करण्याचे प्रकार सर्रास घडत आहेत. यापूर्वी प्रभारी सहाय्यक आयुक्त सोमनाथ सोष्टे यांनी माहिती अधिकार अधिनियमानुसार कार्यवाही न केल्यामुळे त्यांना ८५ हजार रुपयांचा दंड राज्य माहिती आयुक्तांनी ठोठावल्याचे प्रकरण शमते न शमते तोच सहाय्यक आस्थापना विभागप्रमुख दीपक चव्हाण यांना १० हजार रुपयांचा दंड राज्य माहिती आयुक्त के.एल. बिस्नोई यांनी ठोठावला आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की २०१२ मध्ये पालिकेमध्ये झालेल्या कर्मचारी भरती प्रकरणी अन्याय झाल्याने संगीता ओंकार नरोटे यांनी तेव्हा पासून लढा सुरू केला असून आपल्या अन्याया विरोधात आता पर्यंत तब्बल तीनशेहून अधिक माहिती अधिकाराच्या माध्यमातून न्याय मागण्याचा प्रयत्न केला असून भिवंडी महानगरपालिकेत कर्मचारी भरती घोटाळ्यातील जबाबदार अधिकारी,कर्मचारी यांच्या विभागीय चौकशी अहवालाची माहिती केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५नुसार मागितली होती. याप्रकरणी झालेल्या प्रथम अपील सुनावणीत माहिती देण्याचे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारित केले असताना देखील तत्कालीन जन माहिती अधिकारी दीपक चव्हाण यांनी उपलब्ध माहिती देण्यास टाळाटाळ केल्यामुळे तक्रारदार संगीता नरोटे यांनी राज्य माहिती आयुक्त कोकण खंडपीठ यांच्याकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या सुनावणी प्रसंगी राज्य माहिती आयुक्त के. एल. बिस्नोई यांनी जन माहिती अधिकारी दीपक चव्हाण यांना १० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दीपक चव्हाण हे भिवंडी महानगरपालिकेत कनिष्ठ लिपिक म्हणून नियुक्त असताना वरिष्ठ अधिकारी यांची खुशामत करून वरिष्ठ पदे उपभोगत असून, सध्या चव्हाण हे कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणाऱ्या भरारी पथकाचे पथक प्रमुख म्हणून काम करीत आहेत. यापूर्वी पगार घोटाळ्यात दीपक चव्हाण यांना दोन वेळा निलंबित करण्यात आले होते. तरी देखील पालिका प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी दीपक चव्हाण यांची पाठराखण करीत असल्याची प्रतिक्रिया कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली आहे.

## भिवंडीतील युवा कवी मिलिंद जाधव 'गोल्डन प्रेस्टीज' पुरस्काराने सन्मानित

**भिवंडी/प्रतिनिधी**




होप मिरर फाउंडेशन संस्थेच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त होप मिरर फाउंडेशन स्वयंसेवी संस्थेच्या वतीने भिवंडी तालुक्यातील पडघा येथे राहणारे युवा कवी मिलिंद सुरेश जाधव यांना नुकतेच 'गोल्डन प्रेस्टीज' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. युवा कवी मिलिंद जाधव हे भिवंडी तालुक्यातील समतानगर, पडघा या ग्रामीण भागात राहत असून ते विविध विषयावर उत्तम कविता लिहून प्रबोधन करीत असतात. त्यांचा सामाजिक तसेच विविध क्षेत्रांमध्ये नेहमीच सहभाग असतो. विविध कवी, साहित्य संमेलनात त्यांचा सहभाग असून विविध विषयांवर प्रबोधनात्मक कविता शाळेत तर विविध ठिकाणी सादर करीत प्रबोधन करीत असतात. एवढंच नव्हे तर, अष्टपैलू व्यक्तित्वामुळे एक युवा कवी म्हणून त्यांची ओळख आज इतरांच्या नजरेतून पाहायला मिळते. अनेक कार्यक्रमात ते सूत्रसंचालनाची धुरा सुध्दा सांभाळत असतात. म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेऊन रविवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२१ रोजी होप मिरर फाउंडेशन संस्थेच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त होप मिरर फाउंडेशन स्वयंसेवी संस्थेच्या वतीने भिवंडी तालुक्यातील पडघा, समतानगर (बोरिवली) येथे राहणारे युवा कवी मिलिंद सुरेश जाधव यांना सिनेकलाकार अरुण बक्षी, सिनेअभिनेत्री आरती नागपाल होप मिरर फाउंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमजान शेख यांच्या हस्ते तर सीनेकलाकार व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत 'गोल्डन प्रेस्टीज' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वच स्तरातून युवा कवी मिलिंद जाधव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# तेलंगणाच्या बतक्कमा देवीचा भिवंडीतही स्वतंत्र काळापासून जागर



**भिवंडी/अभिजित हिरे**

तेलंगणा राज्यातील बतक्कमा देवीचा भिवंडीतही स्वतंत्र काळापासून जागर नवरात्रीच्या नऊ दिवसात मोठ्या भक्तींभावाने साजरा केला जातो. मात्र मागील वर्षी कोरोना काळात सर्वच धार्मिक उत्सव सार्वजनिक कार्यक्रम साजरे करण्यावर बंदी असल्याने नवरात्री मध्ये नवमीच्या दिवशी तेलंगणा आंध्रप्रदेश येथील भिवंडी राहणाऱ्या लाखो महिलांचा बतक्कमा सण साजरा करण्यावर निर्बंध असल्याने महिलांचा हिरमोड झाला होता. परंतु यंदा कोरोना संकट ओसरत असल्याने नवरात्रीमध्ये धार्मिकस्थळे उघडण्यात आली. तर निर्बंध ही मोठ्या प्रमाणावर शिथिल आल्याने भिवंडी शहरात सायंकाळी उशिरा असंख्य महिला बतक्कमा देवीचा सण साजरा करण्यासाठी घराबाहेर पडल्या आहेत.

बतक्कमा सण हा दक्षिण भारतातील तेलंगणा व आंध्रप्रदेश या राज्यात नवरात्री काळात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भिवंडी शहरात तेलगू समाजाची संख्या २ लाखच्या आसपास आहे. त्यामुळे भिवंडी शहरात देवीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नवरात्री मधील अष्टमीच्या दिवशी सायंकाळी उशिरा ताटात रंगीबेरंगी फुले सजवून अंगणात ठेवून त्या भोवती महिला युवती फेर धरून पारंपारीक गाणी म्हणत नृत्य करीत आनंद साजरा करतात व त्या नंतर उशिरा तलावात ही फुले विसर्जित करतात. हा सण साजरा करण्यासाठी महिला कोरोना ची भीती न बाळगता मास्क ना लावताच साजशृंगार करून या उत्सवात सहभागी झाल्या हे विशेष.

भिवंडी शहर हे यंत्रमाग नगरी म्हणून ओळखी जाते. त्यामुळे देशभरातील लाखो नागरिक कामाच्या शोधात येऊन या शहरात वास्तव्यास आली आहे. त्यामध्ये दक्षणी भारतातील नागरिकांचे मोठे प्रमाणात आहे. पूर्वी शहतात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वतीने वीजपुरवठा केला जायचा, मात्र गेल्या १४ वर्षापासून टोरेंट या खाजगी वीज पुरवठा करणाऱ्या कंपनीला भिवंडीत शहरात शासनाने वीज पुरवठा करण्याचा ठेका दिला. त्यातच गेल्या ४ ते ५ वर्षात अव्व्याच्या सव्वा वीजबिल आकारले जात असल्याने भिवंडी शहरातील बहुतांश यंत्रमाग कारखाने यामुळे बंद पडली आहे. यामुळे रोजीरोटीसाठी आलेल्या तेलगू समजावर इतर व्यवसाय करून पोटापाण्याचा प्रश्न सोडवीत आहे. त्यामुळे टोरेंट वीज कंपनीला बतक्कमा देवी सद्बुद्धी देऊन नागरिकांवर वीज बिलाचे संकट दूर करण्यासाठी देवीकडे साकडे घातले आहे. विशेष म्हणजे टोरेंट वीज कंपनीचे वीज मीटर देवीच्या पूजेच्या ठिकाणी ठेवल्याने आता तरी वीज बिलाचे संकट दूर होईल का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## जिल्हा परिषद शाळा गोऱ्हे येथे सुसज्ज वाचनालयाचे उद्घाटन

**वाडा/वार्ताहर**



वाडा तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रशाळा गोऱ्हे येथे बुधवारी (दि. १३ ऑक्टोबर) सुसज्ज वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले असून वाचनालय पुण्यकर्म फाउंडेशन, गोरेगाव (मुंबई) यांच्या सौजन्याने प्राप्त झाले आहे. या उद्घाटन प्रसंगी पुण्यकर्म फाउंडेशनचे विशाल खंदारी तसेच सक्षम फाउंडेशन गोरेगाव येथील सुगम कुलकर्णी उपस्थित होते. गोऱ्हे केंद्राचे केंद्रप्रमुख बाळकृष्ण तांडेल यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. सदर कार्यक्रमास विद्या मंदिर गोऱ्हेचे मुख्याध्यापक विनोद भोईर, गोऱ्हे शाळेचे माजी मुख्याध्यापक गोपाळ आगीवले, शाळा व्यवस्थापन समिती शाळा गोऱ्हेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, ग्रामस्थ, प्रतिष्ठित नागरिक, गोऱ्हे केंद्राचे शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. वाचनालयाचे उद्घाटन विशाल खंदारी व त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते लालफित कापून करण्यात आले. सदरच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश पाटील, प्रास्ताविक वसंत भोईर यांनी केले. 'मेक बुक युवर बेस्ट फ्रेंड' हा संदेश खंदारी दांपत्याने विद्यार्थ्यांना दिला. सर्व विद्यार्थ्यांनी आम्ही या ज्ञानभंडाराचा अधिकाधिक उपयोग करून घेऊ असे आश्वासन देत कार्यक्रमाची सांगता झाली. आभार प्रदर्शन अनुष्का चौधरी यांनी करत कार्यक्रमाचा समारोप केला. शाळेतील हरेश पाटील, यतीन ठाकरे, भाऊसाहेब बोचरे, साधना भानुशाली, समिधा पाटील या शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

## भिवंडी भूषण स्व. काकासाहेब पवार यांच्या ८२व्या जयंतीनिमित्त आरोग्य, रक्तदान शिबिर



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यात सदैव मदतीचा हात देण्याने दानशूर व्यक्तिमत्व भिवंडी भूषण कै रंगराव विठोबा उर्फ काकासाहेब पवार यांच्या ८२व्या जयंती निमित्त साईनाथ पवार यांच्या वतीने रक्तदान, नेत्र चिकित्सा, जनरल आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन कामतघर येथील विद्यालयात करण्यात येऊन त्यांना जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.

साईनाथ पवार यांनी आपल्या वडिलांच्या जयंती निमित्त कोणत्याही धार्मिक कार्याचे आयोजन न करता आरोग्य शिबिराच्या माध्यमातून जनसेवा करण्याचा निर्णय घेत सर्वसामान्यांना त्याचा लाभ मिळवून दिला बद्दल शिवसेना भिवंडी शहरप्रमुख सुभाष माने यांनी साईनाथ पवार यांचे अभिनंदन करीत कै काकासाहेब पवार यांचा दातृत्वशीलतेचा वारसा पुढे चालवावा अशा शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी आमदार महेश चौघुले, भाजपा शहराध्यक्ष संतोष शेट्टी, समाजसेवक नानजीभाई ठक्कर, नगरसेवक मनोज काटेकर, निलेश चौधरी, अरुण राऊत, सुमित पाटील, नित्यानंद नाडार, अशोक भोसले यांसह मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते. या जयंती कार्यकटम दरम्यान कोरोना काळात सेवा बजावणारे डॉक्टर, सफाई कामगार, कोव्हिडं केंद्रात सेवा बजावणारे स्वच्छता कर्मचारी, डॉक्टर परिचारक, स्वयंसेवी संस्था यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले तर कोरोना मुळे मृत्यू ओढवलेल्या व बेरोजगार झालेल्या कुटुंबियांना स्वयंरोजगारा साठी पन्नास एम्ब्रॉयडरी मशीन वितरीत करण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमा दरम्यान अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले असून नेत्र व जनरल चिकित्सा शिबिरात शेकडो रुग्णांची तपासणी करण्यात येऊन त्यांना मोफत औषध वितरीत करण्यात आली. तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्व काकासाहेब पवार विद्यालयाचे शिक्षकवृंद यांनी विशेष मेहनत घेतली.

## वाड्यातील बस चालक, वाहकाच्या हलगर्जी पणामुळे प्रवाशांचा एक तास खोळंबला

**वाडा/प्रतिनिधी**

ठाणे पालघर दरम्यान धावणारी वाडा आगाराची बस चालक वाहक कामगिरीवर उशिरा आल्यामुळे प्रवाशांना तब्बल एक तास बसमध्ये ताटकळत बसावे लागले. वाडा आगाराची बस (क्रमांक एम.एच.०७ सी.७५१५) ही सकाळी ठाणे येथून वाडामार्गे पालघर या मार्गावर चालवली जाते ही बस एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात जाणारी असल्याने साहजिकच गाडी प्रवाशांनी भरलेली असते. ही बस शुक्रवारी दुपारच्या सुमारास नेहमी प्रमाणे वाडा बस स्थानकात आली मात्र चालक व वाहकाची कामगिरी संपल्यामुळे ते दोघेही बस मधून उतरले व दुसरा चालक, वाहक आल्यावरच बस पुढच्या प्रवासाला निघेल असे सांगून दोघेही निघून गेले. दरम्यान बस मधील काही प्रवाशांनी वाडा स्थानकातील नियंत्रकाकडे तक्रार केली असता त्यांनीही वाहक चालक आल्याशिवाय बस पुढे जाणार नाही ते दोघेही लवकर येतील व गाडी सोडली जाईल असे सांगितले. आता प्रवाशांना त्या दोघांची वाट पाहिल्या शिवाय गत्यंतर नाही असे समजून नाविलाजाने चालक व वाहकाची वाट पहात एक तास भर ताटकळत बसावे लागले. अखेर एका तासा नंतर वाहक व चालक कामगिरी वर हजर झाले. या दरम्यान प्रवाशांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागला आणि तासभर उशीरही झाला. संतप्त प्रवाशांनी कामात हलगर्जी करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाईची मागणी केली आहे.

# अक्कलकोट येथे ग्रामसुरक्षा यंत्रणेचे प्रात्यक्षिक




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट शहरात उत्तर व दक्षिण पोलीस स्टेशन हद्दीतील १२६ गावांमध्ये ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबतचे प्रात्यक्षिक पार पडले. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या प्रयत्नातून जिल्हा परिषद सोलापूर व जिल्हा ग्रामीण पोलीस दल आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येथील प्रियदर्शनी मंगल कार्यालयात हा कार्यक्रम घेण्यात आला, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.संतोष गायकवाड होते. संयोजन अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी व दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप काळे यांनी केले.

संकट काळात आपत्तीग्रस्त नागरिकाने ग्रामसुरक्षा यंत्रणेचा टोल फ्री नंबर १८००२७० ३६०० वर कॉल केल्यास संबंधित व्यक्तीचा आवाज गावातील सर्व नागरिकांना कॉल स्वरूपात तात्काळ गावाला ऐकवला जाणार असल्याने गुन्ह्यांना आळा घालणे शक्य होणार आहे. ग्रामसुरक्षा यंत्रणेचे संचालक डि.के.गोरडे यांनी नागरिकांना यंत्रणेचे प्रात्यक्षिक दाखवले ग्रामसुरक्षा यंत्रणेचे समन्वयक विक्रमसिंह घाटगे, उत्तम सुतार, सत्यशील घाटगे यांनी ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या नोंदणी पत्रकाचे वाटप केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश भावीकट्टी, पोलीस कर्मचारी मोतीराम मोरे, मुजावर, सलीम पिरजादे, अंगद गीते, विपीन सुरवसे आदींनी परिश्रम घेतले.

क्राईम Reporter
क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉलवर उपलब्ध होईल.
9890718873

साप्ताहिक क्राईम संध्या
ऑनलाईन वाचण्यासाठी
www.crimesandhya.com
लॉगईन करा...

18 TO 24 OCTOBER 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 16/10/2021 9:34 PM Page 1



पान १ वरून....

## संपत्तीसाठी तिने पतीसह संपूर्ण...

रोजो थामस समोर बसलेल्या तरुणाचे नाव. तीशीतला असावा! तरुण मध्यम दिसण्यात रुबाबदार, पण सध्या त्याचा चेहरा एका अनामिक भीती आणि काळजीने काळवंडलेला होता. त्या तरुणाने एक ग्लास पाणी पिण्यासाठी मागितले. ते घटाघटा पिऊन त्याने आपली कथा सांगायला सुरूवात केली. केरळमधील कोझिकोडे प्रांतातील कूडाथायी गावी तो रहात होता. गेली काही वर्षे तो अमेरिकेत स्थायिक झालेला असला तरी त्याचे उर्वरित कुटुंब इथे कूडाथायी गावातच रहात होते. त्याचे म्हातारे वडील टाम थामस, आई अन्नम्मा थामस, वडिलबंधू राय थामस, बहिण सिली थामस, तिची एक वर्षाची मुलगी अल्पाईन, मामा मथ्यू...पण गेल्या १४ वर्षात एकेक करून ही सर्व मंडळी काळाच्या पडद्याआड गेली होती. दर दोन ते अडीच वर्षांनी कोणाची न कोणाची या जगातून एक्झिट झालेली होती. केवळ एकाचा अपवाद वगळता या सर्वांचे नैसर्गिक मृत्यू झालेले होते. तशी सरकारदरबारी नोंद झालेली होती. मात्र, आता रोजो दावा करत होता की, या सहाहीजणांचे मृत्यू हे नैसर्गिक नसून त्या हत्या आहेत! मात्र हा दावा करताना रोजो कोणताही सबळ पुरावा सादर करत नव्हता. शिवाय, आपल्या वहिनीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करीत होता...हे सहाही खून आपल्या वहिनीने केल्याचा त्याला दाट संशय होता. पोलिसांनी या दृष्टिकोनातून तपास करावा असा त्याचा आग्रह होता. त्यासाठीच त्याने आधी स्थानिक पोलिसांचे डोके खाल्ले होते. तिथे दाद लागत नाही हे पाहून त्याने आता थेट जिल्ह्याच्या ठिकाणी धाव घेत पोलीस अधीक्षकांची भेट घेतली होती. समोरच्या व्यक्तीचे हाय प्रोफाईल लक्षात घेता त्याला ताबडतोब उडवून लावणे पोलीस अधीक्षकांना शक्य होत नव्हते. पण त्याचे विचित्र बोलणे ऐकून त्यांचे डोके भणभणले. त्यांनी पोलीस उपअधीक्षक यांना मदतीसाठी बोलावले. दोघांनी मिळून पूर्ण प्रकरण पुन्हा एकदा ऐकले. आरोप गंभीर होते. पण त्यांना एक समजत नव्हते की, एखादा खूनी सहा खून करण्यासाठी १४ वर्षे का घेईल ? पोलीस या नात्याने त्यांनी अनेक खूनी इसम आयुष्यात पाहिलेले होते. सिरियल किलरही पाहिलेले होते, पण खून करणाऱ्या व्यक्ती जेव्हा एका पाठोपाठ एक खून करू लागतात तेव्हा त्या लागोपाठ हत्या करत सुटतात...म्हणजेच महिन्या दोन महिन्यातच खून पडत जातात. पण या प्रकरणात सहा खून पडलेले आहेत आणि तेही १४ वर्षात! शिवाय यातील पाच मृत्यूंची नोंद ही नैसर्गिक मृत्यू म्हणून झालेली होती. पोलिस आणि वैद्यकीय अधिकारी एकदा चुकतील, दोनदा चुकतील; पण पाच वेळा कसे चुकतील? या दोन्ही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना कसे समजवावे हे रोजो थामसला समजत नव्हते. पण तो प्रयत्न करत होता. शेवटी त्याला काहीतरी सूचले. त्याने कोटाच्या खिशात हात घातला आणि आतून एक सरकारी कागद बाहेर काढला. साहेब, हा पहा माझ्या भावाच्या मृतदेहाचा शव विच्छेदन अहवाल. या अहवालात स्पष्टपणे म्हटलंय की, त्याचा मृत्यू हा विषप्राशन केल्यामुळे झालेला आहे. त्याच्या शरीरात विषाचे अंश सापडले आहेत. थोडक्यात काय तर सुरूवातीला हृदयविकाराने झालेला मृत्यू हा शव विच्छेदनानंतर चक्क विषप्राशनामुळे झालेला मृत्यू निघाला! विषबाधेची नोंद असल्यामुळे हा मृत्यू नैसर्गिक खचितच नव्हता. मात्र, पोलीस अधिकाऱ्यांच्या मते, ती हत्याच होती, असेही ठामपणे म्हणता येत नव्हते; कारण आत्महत्या करणाराही विषप्राशन करतोच की! शिवाय, स्थानिक पोलिसांनी प्रारंभिक तपास करून आपला अहवाल धाडलेला होता. त्यात त्यांनी म्हटलेले होते की, आई-वडिलांचा लागोपाठ मृत्यू झाल्यानंतर रोजोचा मोठा भाऊ राय हा दुःखात बुडालेला होता आणि तो रात्रंदिवस दारूत बुडालेला असे. त्याला आई-वडिलांच्या मृत्यूचे दुःख पचविता आलेले नव्हते. त्या वैफल्यग्रस्त स्थितीत त्याने विषप्राशन करून जीवनाचा अंत केला असावा! मात्र, रायचा लहान भाऊ रोजो हट्टालाच पेटलेला होता. सारखा आपल्या वहिनीवर संशय घेत होता. पण या विधवा वहिनीची माहितीही पोलिसांनी काढलेली होती. ही विधवा आता विधवा राहिलेली नव्हती तर तिने दुसरे लग्न केलेले होते. नुसता नवा संसार थाटून ती स्तब्ध बसलेली नव्हती तर ती थामस कुटुंबियांचा पूर्ण व्यवसायही सांभाळत होती; नव्हे तर ती थामस कुटुंबाच्या संपूर्ण मालमत्तेची एकमेव मालकीण झालेली होती. रोजो हा रायचा लहान भाऊ असतानाही त्याला प्रापर्टीमधून बेदखल करण्यात आलेले होते. बरे, हे सर्व त्याच्या वडिलांनीच केलेले होते. त्यांचे मृत्युपत्र पोलिसांनी पाहिलेले होते. पण, रोजोला हे मान्य नव्हते. आपण जिवंत असताना वडिलांनी संपूर्ण मालमत्ता वहिनीच्या नावे केलेले त्याला सहन होत नव्हते... पोलिसांना त्याने तसे बोलूनही दाखवले. त्यामुळे केवळ असूयेपोटी तर तो आपल्या कर्तृत्ववान वहिनीवर खुनासारखे घाणेरडे आरोप तर करत नाहीये ना?...पण रोजोचे म्हणणे होते की, वडिलांचे हे मृत्यूपत्र देखील बनावट आहे! वहिनी जाली हिनेच ते बनवून घेतलेले आहे. त्यावर असलेली वडिलांची सहीदेखील बनावट आहे! पोलिसांना काहीच सूचेना...पण अखेर त्यांनी या प्रकरणाचा तपास करायचे ठरवले. पोलीस उपअधीक्षक टी. हरिदास यांनी आपले पोलीस पथक तयार केले आणि या प्रकरणाचा नव्याने तपास सुरू केला. त्यासाठी त्यांनी शव विच्छेदन अहवालाचा आधार घेतला आणि संबंधित डाक्टरांची भेट घेतली. त्यांनी विषप्रयोगाची शक्यता पुन्हा एकदा व्यक्त केली. पण हे विष नेमके कोणते आहे, त्याबाबतचा उल्लेख अहवालात करण्यात आलेला नव्हता. डाक्टरांनी सांगितले की, रायला बेशुद्धावस्थेत रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याला हृदयविकाराचा झटका आला व तो गेला. तशी नोंद करण्यात आली. मात्र त्याचा मृतदेह नंतर गळ्याखाली निळसर पडला. हे रायचा मामा मथ्यू याच्या लक्षात आले. त्यानेच त्याकडे डाक्टरांचे लक्ष वेधले. त्यामुळे मृतदेहाचे शव विच्छेदन करावे लागले. तेव्हा विषबाधा निष्पन्न झाली. मात्र, रायचे मामा वगळता कुटुंबातील अन्य व्यक्ती या विषबाधेवर विश्वास ठेवायला तयार नव्हत्या. त्यांना मनापासून वाटत होते की, राय हा हृदयविकारानेच मृत पावला आहे. त्यामुळे त्यांनी मृतदेह तातडीने ताब्यात घेऊन तो दफन केला. डाक्टरांचे हे म्हणणे ऐकल्यावर पोलीस पथक स्थानिक पोलिसांना भेटले. स्थानिक पोलिसांनीही हीच गोष्ट सांगितली. कुटुंबियांनी घातपाताची शक्यता फेटाळून लावल्यामुळे पोलिसांनाही ही आत्महत्या असावी अथवा अपघाताने रायच्या पोटात विष गेले असावे, असे वाटले. राय हा खूप दुःखात होता. वैफल्यात होता. सतत दारूच्या नशेत तो बुडालेला असे. त्यामुळे नशेतच त्याच्या तोंडात चुकून विषारी पदार्थ गेला असावा, असे पोलिसांना वाटले...पण आता नव्याने तपास करणाऱ्या पोलिस पथकाने आता या प्रकरणाच्या तळाशी जाण्याचे ठरवले. त्यासाठी नेमके कोणते विष रायच्या पोटात गेले, याचा शोध घेणे आवश्यक होते. पण रायचा मृत्यू तर २०११ साली झालेला होता आणि आता हे वर्ष २०१९ सुरू होते. आता रायचा मृतदेह पुढील तपासासाठी उपलब्ध नव्हता. तो ख्रिस्ती दफनभूमीत दफन झालेला होता आणि इतक्या वर्षात त्या जागी आता केवळ सांगाडाच उरलेला असण्याची शक्यता होती. मात्र फारेन्सिक तज्ज्ञांशी चर्चा केल्यावर असे लक्षात आले की, खरोखरच विषबाधा झालेली असेल तर सांगाड्याच्या डिएनए नमुन्यातूनही विष शोधून काढता येते! आधुनिक विज्ञानाला ही किमया आता साध्य झालेली आहे...त्यावर विचार करून पोलीस पथकाने निर्णय घेतला की, जर रायचा मृत्यू हा नैसर्गिक नसून ती हत्या असेल व ती हत्या विषप्रयोगाने झालेली असेल तर इतर पाचजणांवरही हाच प्रयोग झालेला असणार! म्हणजे अन्य पाच जणांच्या मृतदेहांतही विषाचे नमुने सापडायला हवेत! आता पोलिसांना प्रश्न पडला तो हा की, पोटॅशिअम सायनाईड हे विष सहजासहजी उपलब्ध होणारे नाही. त्याच्या वापरावर प्रचंड निर्बंध आहेत. अशा स्थितीत हे विष जाली थामसला कुठून उपलब्ध झाले असेल? फारेन्सिक अहवाल आल्यानंतर पोलिसांची जालीकडे पाहण्याची नजर आता बदलली होती. त्यांना आता तिच्यातील थंड डोक्याने खून करून ते पचविणारी सिरियल किलर दिसू लागली होती...आता पोलिसांनी तिची माहिती काढायला सुरूवात केली. पण जसजसे ते माहिती काढू लागले, तसतसे तिचे नवनवे रंग पोलिसांना दिसू लागले. यामुळे पोलिसांचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन अजून बदलला. जाली ही श्रीमंताघरची सून असली तरी ती एका कालेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरी करत होती व महिना ६५ हजार रुपये पगार घेत होती, असे समजल्यामुळे पोलिसांनी संबंधित कालेजमध्ये चौकशी केली असता ती तिथे कधीही कामाला नव्हती असे पोलिसांना कालेज व्यवस्थापनातर्फे सांगण्यात आले. त्या कालेजमधील रासायनिक प्रयोगशाळेतून जालीने पोटॅशिअम सायनाईड मिळवले असावे असाही पोलिसांना संशय होता. मात्र, प्रयोगशाळेतील नोंदी तपासल्या असता तेथील घातक रसायनांचा हिशेब चोख असल्याचे आढळून आल्यामुळे त्यांनी आपला मोर्चा ज्वेलर्सकडे वळवला. पोटॅशिअम सायनाईडचा सोन्याच्या दागिन्यांच्या सफाईसाठी ज्वेलर्सकडून वापर होत असल्यामुळे ओळखीच्या ज्वेलर्सकडून जालीने हे घातक रसायन घेतले असावे, असा पोलिसांचा कयास होता. याच तपासादरम्यान मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी आफ इंडियाचा एक स्थानिक नेता पोलिसांच्या हाती लागला. या नेत्याच्या माध्यमातून जालीने आपण डबल ग्रज्युएट असल्याची बतावणी करत खोटे प्रमाणपत्र हासील केले होते. तसेच कालेजमध्ये प्राध्यापिका असल्याचे बनावट ओळखपत्र आणि कालेजतर्फे जारी करण्यात आलेले बनावट नियुक्तीपत्रही तिने पैसे मोजून विकत घेतलेले होते. ही तिची बनावटगिरी तपासात खूप उपयोगी ठरली. कारण, या निमित्ताने बनावट दस्तावेज बनविल्याचा गुन्हा दाखल करून जालीला तपासासाठी रितसर ताब्यात घेता येणे आता शक्य होणार होते. पोलिसांनी केलेही तसेच...या प्रकरणात संबंधित कालेजच्या रजिस्ट्रारलाही पोलिसांनी ताब्यात घेतले. जालीच्या भोवती आता चौकशीचा फास आवळला जावू लागला. जालीने एवढे मुडदे पाडले याचा अर्थ यामागे तिचा काहीतरी स्वार्थ असला पाहिजे हा ठोकताळा बांधून थामस कुटुंबियांची मालमत्ता आपल्या नावे करणे हाच स्वार्थ असावा हा अंदाज पोलिसांनी बांधला. आता त्यांनी जालीकडे असलेले तिच्या सासरेबुवांचे मृत्युपत्र ताब्यात घेतले. ते तपासले असता, ते बनावट असल्याचा त्यांना संशय आला. याबाबत तिला बनावट ओळखपत्रं बनवून देणाऱ्या राजकीय नेत्यास विचारले असता त्याने हे बनावट मृत्यूपत्रही आपणच जालीला बनवून दिल्याचे मान्य केले. आता पोलिसांनी जालीला घेरले. हत्या प्रकरणातून सुटलो तरी बनावट दस्तावेज प्रकरणात तुरुंग भोगावा लागणार याची कल्पना एव्हाना जालीला आली होती. त्यामुळे ती थोडी नरमली आणि तिने स्वतःहून पोलिसांना आपल्या पापाची कबुली दिली. तिने दिलेल्या जबानीनुसार, ती गरीबीत लहानाची मोठी झाली. पैशांचे महत्त्व तिला चांगलेच माहित झाले होते. पैशावाचून कसे पदोपदी अडते हे अनुभवात आल्याने तिने श्रीमंत नवरा करण्याचा निश्चय केला. तिच्या सुदैवाने रायच्या रुपात तिला तो भेटलाही. १९९८ साली दोघांचे लग्न झाले. ती डबल ग्रज्यूएट आहे हे पाहून, शिकलेली मुलगी घर पुढे नेईल, या विचाराने रायच्या आईने गरीब घरातील जालीचा स्वीकार केला. पण लग्नानंतर अचानक हातात पैसा खेळू लागल्यामुळे जाली पैसा हवा तसा उधळू लागली. हे तिच्या सासूला सहन न होवून तिने जालीला समज दिली. घरात सासूचा मोठा धाक होता. तेव्हा सासूला बाजूला केल्यास घरची मोठी सून या नात्याने हातात तिजोरीच्या चाव्या येतील या विचाराने जालीने सासूला मारण्याचा कट रचला. पण मारणार कसे ? तिला सासूला मारून फासावर लटकायचे नव्हते तर लाईफ एन्जाय करायचे होते! या कामात तिला तिचा वाचनाचा व्यासंग कामी आला. कालेजात जाऊन जाली तेथील वाचनालयात तासन् तास घालवत असे. तिथे तिच्या वाचनात सायनाईडबाबतची माहिती आली. सायनाईड अल्प व ठराविक मात्रेत दिले गेल्यास ते स्लो पायजन ठरून व्यक्ती तत्काळ न मरता काही दिवसांनी मरते. हे मरण असे असते की, कोणालाही वाटावे की हा हृदयविकाराने आलेला मृत्यू आहे. जालीला हेही ठाऊक झाले होते की, सायनाईड सहजासहजी उपलब्ध होत नाही. मात्र, ज्वेलर्सकडे ते उपलब्ध असते. यावर तिने एका सराफाशी व एका सुवर्ण कारागिराशी संधान साधले. त्यांना मजबूत पैसे देऊन तिने सायनाईड मिळवले आणि सासूच्या जेवणात दररोज थोडे थोडे मिसळून तिने डाव साधला... सन २००२ साली सासूला संपवल्यावर ती शांत झाली. पुढील सहा वर्षे तिने आदर्श सून बनून घर आणि सासरे यांना सांभाळले. पण सासरे आता थकले होते. त्यांना पैलतीर दिसू लागला होता. जाण्यापूर्वी घराच्या मालमत्तेची दोन मुलांमध्ये समसमान वाटणी करावी असे त्यांच्या मनात येत होते. तसे ते बोलूनही दाखवित. पण आता जालीला मालमत्तेत वाटणी नको होती. तिला पूर्ण मालमत्ता उपभोगायची होती. तसेही सासूच्या मृत्यूनंतर नवरा राय हा कामधंद्यात लक्ष घालत नव्हता. दीर अमेरिकेत होता. त्यामुळे संपूर्ण कारभार जालीच्याच हातात होता. सासरे आपलं ऐकणार नाहीत हे लक्षात आल्यामुळे जालीने २००८ साली सासरेबुवांनाही सासूबाईंच्याच मार्गाने संपवायचे ठरवले व तसा कट आखून तो अंमलातही आणला. आई-वडिल दोघांचाही मृत्यू झाल्यावर मुलगा राय बेताल वागू लागला. तो सतत दारु पित असे व दुःखात राहत असे. जालीच्या हौसमौजेकडे त्याचे दुर्लक्ष झाले. याचा दुष्परिणाम असा झाला की, जाली याच दरम्यान राजकीय पक्षाच्या स्थानिक नेत्याकडे आकर्षित झाली व तिचे विवाहबाह्य संबंध सुरू झाले. मात्र, याची कुणकुण रायला लागल्यावर त्याने जालीला खडसावले. त्यावर तिने एव्हाना बिनकामाच्या ठरलेल्या पतीदेवांचाही काटा काढायचे ठरवले आणि कट आखून २०११ साली तिने रायलाही सायनाईड पाजले. हा खूनही पचला असता. पण रायचा मामा मथ्यू याला शंका आली. त्याला रायचा मृतदेह निळसर पडलेला दिसला व त्यामुळेच त्याला रायवर विषप्रयोग झाला असावा अशी शंका आली. तो पोलिसांच्या मानगुटीवरच बसला. त्यांना खूनाच्या अँगलने तपास करा असे सूचवू लागला. जालीला हे सहन न होवून २०१४ साली तिने मामा मथ्यूलाही त्याच मार्गाने संपवले. आता जालीच्या मार्गातील सर्व काटे दूर झाले होते. पण घरचे एकाकीपण तिला खायला उठले. पैसा हाती आला होता. ती आता कोट्यधीश झालेली होती. सासरेबुवांची खोटी सही करून तिने बनावट मृत्युपत्राद्वारे सगळी संपत्ती घशात घातली होती. पण आता तिला संसारसुखही हवे होते. त्यासाठी ती योग्य जोडीदार शोधू लागली. तिची नजर आता रायची बहिण सिली हिच्या पतीवर पडली. त्याचे नाव शाजू. पण शाजू हा सरळमार्गी होता. आपल्यासाठी तो पत्नीला घटस्फोट देणार नाही. हे लक्षात आल्यावर खून करण्यात हातखंडा बसलेल्या जालीने आता त्याचा परिवार संपवून त्याला एकाकी करण्याचे ठरवले. त्यानुसार तिने आधी शाजूच्या एक वर्षाच्या मुलीला २०१५ साली तर पत्नी सिलीला २०१६ साली समान पद्धतीने सायनाईड देऊन संपवले...यानंतर थोडा काळ जाऊ दिल्यावर तिने शाजूकडे लग्नाचा विषय काढला. दोघेही एकाकी असल्यामुळे त्यांनी विवाह करून एकाकीपण संपविण्याचा निर्णय घेतला व ते लवकरच विवाहबद्ध झाले. आता जालीला आल इज वेल असल्यासारखे वाटू लागले. आपल्या मार्गातले तब्बल सहा जण तिने यशस्वीपणे संपवले होते. पण तिच्या दुर्दैवाने अमेरिकेत बसलेल्या तिच्या दीराला, रासला संशय आला. यापूर्वीही भावाचा मृत्यू झाल्यावर त्याचे आणि मामा मथ्यूचे बोलणे झालेले होतेच. दोघांनाही हा मृत्यू सहन झालेला नव्हता. पण तरीही रास शांत राहिला. पण नंतर मामा मथ्यूही मेला. बहिणही वारली. बहिणीची छोटी तान्हुली गेली आणि विधवा वहिनीने सगळी संपत्ती हडप केली. इतके करून ती थांबली नाही तर तिने नणंदेच्या नवरदेवाशी लग्न केले. यामुळे रास बिथरला. त्याला या सर्व गोष्टींमध्ये काहीतरी काळंबेरं असल्याचा संशय आला व तो या प्रकरणाच्या मूळाशी जाण्यासाठी भारतात आला. केरळात येताच त्याने आपल्या पद्धतीने माहिती गोळा करण्यास सुरूवात केली. पण त्याच्या चौकशीला मर्यादा होत्या. त्यामुळे त्याने पोलिसांशी संपर्क साधला. रासने तक्रार नोंदविल्यामुळे पोलिसांना या प्रकरणाचा नव्याने तपास करता आला. पोलिसांनी जालीला आता अटक केली आणि सत्र न्यायालयात आरोपपत्र सादर केले. मात्र, कोरोनाप्रतिबंधक कालखंडामुळे दोन वर्षे वाया गेली. न्यायालयात खटला अजूनही सुरू होऊ शकलेला नाही. त्यामुळे जालीने केरळ हायकोर्टास जामीन मिळण्यासाठी विनंती केली. ती कोर्टाने मान्य केली. पण जनमाणसांत क्षोभ निर्माण झाल्यामुळे केरळ सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत जालीच्या जामीनावर स्थगिती आणली. यानंतर जालीने तुरुंगातच स्वतःच्या हाताच्या नसा कापून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही. दरम्यान, तिचा दुसरा पती शाजू याला या प्रकरणात जबर मानसिक धक्का बसला. आपण आपल्या पत्नी आणि मुलीच्या खूऩ्याशी लग्न केले, या विचारानेच तो अस्वस्थ झाला. पोलीस आधी त्यालाही जालीच्या कटातील हस्तक मानत होते. पण तसा पुरावा हाती न आल्यामुळे पोलिसांनी शाजूला यात गोवले नाही. मात्र या प्रकरणामुळे धास्तावलेल्या आणि पस्तावलेल्या शाजुने जालीला घटस्फोटाची नोटीस पाठवली. खूनी बायकोसोबत आपण नांदू शकणार नाही, असे या नोटिशीत स्पष्ट म्हटले आहे.

## नवरात्र उत्सवात मंडप लाईटींगवरून...

होता. मंडळाला या दोन्ही सणाच्या वेळी तो लाईटींग देत असल्याने त्याला ही त्यातून काही तरी थोडेफार उत्पन्न मिळत होते. म्हणून तो मंडळासाठी धडपडत होता. मात्र या वर्षी हे दोन्ही सण साजरे करताना राज्य सरकारने काही निर्बंध आल्याने शिवशंभू तरूण मंडळाने खर्चाला फाटा देत या वर्षी देवीची मुर्ती शिवाजी चौकात न बसविता ती चौकालगतच्या मंगल कार्यालयात देवीची मूर्ती बसविण्याचा निर्णय घेतला होता. त्याला मंडळातील सर्व सदस्यांनी मान्यता ही दिली होती. त्यामुळे मंडप नसल्याने लाईटींग करण्याचा काही प्रश्नच नव्हता. तरीही सुरज पाटील हा देवी बसविले त्या ठिकाणी मी लाईटींगची व्यवस्था करतो असे म्हणत मंडळाच्या अध्यक्षांना सारखे याबाबत विचारणा करीत होता. मंडळातील वैभव भोपळे याने ही यावर्षी देवीच्या ठिकाणी लाईटींग नको पुढच्या वर्षी काय ते पाहू असे मंडळातील सदस्यांना सुचवले होते. वैभव हा मंडळासाठी पुढे पुढे करीत होता. आपला निर्णय तो इतरांना पटवून सांगत होता. त्यामुळे मंडळातील सदस्य व कार्यकर्ते त्याच्या शब्दाच्या पुढे नव्हते. त्याने एखादी गोष्ट नको म्हटले तर त्याचा निर्णय मान्य करून कार्यकर्ते ही त्याला दुजोरा देत होते. यावर्षी देवीची मुर्ती बसविताना खर्चाला फाटा देण्याचे त्याने सुचवले होते, त्याला कारण ही त्याने माहामारीचे सांगितले होते.त्याचे म्हणणे अनेकांना पटल्याने देवीच्या मूर्तीची स्थापना त्यांनी मंगल कार्यालयात केली होती. गुरूवार दि.७ ऑक्टोंबर घटस्थापने रोजी रोजी देवीची मूर्ती त्यांनी मंगल कार्यालयात प्रतिष्ठापना केली होती. रोज नित्य नियमाना देवीची सकाळ संध्याकाळ आरती आणि आरास करण्यात मंडळातील अनेकजण गुतंले होते.मात्र सुरज याला देवीच्या मूर्तीच्या ठिकाणी लाईटींग करावायची होती.त्यामुळे तो मी लाईटींग करतो, मला काय दयायचे ते दया मी काय जास्त पैसे घेणार नाही असे तो मंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना सांगत होता. पण वैभव भोपळे याला त्याचे म्हणणे काही पटत नव्हते. तो मंडळासाठी नव्हे तर आपल्या व्यवसायासाठी लाईटींग करतो असे म्हणत आहे असे त्याला वाटत होते. त्याची लाईटींग त्याला घ्यायचीच नव्हती. यासाठी तो कोरोना महामारीचे कारण सांगत होता. कारण लाईटींग केली तर गावातील तरूण मुले मुली, विवाहित स्त्रीया या दांडिया खेळायला येणार त्यामुळे गर्दी होणार असे तो मंडळातील कार्यकर्त्यांना सांगत होता. त्याचे हे म्हणणे बऱ्याच जणांना पटले होते. त्यातच सरकारकडून काही निर्बंध असल्याने लाईटींग करायची नाही असे तो म्हणत होता. त्यामुळे सुरज याला त्याचा राग येत होता. देवीची मंगल कार्यालयात प्रतिष्ठापना केल्यापासून सुरज हा गेल्या दोन तीन दिवसापासून मंडळातील कार्यकर्त्यांना भेटून लाईटींग करतो असे सांगून त्याचे कडून परवानगी मागत होता. पण वैभवने त्यात खोडा घातला होता. त्याने आपले म्हणणे मंडळाच्या अध्यक्ष उपाध्यक्ष आणि बाकीच्या कार्यकत्यांना पटवून सांगितले असल्याने ते ही लाईटींग करायला तयार नव्हते. त्यामुळे सुरज त्यांना या संदर्भात भेटायला आला की ते ही त्याला यावर्षी लाईटींग नको पुढच्या वर्षी बघु असे सांगत होते. आपल्या कामात वैभव यानेच खो घातला असून त्यानेच मंडळाच्या कार्यकर्त्यांना आपल्या विरूध्द सांगितले आहे हे सुरजने ओळखले होते. तो अगोदरच तापट आणि रागीट स्वभावाचा होता. त्यामुळे तो आपले म्हणणे खरे करण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची त्याची तयारी होती. तो आता वैभववर चिडून होता. त्याला एकदा धडा शिकवायाचाच असा विचार तो करीत होता.आपल्या कामात तो खो घालतो म्हणजे काय? आज त्याने खो घातला, उदया दुसरा कुणी तरी खो घालेल मग आपल्या धंदा कसा चालणार याचा तो विचार करीत होता. वैभवने लाईटींग करण्यास विरोध केल्याचे त्याने मनात ठेवले होते. योग्य वेळी त्याला चांगलाच समज देण्याचा त्याने मानस केला होता. शनिवार दि.९ ऑक्टोंबर २०२१ रोजी रात्री १०च्या दरम्यान सुरज पाटील हा ड्रिंक करूनच मंडळाच्या ठिकाणी आला. त्या ठिकाणी वैभव भोपळे सह मंडळातील अनेकजण होते. ते सगळे आपसात बोलत असताना सुरज तेथे आला. त्याने मंडळाच्या अध्यक्षांना व इतरांना मी लाईटींग करतो म्हणत असताना तुम्ही त्याला का विरोध करता असा थेट प्रश्न विचारीत त्याने मुद्दालाच हात घातला होता. त्यावेळी मंडळाच्या अध्यक्षांनी व इतरांनी त्याला मागचेच गुळगुळीत उत्तर दिले होते. यावर्षी कोरोनाची मर्यादा असल्याने गर्दी करणे शक्य नाही, लाईटींग केली तर गर्दी होते. म्हणून आपण पुढच्यावर्षी लाईटींचे बघुया असे त्यांनी सांगून त्याची समजूत काढीत होते. पण तो काही त्याचे ऐकत नव्हता. त्यातच वैभवने मध्येच त्याला म्हटले सुरज तू मंडळाच्या कामात व्यवसायीक संबंध आणू नकोस तुझा फायदा तू बघू नकोस असे म्हटल्यावर अगोदरच दारूच्या नशेत असणाऱ्या सुरजला त्याचा राग आलेला होता. तो तसा वैभववर अधिपासूनच चिडून होता. त्या दोघांत वादावादी सुरू झाली होती. सुरजला मंडळाचे कार्यकर्ते समजावून सांगत होते. पण तो वैभवच्या अंगावर जात त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत होता हे बघून वैभव ही त्याला मारायला त्याचे अंगावर गेला. त्यावेळी त्याला मंडळाच्या इतरांनी बाजुला नेले होते. तरीही वाद काही मिटत नव्हता. सुरज व वैभव ऐकमेकाच्या अंगावर जात होते. त्यातच दारूच्या नशेत असणाऱ्या सुरज याने अंगावर आलेल्या वैभववर आपल्याकडील चाकूने सपासप वार केले. कुणाला काही कळायच्या आत त्याने त्याच्या मानेवर पोटावर आणि हातावर चाकूने वार केल्याने वैभव याच्या पोटातून मोठया प्रमाणात रक्तस्राव सुरू झाला. तो खाली जमीनीवर पोटाला हात लावून पडला. वैभववर चाकूने हल्ला झाल्याने त्याचे घरचे लोक तेथे आले. घटनास्थळी बऱ्याचजणांनी गर्दी केली होती. त्यावेळी त्याला इतरांनी उचलून गावातील दवाखान्यात नेले. त्याची गंभीर अवस्था बघून त्याला कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात नेण्यास तेथील डॉक्टरांनी सांगितले. परंतू तेथील उपचारा पूर्वीच त्याचा मृत्यू झाला असल्याचे सीपीआर रूग्णालया तील डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची माहिती करवीर पोलीस स्टेशनला समजाताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी घटनेचा पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली होती. घटनास्थळावरून संशयीत आरोपी सुरज पाटील हा पळून गेला होता. ही घटना कुणी आणि कोणत्या कारणातून केली होती याची माहिती पोलीसांना मिळाली होती. घटनास्थळी इस्पूर्ली पोलीस स्टेशनचे स.पो.नी विश्वास पाटील याचे सह स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीसांनी भेट देवून घटनेची पाहणी केली होती. या घटनेची नोंद इस्पूर्ली पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवार सकाळी या घटनेतील संशयीत आरोपी सुरज पाटील हा स्वता:हून पोलीसात हजर झाला. पोलीसांनी त्यालात ताब्यात घेवून त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.मयत वैभव भोपळे याच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी वैभव साताप्पा भोपळे (वय २५) रा.लोहार गल्ली, खेबवडे याच्या खून प्रकरणी सुरज साताप्पा पाटील (वय २५) याचे विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेचा पुढील तपास इस्पूर्ली पोलीसाबरोबर करवीर पोलीस स्टेशनचे पोलीस ही करीत आहेत. कोणत्याही व्यवहारात संयम हा असावा लागतो पण तो संयम अनेकात असतोच असे नाही. आपला व्यवसायीक दृष्टीकोण ठेवून सार्वजनीक आणि धार्मिक कार्यक्रमात अनेकजण भाग घेत असतात आणि आपले तेच म्हणणे खरे करण्याचा प्रयत्न करतात आणि येथेच नको ती अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून....

## आदिवासीबहुल भागाच्या जलद ...

निर्देश दिले. जव्हार क्षेत्रात सिमेंट नाला बांधकामास मान्यता द्यावी. पाटबंधारे विभागाच्या अभियंत्याच्या मार्गदर्शनाखाली कामे पूर्ण करण्यात यावीत. डहाणू येथील सिमेंट बंधारे कामाचा प्रस्ताव सादर करावा. बंधारे बांधताना शेतकऱ्यांना त्या पाण्याचा फायदा व्हायला हवा अशा पद्धतीने कामे करण्याचे निर्देश दादाजी भुसे यांनी दिले. कोहज किल्ल्याची डागडुजी आणि सुशोभीकरणाचे कामही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दादाजी भुसे यांनी दिले.

## पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते ...

तपासणीसाठी जावे लागायचे. पण आज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे प्रयोगशाळा विक्रमी काळात सुरू केली. आता सध्या राज्यात १००० लॅबोरेटरी खाजगी व शासकीय यंत्रणांनी उभ्या केल्या आहेत. राज्याचे आरोग्य स्वास्थ्य चांगले रहावे यासाठी महाविकास आघाडी सरकार प्रयत्न करत आहे. या कठीण काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या कार्याची जगाने नोंद घेतली. देशातील सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्रीयामध्ये त्यांची गणना झाली आहे. महाविकास आघाडी सरकारने जनसामान्यांच्या जीवितास धोका होऊ नये म्हणून कोणतेही चुकीचे पाऊल उचलले नाही. पुढे बोलताना पालकमंत्री देशमुख म्हणाले की, लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेबांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय लातुरात सुरू केले. त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात ते सुरू झाले शासकीय महाविद्यालयाने अडचणीच्या काळात सर्व नागरिकांना सोयी सुविधा दिल्यात महाविद्यालयातील त्या सर्व विद्यार्थी डॉक्टर यांचे कौतुक आहे. महाविकास आघाडी सरकारने निवासी डॉक्टरांनी सेवा दिली म्हणून त्यांना ओंनरियन मंजूर केले आहे. आपण केलेल्या सुविधेमुळे तिसऱ्या लाटेला आपण सज्ज आहोत. या लाटेला तोंड देण्यासाठी महानगरपालिकेने शतप्रतिशत लसीकरण करावे, त्यांना लसीची कमतरता पडू देणार नाही. लातूर जागृत शहर आहे. प्रत्येक रुग्णालयात क्लिनिक व सर्व ठिकाणी लसीकरण करावे, मनपाने लसीकरण कॅम्पेन व सामाजिक कार्यकर्त्यांनी लसीकरण कॅम्प घ्यावे अशा सूचनाही त्यांनी केल्या. ते म्हणाले की तिसरी लाट येऊ नये अशी आपली प्रार्थना आहे जगात असे सिद्ध झाले आहे की जेवढे जास्त लसीकरण केले जाते त्या ठिकाणी कोरोना वाढत नाही. जबाबदार नागरिक म्हणून सर्वांनी लसीकरण करून घ्यावे. मेडिकल प्रोटोकॉलमध्ये आता जागरूकता आलेली आहे. रोग लवकर कळला तर तो लवकर बरा करता येतो. हेल्थ अवरनेससाठी हे सेंटर उपयोगाला येईल महाराष्ट्राला याची गरज आहे. दुसऱ्या लाटेमुळे महाराष्ट्र सरकारने सर्व आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. वैद्यकीय क्षेत्राला खाजगी लोकांकडून गुंतवणूक करून जनतेला अधिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. लातूर हे डॉक्टरांचे शहर आहे नीट मध्ये हजार ते दीड हजार लातूरचे यशस्वी विद्यार्थी असतात. या डायग्नोस्टिक सेंटर मध्ये वीस डॉक्टर सहभागी आहेत. लातुरात सुपरस्पेशालीटी उभी राहावी, मुंबई दिल्ली, हैदराबाद, इंग्लंड, येथे जाण्याची गरज भासू नये. लातुरात एक नवीन डायग्नोस्टिक सेंटरच्या माध्यमातून सेवा सुरू होत आहे याचा आम्हाला आनंद आहे. यावेळी पालकमंत्री यांनी उपस्थित सर्वांना दसऱ्याच्या व येणाऱ्या दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या याप्रसंगी मनपा महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या.

## पंतप्रधान आवास योजनेचा त्वरित लाभ...

आहेत पण या परिसरात ए टी एम सुविधा उपलब्ध नाही, म्हणून एटीएम सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी अन्यथा वंचित बहुजन आघाडी अहमदपुरडुन, तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असे निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर वंचित बहुजन आघाडी जिल्हा उपाध्यक्ष मनोहर पाटील, वंचित मार्ग दर्शक बाबुराव जंगापल्ले, वंचितचे सुप्रीय भाऊ बनसोडे, तालुकाध्यक्ष सहदेव व्होनाळे, उपाध्यक्ष उत्तम गोरे, महासचिव सारिपुत्र ढवळे, उपाध्यक्ष विकास घोटे, प्रदिप दिपक राव जाधव,सचिव तबरेजभाई सय्यद, सचिव मंगेश स्वामी, प्रवक्ते बिलाला शेख, माळेगांव ग्राम पंचायत सदस्य शिवानंद कांबळे, मारोती भुरे पाटील, व्रजेद्र तुरेवाले आदी उपस्थित होते.

## पीडित महिला व मुलींसाठी मनोधैर्य ...

विकास योजने अंतर्गत उपक्रम व योजनांबद्दल माहिती दिली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वकील संतोष डेंगाणे यांनी केले. या कार्यक्रमाला वाडा तालुका वकील संघाचे सदस्य वकील रविंद्र पाटील, वकील सचिन पाटील, वकील अविनाश साळवे, वकील समीर पाटील, वकील सुधीर पाटील तसेच ग्रामपंचायत संरपच शालिनी गोवारी, उपसंरपच समिर ठाकरे सभासद, पोलीस पाटील व ऐनशेत पेठरांजणी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

तसेच वाडा तालुका विधी सेवा समिती व वाडा तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी २:०० वाजता वाडा न्यायालयात कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वकील संतोष डेंगाणे यांनी केले. सदर कार्यक्रमात वरिष्ठ वकील सी.पी पाटील यांनी अन्न अधिकार व वकील लाटे यांनी महिलांचे अधिकार याविषयी उपस्थितांना माहिती दिली . सदर कार्यक्रमास तालुका वकील संघाचे पदाधिकारी, सदस्य व साधारणतः ३० पक्षकार उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना लोकल प्रवासाची परवानगी ...

लोकल प्रवासाची परवानगी दिलेली आहे. मात्र लोकल ट्रेनच्या प्रवास करण्यासाठी कोवीड व्हॅक्सिनचा दोन डोसची आवश्यकता आहे आणि सरकारचा तसा आदेश आहे. पण अजून १८ वर्षांखालील मुलांना कोरोना प्रतिबंधक लसीची परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना लोकल प्रवास करताना अडचणी येत आहेत. भवानजी यांच्या या पत्राची आरोग्यमंत्री टोपे यांनी तातडीने दखल घेऊन याबाबत आरोग्य सचिवांना आदेश जारी करण्याचे निर्देश दिलेत. त्याबद्दल बाबूभाई भवानजी यांनी आरोग्य मंत्र्यांचे आभार मानले आहेत.

## जेईई ॲडव्हान्स २०२१ परीक्षेत ...

महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी एकत्रित प्रयत्नांची पराकाष्टा करून हे यश संपादन केलेले आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष प्रा.उमाकांत होनराव, संस्थेच्या सचिव तथा महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. सुलक्षणा केवळराम, संस्थेच्या कोषाध्यक्ष मा. प्रेरणा होनराव, संस्थेचे कार्यकारी संचालक प्रा.ओंकार होनराव, उपप्राचार्य मा.राजकुमार केदासे, प्रा. उमेश राठोड, प्रा.सुहास काटकर, प्रा.अविनाश पांडे, प्रा. रामशंकर यादव, प्रा.सुनील कुमार वर्मा, प्रा. विकास कुमार सोनी, प्रा.सतिष पाटील, प्रा. प्रसाद कुलकर्णी, प्रा. सुदेश पगार, प्रा.श्रीराम कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे या दैदीप्यमान यश प्राप्तीसाठी कौतुक केले.

# विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नपूर्तीसाठी एकत्रित व्हा!

## बसपा प्रदेशाध्यक्ष अँड.संदीप ताजने यांचे आवाहन




**मुंबई/प्रतिनिधी**

अशोक विजयादशमीच्या ऐतिहासिक दिनी १४ ऑक्टोबर १९५६ मध्ये महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ५ लाख अनुयायींसोबत दीक्षाभूमीवर बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. देशात बौद्ध धम्माचे चक्र बाबासाहेबांनी गतिमान करीत 'धम्मचक्र प्रवर्तन' केल्याने हा दिवस 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणून ओळखला जातो. आता डॉ.बाबासाहेबांचे स्वप्नपूर्वीसाठी सर्वांनी एकत्रित येण्याचा संकल्प करावा, असे आवाहन बहुजन समाज पार्टीचे प्रदेशाध्यक्ष अँड.संदीप ताजने यांनी गुरूवारी केले. भुसावळ येथे संवाद यात्रेनिमित्त आयोजित कार्यक्रमातून त्यांनी जिल्ह्यातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना संबोधित केले.

सम्राट अशोक तसेच डॉ.बाबासाहेबांचे स्वप्न पुर्ण करण्याच्या अनुषंगाने मान्यवर कांशीराम यांनी जीवन समर्पित केले. ''मेरे सपनों का भारत, सम्राट अशोक के भारत जैसा होगा'' असे मान्यवर कांशीराम नेहमी म्हणायचे. सम्राट अशोकांचा भारत म्हणजेच 'बौद्धमय भारत'. भारतात बौद्ध धम्माची बीजे सम्राट अशोकांनी रोवली. आजही सम्राट अशोकाकडून मिळालेला वारसा दिशादर्शक, देशाला ओळख देणारी आहे. मा.कांशीराम यांनी याच विचारधारेला राजसत्तेत परिवर्तित करण्याचे महत्वाचे काम केले. मा.कांशीराम यांना अभिप्रेत असलेला 'सम्राट अशोक' यांचा भारत निर्मित करण्याच्या कार्यपथावर मा.बहन मायावती जी अग्रेसर आहेत. मा.बहनजींनी त्यांच्या काळात सर्वसमावेश विकासासाठी सर्वजन 'हितकारत' निर्णय घेत, अठरा विश्व दारिद्र्यात खितपत पडलेल्या समाजाचा उद्धार केला. दलित, शोषित, पीडितांना शासनकर्ती जमात बनवण्याचे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न मा.कांशीराम यांनी पूर्णत्वास आणले. मा.बहन मायावती जी या स्वप्नाची अंमलबजावणी करीत समाजाला न्याय दिला. महाराष्ट्रात देखील सर्वसमावेश विकासासाठी मा.बहनजींच्या नेतृत्वात बसपा सत्तेवर येणे आवश्यक आहे. सर्वांनी एकत्रित येवून बसपाच्या निळ्या झेंड्यावर विश्वास दर्शवला तर 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' ही संकल्पना प्रत्यक्षात येईल, असे अँड.ताजने म्हणाले. कार्यकर्त्यांनी पक्षाचा विचार गावखेड्यासह तरूणांपर्यत पोहचवण्याचे आवाहन करीत त्यांनी आगामी निवडणुकांच्या तयारीला लागण्याचे निर्देश कार्यकर्त्यांना दिले. कार्यक्रमात प्रदेश महासचिव रविंद्र गवई, जिल्हा प्रभारी सुरेश गणवीर, युवराज बारेला, जिल्हाअध्यक्ष ॲड.नितीन रजाने, उपाध्यक्ष प्रकाश मेघे, महासचिव राजाराम मोरे, कोष्याध्यक्ष नारायण अडकमोल, सचिव मायाताई गायकवाड, संघटक ईश्वर जाधव,बी व्ही एफ अनिल गाढे, विलास कुमार लुल्हे तसेच जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**मा.कांशीराम यांनी मानवतेला 'सम्यक मार्गा'वर आरूढ केले -रैना**

अथक मेहनत, संघर्षाच्या जोरावर मानवतेला संतुष्ट करण्यासाठी संपूर्ण मानवतेला 'सम्यक मार्गा'वर आरूढ करण्यासाठी मा.कांशीराम यांनी त्यांचे जीवन अर्पित केले. बहुजनांनी मा.कांशीराम साहेबांसोबत मिळून गावोगावी, शहरोशहरी, गल्ली-बोळात बहुजन आंदोलनाची ज्योत तेवत ठेवली. देशात दलित-शोषित समाजाचा सन्मान-स्वाभिमान तसेच आत्मनिर्भरतेने जीवन व्यतीत करण्यासाठी आपले घरदार सोडून मा.कांशीराम साहेबांनी ऐतिहासिक सामाजिक आंदोलनाची जमीन तयार केली, अशी भावना प्रदेश प्रभारी प्रमोद रैना यांनी व्यक्त केली. कांशीराम यांनी उत्तर प्रदेशात बाबासाहेबांना अपेक्षित सामाजिक क्रांती घडवून आणत दीनदुबळ्यांना स्वतःचे वाली बनवले असे रैना म्हणाले.

# भिवंडी भादवड येथे नवरात्री उत्सवादरम्यान नवदुर्गा अंगणवाडी सेविकांचा सन्मान




**भिवंडी/आकाश गायकवाड**

कै महेंद्र समाजकल्याणकारी संस्थेच्या वतीने आयोजित नवरात्री उस्तवा दरम्यान ओमसाई महिला मंडळातर्फे कोव्हिडं काळात स्वतः च्या जीवाची पर्वा न करता समाजाच्या आरोग्याची काळजी वाहणाऱ्या अंगणवाडी सेविका व आशा वर्कर्स यांचा नवदुर्गा म्हणून सन्मान करण्यात आला.

नवरात्री उत्सवा दरम्यान ठिकठिकाणी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करून विविध क्षेत्रात कार्यरत मागीळांचे सन्मान करून साजरा होत असताना शिवसेना माजी आमदार रुपेश म्हात्रे यांच्या हस्ते अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला. अंगणवाडी सेविकांनी समाजाच्या आरोग्याची काळजी वाहताना स्वतःसह कुटुंबियांच्या जीवाची पर्वा केली नाही त्यामुळे समाजप्रति खऱ्या अर्थाने समर्पण भावनेने काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका या समाजाच्या नवदुर्गा आहेत त्यामुळे त्यांचा सन्मान करणे समाजाचे कर्तव्य आहे अशी भावना रुपेश म्हात्रे यांनी बोलून दाखवीत सर्वांचा गौरव केला. तर या प्रसंगी माजी आमदार रुपेश म्हात्रे, स्थायी समिती सभापती संजय म्हात्रे, ओमसाई महिला मंडळाच्या सुचिता रुपेश म्हात्रे, विनिता संजय म्हात्रे, अनिता नरेश म्हात्रे यांनी महिलांचा सन्मान केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी नरेश म्हात्रे, मनोहर तरे यांनी विशेष मेहनत घेतली तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र तरे यांनी केले.

# भिवंडीत चोर समजून तरुणांची हत्या, ९ जणांवर गुन्हा दाखल!

**भिवंडी/प्रतिनिधी**




शहरातील नारपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मनिसूरत कंपाऊंडमध्ये चोर समजून एका तरुणांची बेदम मारहाण करून हत्या केल्या प्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात ९ जणांच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ माजली आहे. रमेश मुरली शर्मा (वय २५) असे हत्या झालेल्या युवकांचे नाव असून तो साई नगर ठाणे येथील राहणारा असून त्याचे मुळगाव उत्तरप्रदेशातील चारीगाव आहे तो शनिवारी रात्री दिड वाजण्याच्या सुमारास अंजूरफाटा येथील मनिसूरत कंपाऊंड मधील महालक्ष्मी एम.एस.स्कैप ट्रेडर्स मधील ९ भंगार व्यवसायिकांनी त्याला चोर समजून लाकडी मारदांड्याने बेदम मारहाण केली त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला याची माहिती मिळताच नारपोली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह शव विच्छेदणासाठी शासकीय रुग्णालयात पाठवून शिवपुजन गुप्ता, पिंटू गुप्ता, पंचगुलाम गुप्ता, शिवकुमार वर्मा, पवनकुमार मिश्रा,देवीप्रसाद वर्मा, बाबुलाल गौतम, जगदीश गौतम, रामभरोस निशाद यांच्या विरोधात भादंवि कलम ३०२,३४ प्रमाणे हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून यामधील ८ जणांना अटक करण्यात आली असून रामभरोस निशाद हा फरार झाल्याने त्याचा शोध सुरु आहे, या गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक राऊत करीत आहे.

# जुळे सोलापुरातील महात्मा बसवेश्वर उद्यान विकासासाठी निधी देणार -खा.डॉ.जयसिध्देश्वर

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापुरातील जुळे सोलापूर येथे वसुंधरा महाविद्यालयासमोरील मोकळ्या जागेत महात्मा बसवेश्वर यांच्या नावाने भव्य असे उद्यान उभारण्यात येणार आहे. त्याच्या विकासासाठी भरीव निधी देणार असल्याचे खा.डॉ.जय सिध्देश्वर महाराज यांनी जाहीर केले. या उद्यानाचे विजयादशमीच्या मुहूर्तावर मोठ्या थाटात भूमिपूजन झाले. या उद्यानाचे भूमिपूजन खा.डॉ. जयसिध्देश्वर महाराजयांच्या हस्ते झाले. यावेळी होटगी मठाचे डॉ. मल्लिकार्जून शिवाचार्य महाराज, आमदार सुभाष बापू देशमुख, माजी आ.शिवशरण अण्णा पाटील, उपमहापौर राजेश काळे, सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.डॉ. इरेश स्वामी, सिद्धेश्वर मंदिराचे मानकरी राजशेखर हिरेहबू, श्रमिक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, काँग्रेसचे नेते डॉ.बसवराज बगले, लिंगायत समन्वय समितीचे महासचिव विजयकुमार हत्तुरे हे प्रमुख पाहूणे उपस्थित होते. यावेळी उपमहापौर राजेश काळे यांनी स्वागत व प्रास्ताविक करून आगामी दोन महिन्यात या उदयानाची निर्मिती करणार असे सांगितले, विजयकुमार हत्तुरे यांनी उपमहापौर राजेश काळे यांचे लिंगायत समाजाच्या वतीने अभिनंदन केले. होटगी मठाचे डॉ. मल्लिकार्जून शिवाचार्य यांनी या उद्यानाचे कौतुक करून मंगळवेढा येथील स्मारकासाठी खासदारांनी लक्ष घालावे अशी मागणी केली. तर आ.सुभाष देशमुख यांनी जुळे सोलापुरात राजेश काळे यांनी भरपूर निधी आणून विकास कामे करावीत, अशी सूचना यावेळी बोलताना केली. जनता बँकेचे संचालक महेश अंदेली, आनंद मुस्तारे रेवणसिद्ध आवजे, हुलसुरे, नगर अभियंता संदीप कारंजे आय एम एस शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.ए.डी.जोशी, व्ही व्ही पी पॉलिटेक्निक कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष प्रा.जी के देशमुख विश्वनाथ शेगावकर, अरविंद भडोळे, टी.बी.जाधव, मल्लिनाथ आकळवाडी उपस्थित होते. महात्मा बसवेश्वर उद्यान विकास समितीचे प्रदीप तडकल, दयानंद भिमदे, सकलेश बाभूळगावकर, संतोष केंगनाळकर, राजू कुराडे, संजय जम्मा, विनया ढेकळे, संपदा जोशी, शोभा स्वामी रविश्वनाथ आमणे, अनिल उपरे, गणराज पाटील, नागेश पडणूरे, राजू वनकोरे हे हजर होते.शीतल जालिमिंचे आणि सौ.तडकल यांनी सूत्रसंचालन केले.

# अंबरनाथच्या केमिकल कंपनीत गॅस गळतीमुळे ३० कर्मचाऱ्यांना बाधा

**अंबरनाथ/सुनील तांबे**



अंबरनाथच्या आनंदनगर एमआयडीसीतील आर.के. केमिकल्स या कंपनीत आज सकाळच्या सुमारास अचानक गॅसगळती झाली. या गळतीमुळे शेजारील प्रेसफिट नावाच्या कंपनीतील ३० कामगारांना मोठा त्रास झाला. त्यामुळे त्यांना तातडीने उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अंबरनाथच्या आनंदनगर एमआयडीसीत आर.के. केमिकल्स नावाची कंपनी असून त्यामध्ये सल्फ्युरिक सिडवर डिस्टिलेशनची प्रक्रिया केली जाते. कंपनीत आज सकाळी नेहमीप्रमाणे डिस्टिलेशनची प्रक्रिया सुरू असताना १० वाजताच्या सुमारास अचानक प्लँटमधला एक पाईप निसटला आणि त्यातून हवेत गॅस पसरला. हा गॅस थेट बाजूलाच असलेल्या प्रेस फिट नावाच्या कंपनीत घुसला. त्यामुळे तिथे काम करत असलेल्या ३० कामगारांना उलट्या, मळमळ, गुदमरणे असा त्रास सुरू झाला. त्यामुळे त्यांना तातडीने उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. या कर्मचाऱ्यांनी केमिकलचा आम्हाला मोठा त्रास झाल्याचं सांगितलं. या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी अग्निशमन दल, शिवाजीनगर पोलीस आणि एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी कंपनीच्याच निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याच समोर आलं.

# बेकायदेशीर डिझेल भरल्याने टँकरसह कोटीचा ऐवज जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्गावर हॉटेल समर्थ जवळील आकांक्षा प्लॅस्टिकच्या खाजगी बस पार्किगच्या जागेत तीन आराम बस मध्ये टँकरमधून बेकायदेशीररित्या डिझेल भरत असताना सोलापूर शहर गुन्हे शाखेने छापा टाकून १ कोटी १ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी सात जणांना अटक करण्यात आली आहे. याबाबत सोलापूर शहर गुन्हे शाखेचे फौजदार संदीप शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तानाजी कालिदास ताटे (रा.मानेगाव, ता.बार्शी, जि. सोलापूर), युवराज प्रकाश करमाळकर (रा. पंचशील नगर, वैराग, ता. बार्शी, जि.सोलापूर), अविनाश सदाशिव गंजे (रा. भवानी पेठ), सुधाकर सदाशिव गंजे (रा. अवंती नगर), श्रीनिवास लक्ष्मण चव्हाण (रा. अभिषेक नगर), लतीफ शेख (रा. कवडगाव, जि. उस्मानाबाद) व हिमांशू अशी अटक करण्यात आलेल्या सात जणांची नावे आहेत. आरोपींनी संगनमत करून स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीरपणे व बेकायदेशीर मार्गाने तयार करून किंवा चोरी करून मिळवलेला डिझेल सारखा द्रवपदार्थ हा टँकर (एमएच २५ एके २४१७) मधून खासगी आराम बस (एनएल ०१, बी १६८७), (एमएच १३ सीयू ४५४४)मध्ये भरत असताना आढळून आले. पोलिसांनी एक हजार लिटर डिझेल सहा टँकर व तीन आराम बस असा एकूण १ कोटी १ लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे अटक केलेल्या आरोपींना न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. पुढील अधिक तपास सोलापूर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय साळुंखे हे करीत आहेत.


**वसई विरार शहर महानगरपालिका**

**प्रभाग समिती 'जी' वालीव**

**विभागीय कार्यालय वालीव**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय वालीव येथे झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंध हरकतीच्या लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | वालीव | १०/६२३१/१० | मुनानी इंटरप्रायजेस | विजित सुंदर शेट्टी व इतर ४ |
| २. | वालीव | ५/५२३२/१ | कांतीलाल मेघराज शर्मा | शहजादा मुलकबहादूर खान व १ |
| ३. | वालीव | १/४०१६/२७ | बबिता सी. सोनिगरा व १ | रामबदन झुक्कू यादव |
| ४. | वालीव | ९/२६९० | सुनिल धवन व कु. ध्रुव धवन | रमेशचंद्र राघवजी गडा |
| ५. | वालीव | ९/२७०१ | जे.डी. एक्सपोर्टस कपील धवन | रसिला रमेश गडा |
| ६. | वालीव | ९/२६८९ | रमेश माधवदास ध्रुव | रमेशचंद्र राघवजी गडा |
| ७. | वालीव | ९/२६९१ | रमा कपिल धवन | रमेशचंद्र राघवजी गडा |
| ८. | वालीव | ९/६७८६/११ | बाबुलाल रामसुमर पटेल | अखिलेश बाबुलाल पटेल |
| ९. | वालीव | ९/१९५१ | अरविंद सिंग हरबन्स भुर्जो | मगनलाल कांजी गाला |
| १०. | वालीव | ९/२६८९ | कपिल धवन | उर्विश रमेश ग |
| ११. | वालीव | ९/२६९२ | मनोहर किसनचंद्र जावा | रमेशचंद्र राघवजी गडा (एच.यु.एफ.) |
| १२. | वालीव | ६/३५५३/२० | हरीओम टी ॲण्ड कोल्ड्रींक | दर्शना एन. म्हात्रे |
| १३. | वालीव | ४/१३९४ | अतुल अशोक मेस्त्री व १ | मोहम्मद शोएब जव्वाद हुसैन खान |
| १४. | वालीव | ७/७१३४/३ | अब्दुल मोहित खान | राहुल कुवरकांत दुबे |
| १५. | वालीव | ३/७०८६/७ | रामजी गणेशा गामी | मयुरी उत्तम गावडे |
| १६. | वालीव | ८/३८३८/४ | आर.के. लॅण्ड डेव्हलपर्स | केनाराम भल्लाजी चौधरी |
| १७. | वालीव | ८/३८३८/५ | आर.के. लॅण्ड डेव्हलपर्स | केनाराम भल्लाजी चौधरी |
| १८. | वालीव | १/२८३६ | मोहम्मद रिजवानू उल्लाह | मोहम्मद रिजवानू उल्लाह व कैलास सत्यदेव तिवारी (विभक्त) |
| १९. | वालीव | ६/६८२०/४ | आयशा हुसेन सेलॉट | लालजी मकलु यादव व १ |
| २०. | वालीव | ३/७००९/८ | स्काय डेवलपर्स | रफातुल्लाह महीबुल्लाह खान |

जावक क्र. वविशम/विवा/१२३५/२०२१-२२

दिनांक : १२/१०/२०२१

सही/-

प्र. सहा.आयुक्त

प्रभाग समिती 'जी' वालीव

वसई-विरार शहर महानगरपालिका

18 TO 24 OCTOBER 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 16/10/2021 9:36 PM Page 1



# आदिवासीबहुल भागाच्या जलद विकासासाठी वीज, जलसंधारणाची कामे त्वरीत पूर्ण करावी -दादाजी भुसे



**पालघर/प्रतिनिधी**

डहाणू आणि जव्हार उपकेंद्र प्रकल्पाबाबत वन हद्दीतून जाणाऱ्या अतिउच्च वीज दाब वाहिनीस परवानगी मिळण्यासंदर्भातील कार्यवाही जलद गतीने करण्यात यावी. वसई, विरार मधील चार आणि डहाणूमधील एका गावात वीज वितरणाच्या कामास मंजूरी देऊन, आदिवासी भागात १०० टक्के विद्युत पुरवठा करण्याचे उद्दीष्ट पूर्ण करावे. आदिवासीबहुल भागाचा विकास जलदगतीने करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.

मंत्रालयात पालघर, डहाणू, जव्हार, वसई, विरार वीजपुरवठा, वीज उपकेंद्र उभारणे, किल्ल्यांची डागडुजी आदी संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीत कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विकासकामांची गती वाढविण्यासंदर्भात निर्देश दिले. या बैठकीस पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ, महापारेषणचे मुख्य अभियंता पीयुष शर्मा, पालघर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ, महावितरणचे अधीक्षक अभियंता किरण नागावकर, वसई महावितरणचे अधीक्षक अभियंता राजेशसिंग चव्हाण आदीसह संबंधित अधिकारी उपस्थित होते. कृषी मंत्री दादाजी भुसे म्हणाले, पालघर जिल्ह्यातील डहाणू उपकेंद्र ते सुर्यानगर कवडास आणि जव्हार उपकेंद्र प्रकल्पासंदर्भात वन हद्दीतून जाणाऱ्या अतिउच्च वीज दाब वाहिनीच्या परवानगी संदर्भात वन विभागाने पुढील आठ दिवसात कार्यवाही करावी आणि हे उपकेंद्र उभारण्यासंदर्भात वीज वितरण कंपनीने जलदगतीने कामे पूर्ण करावी. पालघर आणि जव्हार पर्यटनाच्या माध्यमातून विकसित करावयाचे आहे. आदिवासीबहुल गाव आणि पाड्यात १०० टक्के वीज वितरण होणे गरजेचे आहे. ज्या गावात कामे सुरू आहेत त्या कामांची गती वाढवावी आणि डहाणूमधील एक गाव व वसई, विरार मधील ४ पाड्यांमध्ये वीज वितरणास संबंधित विभागाने मान्यता द्यावी, जेणेकरून आदिवासीबहुल क्षेत्रात १०० टक्के विज वितरणाचे उद्दीष्ट पूर्ण होण्यास मदत होईल. डहाणू आणि वसई, विरार क्षेत्रातील मंजुर आणि प्रत्यक्ष पूर्ण झालेल्या कामांची जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाहणी करून अहवाल सादर करावा, असेही दादाजी भुसे यांनी ...पान ६ वर

# पंतप्रधान आवास योजनेचा त्वरित लाभ देण्याची मागणी



**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपुर शहर व ग्रामीण भागातील जनतेला पंतप्रधान आवास योजनाचा लाभ देण्यात यावा, अहमदपुर तालुक्यातील गावजोड रस्ते त्वरित दुरुस्त करण्यात यावेत, अहमदपुर शहरातील आंबेजोगाई रोडवर एटीएम सुविधा उपलब्ध करावी अन्यथा वंचित बहुजन आघाडी अहमदपुर आंदोलन करणार असल्याचे निवेदन मा.जिल्हाधिकारी लातूर यांना उपविभागीय अधिकारी अहमदपुर यांच्या मार्फत देण्यात आले. अहमदपुर शहर व तालुक्यात २०२२ पर्यंत पंतप्रधान आवास योजना लाभार्थी यांना घरे मिळणार अशी प्रशासनाकडून जाहिरात होत आहे. पण प्रत्यक्षात सदर योजनेची अंमलबजावणी दोन वर्षांत दिसतं नाही, ज्यांना घरकुल मिळाले त्यांना अद्याप पहिला, दुसरा हप्ता मिळालेला नाही. त्यामुळे लोकं कर्जबाजारी होऊन आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. तरी ज्यांना घरकुल मिळाले आहे बांधकाम केले आहे त्यांना पैसे वितरीत करावे. गेल्या महिन्यात अतिवृष्टीमुळे शहर व ग्रामीण भागातील गाव जोड रस्ते खराब झाले आहेत लोकांना रस्त्यावर चालता येत नाही,तरी सदर रस्त्याची कामे करुन वर्ष ही न झाल्याने संबंधित गुत्तेदार यांच्याकडून दुरुस्ती करुन घ्यावी. अहमदपुर शहरातील आंबेजोगाई रोडवर तहसीलदार कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, ग्रामीण आरोग्य केंद्र, पोलिस ठाणे, उपविभागीय पोलिस अधीक्षक कार्यालय, न्यायालय, नोटरी कार्यालय, बॉड विक्रेते कार्यालय ...पान ६ वर

# जवळगा येथे दोन एकर ऊस जळून खाक

**औसा/प्रतिनिधी**



तालुक्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अनागोंदी कारभाराने कळस गाठला असून महावितरणच्या हलगर्जीपणामुळे तालुक्यात विद्युत पुरवठा व्यवस्था विस्कळीत झाली आहे. जवळगाव (पो) येथील निलेश मनोहर काकडे या शेतकऱ्याच्या सर्वे नंबर २७६ मध्ये तीन एकर ऊस होता दिनांक १३ ऑक्टोबर रोजी शॉर्टसर्किट होऊन या शेतकऱ्याचा दोन एकर ऊस आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. औसा तालुक्यातील ही दुसरी घटना आहे. यापूर्वी मातोळा शिवारातील महिला शेतकऱ्याचा ऊस महावितरणच्या चुकीमुळे जळाला होता. औसा तालुक्यात महावितरणच्या विद्युत पुरवठा व्यवस्थेचा पूर्ण बोजवारा उडाला असून शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. याबाबत महावितरणचे अधिकारी कर्मचाऱ्यांना कधी जाग येणार असा प्रश्न्न उपस्थित केला जात आहे. मागील तीन आठवडे सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून नैसर्गिक आपत्ती मुळे हतबल झालेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस जळाल्यामुळे आता शेतकऱ्यावर पुन्हा आर्थिक संकट कोसळले आहे.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त वाड्यात भव्य सोहळा संपन्न





**वाडा/वार्ताहर**

सम्राट अशोका यांनी इसवी सन पूर्व तिसऱ्या शतकामध्ये बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. हा दिवस अशोका विजयादशमी म्हणून ओळखला जातो. याच दिवसाच औचित्य साधत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर १९५६ साली नागपूर मध्ये सुमारे पाच लाख अनुयायींसोबत बौद्ध धम्म स्वीकारला होता. अशोका विजयादशमी हा दिवस धम्मचक्र प्रवर्तनदिन म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने वाडा तालुक्यातील खुपरी येथे (दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया) भारतीय बौद्ध सभेच्या वाडा शाखेच्या वतीने शुक्रवारी (दि.१५ऑक्टोबर) भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात माजी जिल्हा अध्यक्ष नवी मुंबई केंद्रीय शिक्षक, भारतीय बौद्ध महासभा तथा डिव्हिजन ऑफिसर समता सैनिक दलाचे अनिल शिंदे गुरुजी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा अध्यक्ष किरण गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक समीर लोंढे, कोकण विभाग मराठा सेवा संघाचे अध्यक्ष नितीन मोकाशी, भारतीय बौद्ध महासभेचे सरचिटणीस प्रकाश जाधव, गवंडी बांधकाम मजूर संघटनेचे अध्यक्ष भिमराव बागुल, राष्ट्र सेवा दलाचे वाडा तालुका अध्यक्ष ऋषिकेश सावंत, भारतीय बौद्ध महासभेचे कोषाध्यक्ष वसंत गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे संस्कार सचिव नारायण जाधव, बौद्ध धम्मीय प्रबोधक विनायक जाधव आदी मान्यवरांनी गौतम बुद्ध, त्यांचा धम्म व धम्म प्रवर्तन व विजया दशमी या विषयांवर आपले मोलाचे विचार मांडले. तर नितीन मोकाशी यांनीही आपले प्रखर विचार मांडत सावित्रीबाई फुलेंवर रचलेली कविता वाचून उपस्थितांना टाळया वाजवायला भाग पाडले. या वेळी डॉ.माधुरी गायकवाड, निहेश गायकवाड (अध्यक्ष,निवा फाऊंडेशन) राम जाधव (नगरसेवक, वाडा), नंदा बोरकर, (वाडा, पोलीस पाटील), करुणा जाधव (चिखले पोलीस पाटील), अनंता गायकवाड, विलास सालवे (बामसेफ पदाधीकारी), भाऊराव कांबळे, विशाल थोरात, सतीश भोईर, सुरेश भोईर, प्रदीप खैरकर (अध्यक्ष, नेहरोली ग्रामशाखा), मोहन वाघचौरे (अध्यक्ष, जामघर ग्रामशाखा), कल्पनाताई जाधव (अध्यक्ष, खुपरी ग्रामशाखा) यांच्यासह खुपरी ग्रामशाखाचे पदाधीकारी व सर्व धम्म ऊपासक, ऊपासिका उपस्थित होते.

# ठाणे-भिवंडी बायपास रस्ता व माळशेज रस्त्याचे काम लवकर पूर्ण करा; कपिल पाटील यांची मागणी

**भिवंडी/आकाश गायकवाड**




कल्याण ते माळशेज घाट रस्ता आणि ठाणे-भिवंडी बायपास रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांच्याकडे केली आहे. राष्ट्रीय महामार्गाच्या ६३० किलोमीटरच्या प्रकल्पांचे लोकार्पण आणि कोनशिला अनावरण केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज नाशिक येथे पार पडले. या कार्यक्रमास उपस्थित राहून केंद्रीय राज्य मंत्री कपिल पाटील यांनी गडकरी यांच्याकडे ही मागणी केली. या वेळी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भारती पवार, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कृषी मंत्री दादाजी भुसे यांची उपस्थिती होती. देशातील सर्वाधिक वर्दळीचा रस्ता असलेल्या ठाणे-भिवंडी १२ पदरी बायपासला मंजुरी मिळाली आहे. मात्र, त्याचे काम रखडले आहे. या रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे. मुंबई व मराठवाड्याला जोडणाऱ्या कल्याण ते माळशेज रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाला सुरुवात करावी, माळशेज घाटात पारदर्शक (काचेचा) स्कायवॉक हा ड्रीम प्रोजेक्ट साकार करण्यासाठी मान्यता मिळावी, वडपे ते गोंदे (नाशिक) पर्यंत सहा पदरी महामार्ग मंजूर करावा, माळशेज बोगद्याच्या सुमारे ३ हजार कोटींच्या प्रकल्पाला मान्यता द्यावी, आदी मागण्या केंद्रीय राज्य मंत्री कपिल पाटील यांनी केल्या आहेत. या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे गडकरी यांनी आश्वासन दिले.

# पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते मॉडर्न इमेजिंग सेंटरचे उद्‌घाटन

**लातूर/प्रतिनिधी**



कोरोना प्रादूभावाच्या ठीण काळात महाविकास आघाडी सरकार व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या कार्याची जगाने नोंद घेतली आहे. सरकारने जनसामान्यांच्या जीवितास धोका होऊ नये म्हणून कोणतेही चुकीचे पाऊल उचलले नाही तर जनतेच्या आरोग्याला प्रथम प्राधान्य देऊन कोरोना काळात कार्य केले असे राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. लातूर येथे डॉ. मनोज देशमुख व सहकाऱ्यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या अद्ययावत वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज अशा मॉडर्न इमेजिंग सेंटरचा राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते विजयादशमी चे औचित्य साधून उद्घाटन करण्यात आले. या नव्या व्यवस्थेमुळे नेमक्या व्याधीचे लवकरात लवकर निदान होऊन रुग्णांवर तातडीने उपचार करणे शक्य होणार आहे, शिवाय त्यासाठीच्या खर्चातही बचत होणार आहे. त्यामुळे वैद्यकीय उपचाराचे केंद्र म्हणून विकसित होत असलेल्या लातूरसाठी हे नवे दालन उपलब्धी ठरेल अशा शुभेच्छा पालकमंत्री अमित विलासराव देशमुख यांनी दिल्या. यावेळी महापौर विक्रांत गोजमगुंडे, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. लक्ष्मण देशमुख, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेचे अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख, लातूरच्या आयएमए अध्यक्ष सुरेखा काळे, डॉ.दयानंद मोटेगावकर, डॉ. मनोज देशमुख, डॉ.राहुल रनखांब, डॉ.संदीप कदम, डॉ.तानाजी माने, ओमप्रकाश मोतीपोवळे, चंद्रकांत सातपुते आदींसह डॉक्टर, नागरिक उपस्थित होते. या मॉडर्न इमेजिंग सेंटरमध्ये सिटीस्कॅन, इमेजिंग, सोनोग्राफी एक्स-रे, कलर डॉपलर आदी आधुनिक दर्जाच्या सुविधा डॉक्टर मनोज देशमुख यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या या सेंटरमध्ये देण्यात येणार आहेत. यावेळी पालकमंत्री ना. देशमुख यांनी इमेजिंग सेंटरची पाहणी केली माहिती घेतली. यावेळी बोलतांना पालकमंत्री देशमुख म्हणाले की कोरोना महामारीची कोणालाच कल्पना नव्हती. सुरुवातीला पुणे, सोलापूर या ठिकाणी ...पान ६ वर

# पीडित महिला व मुलींसाठी मनोधैर्य योजना विषयक मार्गदर्शन शिबीर संपन्न



**वाडा/वार्ताहर**

वाडा तालुका विधी सेवा समिती व वाडा तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे निमित्त साधून गुरुवारी (दि.१४ ऑक्टोबर) सकाळी ९ : ३० वाजता वाडा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत ऐनशेत, पेठरांजणी येथे कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरामध्ये न्यायाधीश मनोहर सैंदाणे यांनी मोफत विधी सेवा व बलात्कार पिडीत, लैंगिक शोषण पिडीत बालक आणि सिड हल्ला पिडीतांकरिता मनोधैर्य योजना या विषयांवर मार्गदर्शन केले. तालुका वकील संघाचे वरिष्ठ वकील सी. पी. पाटील यांनी राज्यघटनेत दिलेले हक्क व अधिकार यावर मार्गदर्शन केले. त्यानंतर वकील संजय चोथे यांनी महिलांचे अधिकार या विषयी माहिती दिली. सदर कार्यक्रमामध्ये पंचायत समितीच्या बालविकास प्रकल्प अधिकारी अस्मिता बिर्जे यांनी एकात्मिक बाल ...पान ६ वर

# विद्यार्थ्यांना लोकल प्रवासाची परवानगी देण्याची बाबूभाई भवानजी यांची मागणी मान्य

**मुंबई/प्रतिनिधी**

शिक्षण हा भावी आयुष्याचा पाया आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होता नये. मात्र कोरोनाच्या संकट काळात जवळपास दीड वर्ष शाळा कॉलेज बंद असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र आता कोरोना आटोक्यात आल्याने सर्व जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. शाळा आणि कॉलेज सुद्धा सुरू झालेत. मात्र लोकल ट्रेनच्या प्रवासाला परवानगी नसल्याने विद्यार्थ्यांना प्रवासाची अडचण येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लोकल ट्रेनच्या प्रवासाची परवानगी द्यावी अशी मागणी माजी उप महापौर आणि भाजपा नेते बाबूभाई भवानजी यांनी आरोग्य मंत्र्यांकडे केली आहे. महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांना लिहलेले पत्रात भवानजी यांनी म्हटले आहे की कोरोना काळात शाळा कॉलेज बंद असल्याने ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र काही महिन्यांनी कोरोनाची दुसरी लाट नियंत्रित झाल्यावर आठवी ते बारावीपर्यंतच्या वर्गाना कोरोना नियमांचे व्यवस्थित पालन करून परवानगी देण्यात आली. त्यामुळे अनेक शाळा कॉलेजात ऑनलाईन शिक्षण बंद करण्यात आले. आता शाळा कॉलेज सुरू झाल्याने काही विद्यार्थ्यांना ...पान ६ वर

# जेईई ॲडव्हान्स २०२१ परीक्षेत त्रिपुरा महाविद्यालयाची उत्तुंग भरारी

**लातूर/प्रतिनिधी**



एनटीए द्वारे घेण्यात आलेल्या जेईई ॲडव्हान्स २०२१ परीक्षेत रिलाईन्स लातूर पॅटर्नच्या श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाने घवघवीत यश मिळवून लातूर मधील यशाची परंपरा अबाधित ठेवली आहे. संपूर्ण भारतातून ३ ऑक्टोबर २०२१ रोजी १४१६९९ विद्यार्थ्यांनी हि परीक्षा दिली होती. त्यातील ४१८६२ विद्यार्थी पात्र ठरले. त्यात महाविद्यालयातून एकूण ४२ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती, त्यापैकी तब्बल १२ विद्यार्थी JEE डव्हान्स परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये पठाण शहा फैजल खान याने (Rank १९२) सह प्रथम क्रमांक पटकाविला आहे. उस्ताद मुस्कान (Rank १०४५), देसले भुवन (Rank ११७३) अनुक्रमे व्दितीय व तृतीय क्रमांकावर आहेत. त्याचबरोबर रायकर सागर बापू (२६६४), कांगुले तेजस (Rank ५९९३), भोयर हितेश (Rank ८६९५), देशपांडे अमृता (Rank ८९४३), सोलापुरे विवेक (९८३२), पाठक राघवेंद्र (Rank ११३४४), वडगावे धिरज (११६२२), फुटेकर आश्विनी (१४७३५), गंगापुरे भारत (१६३५५) यांनी JEE Advance मध्ये पात्रता मिळविली आहे. कोरोनासारख्या आपत्तीच्या कालखंडात शैक्षणिक सातत्य विस्कळीत झालेले असतानादेखील आमच्या ...पान ६ वर